
शनिवार । ६ सप्टेंबर १९८०

एक रुपया

# माणूस



## राष्ट्रवादी डावा पर्याय आणि डावी आघाडी

केंद्रीय गृहराज्यमंत्री मकवाना यांचा अपवाद वगळता कुणीही या वेळी मोरादाबाद व उत्तर प्रदेशात नुकत्याच घडलेल्या इतर दंगलींच्या मागे रा. स्व. संघाचा 'हात' होता असे म्हटलेले नाही, हे एक आश्चर्यच आहे. पूर्वी जमशेटपूर असो, अलिगढ असो, हिंदु-मुसलमान दंगल उद्‌भवली की, संघाला त्यात गोवायचे, ही पद्धत ठरूनच गेलेली होती. दंगलीनंतर झालेल्या एकाही चौकशीत संघाचा 'हात' असल्याचे सिद्ध झाले नसले तरी ही पद्धत बदलण्याची कुणाला आवश्यकता वाटत नसे. संघाची यथेच्छ बदनामी चालूच राहायची. आत्ताच असे काय घडले किंवा घडत आहे, की ज्यामुळे संघाची या नेहमीच्या बदनामीतून सुटका व्हावी व दंगलीची मुख्य जबाबदारी परकीय शक्तींवर–पाकिस्तानवर टाकण्यात यावी? मोरादाबाद किंवा इतर ठिकाणच्या दंगलीमागे संघाचा हात असल्याचा पुरावा अजिबातच आढळला नाही, हे काही खरे कारण असू शकत नाही. पुरावा नसतानाही संघावर सर्व तऱ्हेचे बेफाट आणि बेताल आरोप इतर बाबतीत अजून ठेवले जातच आहेत. आसाम आंदोलनच घ्या. आसामात संघाचे काम खोलवर रुजलेले नाही. एवढ्या मोठ्या जनआंदोलनाचे नेतृत्व करण्याची क्षमता संघाजवळ नव्हती हे उघड दिसत असतानाही, इंदिरा गांधींसकट सर्वांना आसाम आंदोलनामागे संघाचा 'हात' दिसायचा तो दिसलाच! तो खरोखरच तसा असता तर वास्तविक ती गौरवाची बाब ठरली असती; पण आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांना अप्रत्यक्ष मदत करणे वेगळे आणि आंदोलन स्वतः उभारणे-चालवणे वेगळे. आसाममधील संघ-कार्यकर्त्यांनी तशी अप्रत्यक्ष मदत केलीही असेल–करायला हवीही होती. फार तर एवढे म्हणता येईल की, संघाच्या अप्रत्यक्ष साहाय्यामुळे व सल्लामसलतीमुळे आंदोलनाची बंगाल-बंगाली विरोधी धार थोडी बोथट होऊन हळूहळू परकीय नागरिकविरोधी आंदोलन, असे स्वरूप त्याला येत गेले. आंदोलनाचे जे काही श्रेय किंवा अपश्रेय असेल ते आसामी विद्यार्थ्यांना व तेथील जनतेला द्यायला हवे. संघाचा त्यातला वाटा अद्याप तरी गौणच आहे. हे सगळे सुरुवातीपासून स्पष्ट दिसत असूनही इंदिरा गांधींसकट सर्वांनी आसाम आंदोलनामागे संघ असल्याचा प्रचार काल-परवापर्यंत चालूच ठेवला होता. तेव्हा पुरावा असो नसो, दंगली-उद्रेक याबद्दल संघ-जनसंघाला ठोकणे हा रिवाज, हे दंगलीनंतरचे कवित्व ठरून गेले होते. हा रिवाज, हे कवित्व मोरादाबाद दंगलीनंतर कसे काय उफाळून आले नाही? अगदी मधू लिमये–राजनारायणसुद्धा गप्प कसे? मकवानांना अगदी कुणाचीच साथ कशी काय मिळाली

नाही? महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅ. अंतुले अशा अर्थाचे थोडे बोलले हे खरे आहे. दंगलीमागे परकीय शक्ती आहेत हे त्यांनी मान्य केले; पण संघामागेही परकीय शक्ती आहेत असे त्यांचे मत आहे! त्यामुळे प्रत्यक्ष नाही तरी अप्रत्यक्षरीत्या अगदी मोरादाबाद दंगलीशीही सघाचा सबंध पोचतो, असे त्यांना सूचित करावयाचे असावे. हा अपवाद वगळला तर केंद्रीय गृहराज्यमंत्र्याचा सूर फारसा कुणी ओढला नाही. संघ या वेळी तरी सहीसलामत सुटला असे स्पष्ट दिसते. हे कसे घडले? का घडले?

संजयनंतरची दिल्ली आता बदलू लागलेली आहे, राजकीय शक्तीच्या नव्या फेरजुळणीला सुरुवात झालेली आहे, हे यामागील एक कारण सभवते. इदिरा-सजय ही एक अभेद्य तटबदी होती. संजयच्या अपघाती निधनामुळे ही तटबंदी आता ढासळली आहे. विरोधकाचे नवे मोर्चे उभे राहात आहेत. देश ७४–७५ सालातील स्थितीकडे पुन्हा येणार हे गृहीत धरूनच हे मोर्चे बांधले जात आहेत; पण या वेळी मोर्चातून सघ-जनसंघ-भाजपला वगळण्याचा निर्णय वरपासून खालपर्यंत घेतला गेलेला दिसतो. निर्भेळ डावी आघाडी उभी करण्याचा विरोधकाचा हा प्रयत्न समजा यशस्वी झाला तर सामना कसा रगेल? ७४–७५ सालातील सामन्यात उजवे कम्युनिस्ट, डांगे-रजनी पटेल गट बाईच्या बाजूने मैदानात उतरले होते. ललित नारायण मिश्रांना 'हुतात्मा' ठरवून या मंडळीनी त्या वेळी अगदी षट्कारसुद्धा ठोकला होता. उजव्याचा बीमोड करण्यासाठी बाईंनी आणीबाणी पुकारली आहे, असे ही मंडळी त्या वेळी सांगत होती व आपल्याला ऐकत राहणे भाग पडत होते. डांगे-रजनी पटेल याच्या परिभाषेतील उजव्याना म्हणजे जयप्रकाश-आंदोलनात सामील झालेल्या सर्वांनाच तुरुंगात डांबल्यावर बाईसाहेब जेव्हा डाव्याकडे वळल्या, संजय-मार्फत जेव्हा या मंडळीची हकालपट्टी सुरू झाली तेव्हा बाई डाव्या होत्या त्या एकदम उजव्या ठरल्या. पक्षच फुटला. डांगे एकीकडे, राजेश्वर राव दुसरीकडे फेकले गेले. आता हा गट, मधू लिमये–चरणसिंगाचे लोकदल, डावे कम्युनिस्ट आणि महाराष्ट्रातील शरद पवार काँग्रेस असे सगळे एकत्र येऊन, निर्भेळ डाव्या अगाने इदिरा शासनावर चाल करून निघणार असतील तर बाई, तात्पुरत्या फायद्यासाठी का होईना, कुणाकडे वळतील? ७४।७५ साली त्या उजव्या कम्युनिस्टाकडे वळल्या. तत्पूर्वी त्यांनी तरुण तुर्कांचे, समाजवाद्याचे साहाय्य मिळवले होते. मुस्लिम लीग देखील त्यानी कधी वर्ज्य मानली नाही. डावा–उजवा असा विधिनिषेध बाळगायला त्या काही एखाद्या पुस्तकी राजकारणी थोड्याच आहेत? जो ज्या वेळी हवा तो त्या वेळी नेमका उचलून, वापरून, काम होताच फेकून देणे, एवढेच त्या जाणतात. डाव्यानी देशभर चळवळीचा डोंब उसळवून दिला तर भाजप–सघ वर्तुळांकडे वळण्यास बाई त्यामुळेच मागेपुढे पाहणार नाहीत. एकीकडे डाव्यांचा विभाजनवाद, देशातील वाढते अराजक आणि दुसरीकडे बाईचा राष्ट्रवादी स्थिर शासनवाद, असा पेचप्रसंग उत्पन्न झालाच तर भाजप। संघ गोटाला तरी यापैकी कोणता पर्याय अधिक स्वीकारार्ह ठरू शकणार आहे? उलट दिल्लीपासून पुण्या–मुंबईपर्यंत भाजप वगळून निखळ डावी आघाडी उभारण्याचा जो अखिल भारतीय प्रयत्न दिसतो, त्यामागेही भाजप। इंदिरा या शक्तींना एकमेकाच्या सन्निध आणून, उजवे विरुद्ध डावे असे अगदी मार्क्सवादी क्रमिक पुस्तकाबरहुकुमचे ध्रुवीकरण देशात घडवून आणण्याची एखादी योजना नसेलच असे नाही. असे सरधोपट ध्रुवीकरण होऊ न देणे हे आजवरच्या नेहरूयुगाचे वैशिष्ट्य होते. असे ध्रुवीकरण नाही म्हणजे डाव्या राज-कारणालाही, निदान या देशात, फारसे उज्ज्वल भवितव्य नाही, हे डाव्यांनीही आजवरच्या अनुभवांनी ओळखले


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : विसावे**
**अंक : चौदावा**
**६ सप्टेंबर १९८०**
**किंमत : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

आहे. म्हणून भाजप / इंदिरा याना एकत्र, एका कोपऱ्यात ढकलून हल्ला चढवला जायची शक्यता आहे. असे झालेच तर एकत्र येण्यात आणखी अडथळे नकोत म्हणून मोरादाबाद दंगलीबद्दल संघ–जनसंघ–भाजपला ठोकण्याचा कार्यक्रम काही काळ स्थगित ठेवला गेल्याचे असण्याची शक्यता आहे. मुंबईच्या 'Economic and Political Weekly' या डाव्या साप्ताहिकाने तर इंदिरा / भाजपला 'apparently bitter political foes' म्हणजे 'वरवरचे कट्टर राजकीय शत्रू' असेच संबोधले आहे (२३ ऑगस्ट अंक–संपादकीय) व मोरादाबाद दंगलप्रकरणी पोलिसदलाची बाजू घेतल्याबद्दल दोघांवरही समान टीका केली आहे. डावे प्रवक्ते आत्तापासूनच इंदिरा / भाजप जवळीक गृहीत धरून आपली व्यूहरचना आखीत आहेत; प्रश्न भाजप गटासमोर असा उपस्थित होईल की, तरुण तुर्कांप्रमाणे, डाव्यांप्रमाणे सहकार्य करून नाममात्र व्हायचे की, प्रतियोगी सहकारितेचे राजकारण करून या कोंडीतून सुटका करून घ्यायची? कोंडी तर आता फार दूर नाही...

¤

अशीही एक शक्यता आहे की, राजीव गांधी व यशवंतराव चव्हाण यांच्या नव्या हालचालींमुळे कॉंग्रेस पुन्हा एक होईल व डाव्यांना अभिप्रेत असणारे ध्रुवीकरण आणखी एकदा लांबणीवर पडेल. असे घडले तर डाव्यांना म्हणजे मुख्यतः मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला व भाजपला आपापले पक्षबळ एकाकी वाढवत राहण्याशिवाय दुसरा काही कार्यक्रम सध्या तरी डोळ्यांसमोर ठेवता येणार नाही. महाराष्ट्रात शरद पवार सध्या कितीही लढाऊ पवित्रा घेत असले तरी कॉंग्रेस ऐक्याच्या प्रवाहात तेही सामील होण्याची शक्यताच अधिक आहे, कारण कट्टर डावे त्यांना आपला नेता म्हणून कधीच मानणार नाहीत. ही कॉंग्रेस ऐक्याची शक्यता दुरावली, यशवंतराव चव्हाण यांनी अलीकडेच केलेले इंदिरास्तवन वाया गेले तर कोंडी लवकर तयार होईल, ७४–७५ साल देशात पुन्हा उद्भवेल. या वेळी एक फरक राहील. ७४–७५ सालातील विरोधी उठावाला जयप्रकाशांसारख्या सर्वमान्य नेतृत्वाचा आधार लाभलेला होता. उठावामागे भ्रष्टाचार निर्मूलनाची नैतिक प्रेरणा होती. या नैतिक प्रेरणेमुळे देशातील बुद्धिवादी वर्गही या विरोधी उठावात मनापासून सामील झाला व जनता सरकार अस्तित्वात आले. अशी इंदिराविरोधी सर्व शक्तींची, वर्गांची युती सध्याच्या डाव्या आघाडीमागे उभी राहणे संभवनीय दिसत नाही. मधू लिमये–बहुगुणा, ज्योती बसू–नंबुद्रीपाद यांनी आपापली सर्व सामर्थ्ये पणास लावली तरी एका जयप्रकाशांची उणीव ते दूर करू शकत नाहीत. या युतीमागे रशियाचा 'हात' असल्याचा संशय आतापासूनच व्यक्त होत आहे. असा आंतरराष्ट्रीय डावा पर्याय या देशाने आजवर कधीच स्वीकारलेला नाही. राष्ट्रवादी डावा पर्याय हाच भारतीय राजकारणाचा स्थायीभाव राहिलेला आहे. निखळ डावे किंवा उजवे असे टोकाचे पर्याय येथील जनतेने आजवर नाकारलेलेच आहेत. जनता पक्ष हा असा राष्ट्रीय डावा पर्याय होता म्हणून त्या वेळी तो स्वीकारला गेला. तो अल्पजीवी ठरला याला अनेक कारणे आहेत. तरीपण कॉंग्रेसने जे तीस वर्षांत केले नव्हते ते या नव्या राष्ट्रवादी डाव्या पर्यायाने आपल्या २८ महिन्यांच्या अल्प अस्तित्वकाळात करून दाखवले होते. हा वारसा घेऊन जो पुढे झेपावेल तोच इंदिरा गांधींना किंवा एकूण कॉंग्रेस–कल्चरला समर्थ पर्याय देशात निर्माण करू शकेल. केवळ डाव्यांना किंवा उजव्यांना हे जमणे अशक्य आहे. कोण असा समर्थ राष्ट्रवादी डावा पर्याय उभा करू शकतो ते पाहायचे!

—श्री. ग. मा.

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. प. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# सप्रेम नमस्कार

◘ माणसच्या दि. २३ च्या अंकामध्ये डॉ शरद अभ्यंकर, वाई, याचा पंढरीची वारी-विषयक लेख वाचला आणि मन हर्षोन्मेषाने इतके भरून आले की, वा रे मेरे गब्रू !

त्यांचा असाच लेख हाजच्या वारीबाबत लौकरात लौकर वाचावयास मिळेल अशी उत्कंठा आणि आशा वाटत आहे. पंढरीच्या वारीमध्ये मनुष्यकार्यशक्तीची वारेमाप उधळपट्टी होत असली तर हाजवारीमध्ये ती होऊन शिवाय वर दुर्मिळ परकीय चलनाची उधळपट्टीही होत असते !

अर्थात आमच्या काही प्रतिगामी स्नेह्यांचे म्हणणे ही पुरोगामी समाजवादी मंडळी केवळ घरच्या म्हातारीचे काळ असतात असे आहे. मी मात्र तसे म्हणू इच्छित नाही. कारण माझी डॉ. शरद अभ्यंकरावर श्रद्धा आहे.

२६ ऑगस्ट — व. भा. गोळपकर, ठाणे

◘ ताज्या अंकातील डॉ. अभ्यंकरांचा पंढरपूर वारीसंबंधीचा लेख वाचला. तमाम जनतेच्या श्रद्धेचे स्थान असलेल्या विठोबा-संबंधी व वारकऱ्यांच्याबद्दल–वस्तुनिष्ठ विवेचनाबद्दल डॉक्टरसाहेबाचे व असा लेख छापल्याबद्दल आपले मन पूर्वक अभिनंदन !

पंढरपूरला आणखी एक चाललेला गैर-प्रकार डॉक्टरांचे नजरेतून सुटलेला दिसतो. संत कैकाडीमहाराज व तनपुरेमहाराज यानी अमाप पैसा खर्च करून एकमेकांच्या चढाओढीत बांधलेले कांक्रीटच्या बांधकामाचे मठ (?) नावाच्या इमारती हा तो प्रकार होय. सदर बांधकामे अवाढव्य जागेवर, मध्यवस्तीत आणि बांधकामसाहित्याचा मन मानेल तसा वापर करून बांधली आहेत. यात्रेच्या किंवा इतर वेळी निवारा म्हणून ह्या वास्तू बांधल्या असत्या तर काहीच हरकत नव्हती; पण तसे न करता ह्या मठातून कलात्मकदृष्ट्या काहीही मूल्य नसलेल्या बेढब मूर्ती आणि पुराणातील प्रसंग कोरलेले आहेत. भरीत भर म्हणून 'भारताने अणु-बाँब बनवू नये, अमेरिकेच्या अध्यक्षाना काही उपयुक्त सूचना' असल्या प्रकारचे धार्मिक (?) बोधामृत पाजलेले आहे.

देशात आज बांधकामसाहित्याची आणि गावातून राहत्या जागांची प्रचंड टंचाई असताना हा दुरुपयोग खपवून घेतला जातो. सरकारला बेघरांची जर खरोखरच कणव असेल तर ताबडतोब ह्या इमारती ताब्यात घेऊन त्यामधील निरुपयोगी बांधकाम (उदा. कांक्रीटची रेल्वे, देखावे) पाडून बेघर लोकांची सोय करावी. फक्त एवढेच जरी केले तरी (प्रत्येक कुटुंबास ४ मीटर× ४ मीटर) अशा किमान पाचशे कुटुंबाची सोय होईल; पण धर्मभोळ्यांच्या मतांना चटा-वलेले राज्यकर्ते हे करू धजतील काय ? मुळीच नाही ! नुकतेच वाचनात आले की, तिरुपति मंदिराच्या आधुनिकीकरणास संस्थान (जे सरकारनियुक्त कमिटी चालवते) जवळजवळ सव्वा कोटी रुपये खर्च करणार आहे !

ह्या गोष्टी थांबवायच्या असतील तर बुद्धिवाद्यांवरच मोठी जबाबदारी आहे. बुद्धिप्रामाण्य वाढीस लावण्यास संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. डॉ. अभ्यंकरानी मात्र आपल्या लेखाच्या शेवटी 'विठ्ठला, तू सुद्धा या देशाला वाचवू शकत नाहीस रे !' असा निराशेचा सूर काढला आहे. (डॉक्टरानी मध्यंतरी पुण्यास घेतलेल्या अंधश्रद्धा विरोधी परिषदेस मिळालेला अल्पप्रतिसाद हे तर कारण नसावे ?) हे काम एखाद-दुसऱ्या पिढीचे नाही सातत्याने अनेक वर्षे जागृती केली, निंदा सोसली तरच यास यश संभवते. स्त्री शिक्षण-चळवळ, अस्पृश्यता निवारण वगैरे बाबीचे उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आहेच.

२५ ऑगस्ट — डॉ. एस्. एम्. रासकर, सोलापूर

◘ 'कशाला हवी ही पंढरपूरची वारी ?' म्हणून वाईच्या डॉ. शरद अभ्यंकर ह्यानी २३ ऑगस्टच्या 'माणूस'मध्ये एक लेख लिहिला आहे. ह्या लेखातील त्यांची अनेक विधाने तर्कसंगत नाहीत म्हणून हा उत्तर देण्याचा प्रपंच.

प्रथमच हे सांगितले पाहिजे की, मी कोणी सनातनवादी आहे व माझ्या भावना दुखावल्या आहेत म्हणून हे लिहीत आहे असे नाही. फक्त कोणत्याही लिखाणाला-विधा-नाला कार्यकारणभाव असावा तसा तो त्याच्या लेखात नाही.

त्याचा मुख्य आक्षेप 'मॅन अवर्स लॉस्ट' आहे. म्हणजे माणसाचे कामाचे तास किती वाया गेले हे ते पाच लाखाचा हिशोब करून दाखवतात. हिंदुस्थानचे सोडून द्या, नुसत्या महाराष्ट्रातीलच लाखो लोकांना काम नाही म्हणून किती 'मॅन अवर्स' वाया जातात व त्याला जबाबदार कोण ? याचे उत्तर त्यांच्याजवळ आहे का ? महाराष्ट्राची लोकसंख्या चार-साडेचार कोटी आहे. त्यातील निम्म्यापेक्षा जास्त लोकाना शेतीचे ४-६ महिने सोडून एरवी काहीच काम नसते. अगदी ठोकळमानाने विचार केला तरी एक कोटी लोक वर्षातून सहा महिने बेकारच असतात. त्यामुळे पंढरपूरला जाण्याने कामाचे तास वाया जातात या म्हणण्यात काहीच अर्थ नाही. प्रा. दि. धों. कर्वे एकदा 'वारी बंद होईल त्या दिवशी प्रगतीस सुरुवात होईल' असे म्हणाल्याचे ते सांगतात. प्रा. कर्वे याचीच पत्नी व महा-राष्ट्रातील एक विदुषी इरावतीबाई कर्वे स्वत: वारीला जात व त्यातील आनंद मिळवीत हे डॉ. अभ्यंकरांना माहीत नाही काय ?

दुसरे असे की, संख्याशास्त्र नेहमीच फसवे असते. आपल्याला पाहिजे तसा सोइस्कर अर्थ त्यातून काढता येतो. नदीची खोली सरासरी दोन फूट आहे म्हणून आपण सहज पार करून जाऊ म्हणणारा, नदीची खोली दहा फूट आल्यावर बुडणारच ! त्यामुळे, ज्या दिवशी सर्वांना काम मिळेल, त्या दिवशी कामाचे तास वारीत फुकट गेल्याचे आप-ल्याला म्हणता येईल.

आता सुधारित जगात दरवर्षी भेटण्याची

आवश्यकता नाही असे डॉक्टर म्हणतात. या सर्व सुधारणा आपल्या पाठीशी असून दरवर्षी सर्व तज्ञ, वैज्ञानिक, डॉक्टर्स कॉन्फरन्सच्या नावाखाली एकत्र येतातच ना? विचाराची देवाण-घेवाण करण्यास व संपर्क साधण्यास ते मेळावे जेवढे उपयुक्त आहेत तेवढेच आध्यात्मिक लोकांच्या दृष्टीने दरवर्षीची वारी उपयुक्त आहे असे नाही का म्हणता येणार?

एका चंद्रभागेच्या बुचकळीत सर्व पापे नाश होतील अशी वारकऱ्याची सुद्धा श्रद्धा नसते. तसे असते तर दरवर्षी येण्यापेक्षा आयुष्याच्या शेवटी तो एकदा वारीस आला असता!

खोटे सर्टिफिकेट दाखवून वारकरी येतो म्हणून त्याला हसण्यात काय अर्थ आहे? कॉलराप्रतिबंधक लस टोचून घेतल्याचे सर्टिफिकेट देतो कोण? डॉक्टरच ना? तो सुशिक्षित माणूस जास्त दोषी नाही का?

तिरुपतीच्या सार्वजनिक सेवेविषयी अभ्यंकरानी जे लिहिले ते असेच चुकीचे आहे. दरवर्षी आपल्या इकडील वर्तमानपत्रातही पानभर जाहिरात येते. अमुक पूजेसाठी शंभर रुपये, तमुक पूजेसाठी पाचशे रुपये! एखाद्या उद्योगपतीने कोटयवधी रुपये मिळवून लाखाचे एखादे मंदिर बांधण्यासारखेच हे आहे. जेवढा भ्रष्टाचार जास्त तेवढी ही सत्कार्याची धूळफेक मोठी!

लक्षावधी लोक या निमित्ताने एकत्र येतात. त्याच्यात सामाजिक, धार्मिक सुधारणा कशी करता येईल हे सुज्ञानी पाहावयाचे आहे. त्याच्या श्रद्धेलाच नावे ठेवायची असली तर आपण सुशिक्षित तरी काय करतो? आपली श्रद्धास्थाने बदललेली असतात एवढेच. रोजच्या दैनंदिन जंजाळातून सुटण्यासाठी कोणी रजनीशाचा आश्रय घेतो, कोणी बाटली हातात घेतो, कोणी या भिकारड्या देशात राहायला तयार होत नाही. वारकऱ्यालाच हसण्यात काय अर्थ आहे?

२५ ऑगस्ट वसंत गणेश जावडेकर, कुर्ला

□ पंढरीची वारी हा लेख वाचला. पंढरीला वारकऱ्याची संख्या दिवसेंदिवस किंवा प्रतिवर्षी वाढत आहे हे खरेच आहे, त्याला वाढणारी भयानक लोकसंख्या, श्रद्धा व भक्ती हीही कारणे आहेत. महाराष्ट्रावर संतांचे फार मोठे उपकार आहेत. केवळ याच कारणामुळे या बाजूला 'साम्यवादाला स्थान नाही' हे मान्य करावेच लागेल. सहा लाख लोक जमतात, त्यात एकही हिंसाचार होत नाही, हेही लक्षात घ्यायला हवे. पापक्षालनाकरिताच इतकी माणसे पंढरीला जमा होतात हे खरे नाही. चंद्रभागेचे स्नान व विठ्ठलदर्शन व त्यातच आयुष्याची इतिकर्तव्यताही असते, अशी वारकऱ्याची श्रद्धा आहे व असते. वारकरी या संप्रदायात दुराचारी, भ्रष्टाचारी, व्यसनी कमी आहेत हेही नाकारता येत नाही. वारकऱ्याने किंवा पंढरीची वारीवाल्याने बलात्कार किंवा चोरी केल्याची बातमी नाही. सहा लाख तरी या अनीतिमान जगात नसतात! वारकऱ्याची साक्ष सहसा कोणीही काढत नाहीत. कारण 'खोटी साक्ष' हवी ती तो देईल हा भरंवसा आरोपीस वाटत नाही. गळयात माळ असलेले सहसा मांसाहार व मद्यपान करीत नाहीत. ही गर्दी आचरट व बावळट म्हणणाऱ्यानी हेही लक्षात घ्यावे की, इतकी माणसे तरी आज महाराष्ट्रात निर्व्यसनी आहेत. इतक्या लोकांना नादी लावणारा विठ्ठल भेदरट कसा? ज्ञानेश्वरांच्या पादुका पाहण्यासुद्धा भयंकर गर्दी होते ती केवळ श्रद्धेमुळेच! त्याना तहानभुकेचेही भान नसते. काही तासापुरते का होईना, सर्वच भाविक सकटे, रोग, दारिद्र्य सर्व विसरतात व समाधानवृत्तीने परत येतात. त्यांचा काय फायदा होतो? त्यांना विचारा, त्यांचे प्रत्येकाचे उत्तर एकच येईल– 'आनंद वाटतो, आम्ही समाधानी आहोत.' काही दिवसाकरिता का होईना, समाधान या भावनेला काही स्थान आहेच ना? का, माणसांनी समाधानी असूच नये? नेहमी विज्ञानाचीच वाटचाल करावी? पाश्चात्य पंडित तर कबूल करतात की, 'विज्ञान हेच ज्ञान म्हणजे अज्ञान!' विज्ञानापलीकडचे एक जग आहे.

ही सहा लाख माणसे राजकारणात कधीही गोंधळ घालीत नाहीत. कै. दि. धों. कर्वे यांचे उदाहरण लेखकमहाशय देतात. डॉ. भडकमकर, सोनुमामा दांडेकर–तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक यांची उदाहरणे देता येतील. वरील थोर माणसांना आचरट म्हणायचे का? एक होते धन्वंतरी तर दांडेकर एका महाविद्यालयाचे प्राचार्य! यांनाही आचरट म्हणण्याचा अधिकार लोकशाहीत आहे. डॉ. भडकमकरांना तर मी प्रत्यक्ष पांढरा फेटा बांधून दिंडीत सामाल झालेले, काही मैल पदयात्रा करताना पाहिले आहे! वरील दोन्ही मंडळी पंढरीला पापक्षालनाकरिता गेली होती काय?

लेखात वर्णन केलेला ५० वर्षे वारी करणारा वारकरी, हा केवळ 'खाऊ' वाटण्याकरिता जात होता. त्याला ५ रु. देऊन बक्कल सर्टिफिकिटेही न टोचता मिळत असत. ही सर्टिफिकिटे देणारे बुद्धिवादी, विज्ञानवादी कोणी तरी डॉक्टरच असणार! खोटे दाखले देणे हा भ्रष्टाचार नव्हे?

हिंदू लोक तर विठ्ठलाला 'मायबाप' म्हणतात. त्याला आई म्हणतात व त्यावर मातेप्रमाणे प्रेम करतात. म्हणूनच विठाईमाउली त्याना प्रिय असते व केवळ दर्शनाकरिता लाखो माणसे जमतात, समाधानी होऊन परततात. धार्मिक वृत्तीची ही माणसे शंकराचार्य गावी आले तर त्यांच्या दर्शनाला फारशी येत नाहीत; पण ज्ञानेश्वरांच्या पादुकांच्या दर्शनाकरिता लाखोनी जमतात, याचा अर्थ समजावून घेतला पाहिजे.

विज्ञानापेक्षा व बुद्धिवादापेक्षा मनुष्य भावनेवरच अधिक सुखाने आयुष्याची किती तरी वर्षे–अगदी मरेपर्यंत घालवतो. विज्ञान व अध्यात्म ही दोन वेगळी क्षेत्रे आहेत. दोन्हींचा मेळ घातल्यास सर्व जगभर एकात्मता येण्यास मदत होईल, हेच तत्त्व सर्व तत्त्वज्ञानी आजपर्यंत सांगत आले.

सहा लाख वारकरी श्रद्धेने जात असतील तर त्याची टवाळी करून, त्याना वाटणाऱ्या समाधानापासून कोणीही वंचित करू नये.

आता आरोग्यव्यवस्था व इतक्या लोकांची सुव्यवस्था याबद्दल. ज्याची तो काळजी घेतो. शासन उत्तम व्यवस्था ठेवण्याची काळजी शक्यतो घेतेच. त्यांना या देवभोळ्या माणसाची गैरसोय होऊ नये असेच वाटते. एखादा वटहुकूम काढून या गर्दीचा भक्तिमार्ग बंद करता येईल; पण ते ठीक आहे का? यावरून शासन विज्ञानी व बुद्धिवादी नाही असाच निष्कर्ष काढणे योग्य ठरेल काय?

आता मॅन अवर्सविषयी थोडे. भारतात दररोज नाटक, सिनेमा, संगीत, तमाशा यात हजारोनी लोक हजर राहतात. त्याचा जर या रीतीने हिशेब केला तर आकडे कमी पडतील. ही माणसे कलेचा आनंद घेतात व पंढरीचे सहा लाख लोक श्रद्धेच्या व भक्तीच्या सोहळयाचा आनंद घेतात. त्यात कसलेही 'हॅमरिंग' नाही.

पंढरीची वारी वाढतच जाईल तेवढे बरे. निरुपद्रवी माणसे म्हणून तरी या प्रचंड समुदायाकडे पाहावे!

२५ ऑगस्ट डॉ. प्र. शं. मराठे, वाई

# पोलंड
## कामगारांच्या विजयाचा अर्थ

वा. दा. रानडे

पोलंडमधील संप-आंदोलनात अखेर संपनेत्यांशी तडजोड करणे कम्युनिस्ट राजवटीला भाग पडले हे तेथील कामगारचळवळीच्या वाढत्या सामर्थ्याचे निदर्शक आहे. तडजोडीचा संपूर्ण तपशील हा लेख लिहीपर्यंत समजलेला नाही; पण कामगारांच्या प्रमुख मागण्या मान्य झाल्या आहेत. त्यांचा संपाचा हक्क तसेच स्वनियंत्रित कामगारसंघटना स्थापण्याचा हक्क मान्य करण्यात आला आहे. कम्युनिस्ट देशात प्रथमच हे घडत असल्याने त्याला महत्त्व आहे. आज पोलंडमध्ये जे घडले त्याचे लोण पूर्वयुरोपातील इतर कम्युनिस्ट देशात पसरण्याचा संभव असून रशियाही त्यापासून फार काळ अलिप्त राहू शकणार नाही.

पोलंडमधील आंदोलन भाववाढीच्या विरोधातून उभे राहिले. अध्यक्ष गेरेक यांच्या सरकारने एक जुलैला मांसाचे भावात वाढ केली. त्याला विरोध करण्यासाठी देशात संपाची लाट उसळली. भाववाढीविरुद्ध पोलंडमध्ये यापूर्वीही संप झालेले आहेत; पण या वेळच्या संपांचे वैशिष्ट्य म्हणजे ते शांतपणे चालले होते आणि सरकारनेही ते दडपून टाकण्यासाठी कडक उपाय योजले नाहीत. बुद्धिजीवींच्या एका छोटया गटाने कामगार रक्षण समिति (कमिटी फॉर दि डिफेन्स ऑफ दि वर्कर्स) स्थापन केली आणि तिचेच कार्यक्षेत्र वाढवून 'सामाजिक आत्मरक्षण' (सोशल सेल्फ डिफेन्स) हे नाव त्या संघटनेच्या नावास जोडले. 'के. एस. एस्– के. ओ. आर' या पोलिश आद्याक्षरांनी ही संघटना ओळखली जाते. संपासंबंधी सर्व माहिती गोळा करून ती कामगारांना व जनतेला कळविणे हे तिचे मुख्य काम. पोलंडमधील संपांची बातमी जगाला या संघटनेकडूनच प्रथम कळली. देशात संप सुरू झाल्यानंतर दीड महिन्याने सरकारने ते मान्य केले; पण काही दिवसांपूर्वी या समितीच्या बारा सभासदांना सरकारने अटक केली.

हे कामगार-आंदोलन अनेक दृष्टींनी वैशिष्ट्य-पूर्ण होते. ते मोठ्या प्रमाणावर असले तरी शिस्तबद्ध होते आणि शांतपणाने चालू होते. आपल्या मागण्यांसंबंधी व संपासंबंधी निर्णय कामगार लोकशाही पद्धतीने घेतात. वरिष्ठ नेते घेतील तो निर्णय ते अंधपणाने मान्य करीत नाहीत तर कामगार संघटनांच्या सर्वसाधारण सभेत निर्णय ठरतात. ग्दान्स्क येथील लेनिन शिपयार्डमध्ये संप चालू होता. संपसमिती आणि व्यवस्थापन यांच्यात १६ ऑगस्टला एक करार झाला. संप मिटला. आता कामगार कामावर येतील असे सरकारला वाटले; पण कामगारसंघटनेच्या सर्वसाधारण सभेने कामावर जायचे नाही असा निर्णय घेतला. करार त्यांना अमान्य नव्हता. पण इतरत्र संप चालू असता आपणच तेवढे कामावर जावे हे त्यांना मान्य नव्हते. इतर कारखान्यातही अशाच स्वरूपाचे करार होईपर्यंत आपण थांबले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. कामगारांमधील वर्गीय एकजुटीच्या जाणिवेचेच ते निदर्शक होते.

ग्दान्स्कच्या गोदी कामगारसंपाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे तेथील कामगारांनी केवळ आर्थिक मागण्या केलेल्या नाहीत तर राजकीय मागण्यांसाठीही ते झगडत आहेत. सरकारला सादर केलेल्या एकवीस मागण्यांच्या निवेदनात कामगारांचा संपाचा व संपकाळातील सुरक्षिततेचा हक्क मान्य करण्यात यावा, कामगारांना संघटना स्थापण्याचे स्वातंत्र्य असावे व आंतरराष्ट्रीय कामगारसंघटनेच्या अधिवेशनात होणाऱ्या निर्णयांना सरकारने मान्यता द्यावी. कामगारसंघटनांच्या कारभारात होणारा सरकारी हस्तक्षेप थांबवावा, सुरक्षादलाला दिलेल्या खास सवलती रद्द करून सर्वांना सारखा कुटुंबभत्ता द्यावा. केवळ पोलीस व कम्युनिस्टपक्ष कार्यकर्त्यांसाठी सुरू केलेली खास दुकाने बंद करावीत या आर्थिक मागण्यांबरोबरच भाषण व मुद्रणस्वातंत्र्य मिळावे, सेन्सॉरनिर्बंध रद्द करावेत, सर्व राजकीय स्थानबद्धांची मुक्तता करावी, संपर्कमाध्यमांचा वापर करण्याची सर्व धार्मिक गटांना मुभा असावी, अशा राजकीय मागण्याही त्यांनी केल्या आहेत. खुली कामगार चळवळ आणि खुली राजकीय चळवळ करण्याचे स्वातंत्र्य नागरिकांना मिळावे असे थोडक्यात या दोन्ही प्रकारच्या मागण्यांचे सार सांगता येईल.

कम्युनिस्ट देशातील कामगार चळवळ कम्युनिस्ट पक्षनियंत्रित असते. खऱ्या अर्थाने तेथे कामगारसंघटनेचे स्वातंत्र्य नसते. कम्युनिस्ट पक्षच कामगारवर्गाचा प्रतिनिधी आहे असा पक्षनेत्यांचा दावा असतो. मग हे संघर्ष का निर्माण होत आहेत? पोलंडमधील कामगारांना असे आढळून आले की, कामगारवर्गाच्या हक्काची व हितसंबंधाची जपणूक कम्युनिस्ट पक्ष करीत नाही तर त्यांचे धोरण पक्षाचे व सरकारचे निर्णय कामगारांवर लादणे हे असते. कामगारांच्या मागण्यांबाबत कम्युनिस्ट नियंत्रित कामगार संघटनांच्या प्रतिनिधींशीच वाटाघाटी करून निर्णय घ्यावयाचा असे कम्युनिस्ट राजवटीचे धोरण होते. प्रत्येक कारखान्यातील कामगार प्रतिनिधींशी स्वतंत्रपणे बोलणी करून त्यांचे वाद मिटवावयाचे असे धोरण सरकारने आतापर्यंत अवलंबले होते. कामगारांवर दाब आणून कम्युनिस्ट पक्ष व सरकारची भूमिका त्यांना मान्य करायला लावण्याच्या दृष्टीने ही पद्धत सरकारला सोयीची होती; पण या पद्धतीत आपल्याला न्याय मिळत नाही असे कामगारांना दिसून आले आणि एकेक कारखान्याचा वेगळा विचार न करता सर्व कामगारांनी संघटितपणे आपल्या मागण्या मांडाव्या आणि त्यासाठी एकच संयुक्त संपसमिती नेमावी असे कामगारांनी ठरविले. या समितीशी वाटाघाटी करण्याचे सरकारने मान्य केले, हा कामगारांचा मोठा विजय होता.

बाल्टिक किनाऱ्यावरील ग्दान्स्क, पश्चिमेकडील झेसिन आणि आग्नेय भागातील एल्बवेंग ही संपाची मुख्य केंद्रे होती. त्यांना एकमेकांशी संपर्क साधता येऊ नये म्हणून सरकारने टेलिफोन-दळणवळण तोडून टाकले होते. वाटाघाटीत सुरुवातीलाच हे टेलिफोन-दळणवळण सुरू करण्याची मागणी ग्दान्स्कच्या संपसमितीने केली व ती मान्य होत नाही तोपर्यंत आम्ही वाटाघाटीत भाग

मलपृष्ठ २ वर

# लोकनायक अणे : लोकमान्यांचे खरे शिष्य

लेखक : वसंत साठे, केंद्रीय माहिती व नभोवाणी मंत्री

लोकमान्य टिळकांच्या अगदी सुरवातीपासूनच्या शिष्यांमध्ये लोकनायक अणे यांची गणना केली जाते. आपल्या गुरूप्रमाणे ते ठाममतवादी होते व ध्येयांच्या बाबतीत त्यांनी कधीच तडजोड केली नाही. विरोध होत असला तरी त्याना आपले विचार मांडताना भीती वाटत नसे व ह्यामध्येच त्याची थोरवी होती.

'जंगल सत्याग्रह' सुरू करून विदर्भातील देशभक्तीची ज्योत त्यांनी चेतविली. त्या वेळी जनतेने त्याना 'लोकनायक' ही पदवी दिली. १९२० मध्ये कायदेभग चळवळीच्या वेळी 'मिठाचा सत्याग्रह' परकीय सत्तेच्या विरोधाचे प्रतीक म्हणून ओळखला जाई. त्या वेळचा मध्यभारत (सेंट्रल प्रॉव्हिन्सेस) मोठया व घनदाट अरण्यांसाठी प्रसिद्ध होता व सरकारला त्यापासून बरेच उत्पन्न मिळत असे, त्यामुळे लोकनायक अणे यानी ब्रिटिश सत्तेच्या विरुद्ध 'जंगल सत्याग्रह' सुरू करावा असे ठरविले. लोकनायक अणे यांनी ३० जुलै १९३० रोजी सरकारी मालकीच्या जंगलात चांदीच्या कोयत्याने गवत कापले व कायदा मोडला. हा कायदा मोडणारे ते पहिले सत्याग्रही ! त्यानंतर हजारो सत्याग्रहींनी त्याचे अनुकरण केले. १९३० नंतरच्या काळात जंगलसत्याग्रहदेखील मिठाच्या सत्याग्रहासारखा लोकप्रिय झाला व लोक त्यांना स्वयंस्फूर्तपणे 'लोकनायक' म्हणू लागले.

लोकनायक माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे याचा जन्म महाराष्ट्रातील वणी (जिल्हा-यवतमाळ) या गावी २९ ऑगस्ट १८८० रोजी झाला. प्राथमिक शिक्षण त्यांनी जन्मगावीच घेतले. वडिलानी त्यांना वैदिक शिक्षणाची ओळख करून दिली. माध्यमिक शिक्षणासाठी ते चंद्रपूरला आले. तिथे त्याना मराठी वृत्तपत्रे वाचण्याची आवड लागली. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या 'केसरी' तील लिखाणाचा त्याच्या तरुण मनावर परिणाम झाला व बहुधा त्यामुळेच ते नंतर स्वातंत्र्याच्या चळवळीकडे आकर्षित झाले. १९०४ साली विद्यार्थी संघाच्या वतीने नागपुरात भाषण देण्यासाठी त्यानी टिळकांना आमंत्रित केले. या प्रसंगी त्यांनी लोकमान्याना जवळून पाहिले. जाज्वल्य देशभक्ती व राजकारणामुळे बापूजी प्रथमपासूनच लोकमान्यांचे कट्टर उपासक होते. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील हजारो तरुण लोकमान्यांच्या प्रेरणेमुळे देशसेवेची शपथ घेत. बापूजी अणे त्यापैकीच एक होते.

१९२० पर्यंत राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्य इत्यादी चळवळीसाठी झालेल्या प्रत्येक आदोलनात बापूजीनी प्रामुख्याने भाग घेतला. १९०८ साली राजद्रोहाच्या आरोपाखाली लोकमान्यांना सहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली व त्यानंतर देशभर, विशेष करून महाराष्ट्रात दडपशाही सुरू झाली. तरी देखील बापूजींच्या कुशल नेतृत्वाखाली शिवजयंती, गणेशोत्सव यासारखे राष्ट्रीय उत्सव राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत ठेवण्यासाठी अतिशय उत्साहाने साजरे केले जात. लोकांच्या मनात राष्ट्रभक्तीची भावना टिकवून ठेवण्यासाठी बापूजी वेद-पुराणातील गोष्टीदेखील सांगायचे. 'हरकिशोर' व 'लोकमत' (यवतमाळहून प्रकाशित होणारे) यासारख्या वृत्तपत्रातील लेखातून त्याच्या जाज्वल्य देशभक्तीची व तडाखेबंद व्यक्तिमत्त्वाची झलक पहावयास मिळे. त्यांच्या लिखाणामुळे या वृत्तपत्राना अनामत रक्कम भरावी लागे.

लोकमान्य टिळकानी सुरू केलेल्या होमरूल लीग चळवळीशीही बापूजीचा जवळून संबंध आला. बापूजीच्या प्रभावामुळेच यवतमाळ जिल्ह्यास लीगचे सर्वाधिक समासद नोंदविण्याचा मान मिळाला. त्यानी लीगच्या कार्याविषयी विदर्भातच नव्हे तर पुणे, मुंबई, बेळगाव वगैरे ठिकाणी अनेक भाषणे केली.

१९२० मध्ये लोकमान्याच्या निधनानंतर चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधींना सांभाळावं लागलं. महात्माजीनी असहकार आंदोलन सुरू केले. न्यायालये व विविधमंडळांवर एक वर्ष बहिष्कार टाकण्यात आला. विधिमंडळावर बहिष्कार घालू नये असे स्पष्ट मत असून देखील त्यांनी शिस्तबद्ध अनुयायाप्रमाणे भरपूर मिळकत असलेला वकिली व्यवसाय एक वर्षासाठी बंद केला. मात्र त्यानी आपले स्नेही श्री. अण्णासाहेब जतकर याना बेरारहून विधान परिषदेची निवडणूक लढविण्यास तयार केले. सरकारी शाळांवर बहिष्कार घातलेल्यांसाठी त्यानी यवतमाळला राष्ट्रीय शाळा स्थापन केली. खादी व दारूबंदीसारख्या विधायक कार्यास त्यानी पूर्ण पाठिंबा दिला व दारूच्या दुकानापुढे धरणे धरण्यास मागेपुढे पाहिले नाही.

## प्रतियोगी सहकारिता

अहिंसा हा महात्माजीनी सुरू केलेल्या असहकार व सत्याग्रह आंदोलनाचा मुख्य आधार होता तर सापडेल त्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवायचे हे त्याचे उद्दिष्ट होते. लोकमान्याची चळवळ राजकीय स्वरूपाची तशीच व्यावहारिक होती. बापूजी अणे हे लोकमान्यांच्या प्रतिसादात्मक सहकार कल्पनेचे समर्थक होते व त्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.

१९२४ साली प्रथम त्यांनी 'स्वराज्य' पक्षाच्या तिकिटावर विधानसभेची निवडणूक लढविली व प्रचंड मताधिक्यानं ते विजयी झाले. पंडित मोतीलाल नेहरू हे केन्द्रीय विधानसभेत स्वराज्य विधिमंडळ पक्षाचे नेते होते तर बापूजींची प्रतोद म्हणून निवड झाली. दोघाना एकमेकांविषयी प्रेम वाटू लागले. १९२५ साली कै. लाला लजपत राय, प. मदनमोहन मालवीय व बॅ. मुकुंदराव जयकर याच्या

नेतृत्वाखाली नॅशनल पार्टीची स्थापना करण्यात आली. लोकमान्यांचे आणखी एक शिष्य श्री. न. चिं. केळकर यांच्यासह लोकनायक बापूजी अणेदेखील नवीन पक्षात दाखल झाले. नंतर 'केसरी' च्या संपादनाची जबाबदारी श्री. केळकरांवर सोपविली गेली. बापूजींनी नवीन पक्षाचे सचिव म्हणून काम केले व त्याकाळी पंडित मोतीलाल नेहरूंसारखे अनुभवी पक्षनेते त्यांच्याशी सल्लामसलत करीत. याच काळात बापूजींनी सायमन कमिशनवर बहिष्कार, भगतसिंग खटला लढविण्यात पुढाकार घेतला. स्वराज्याचे निवेदन तयार करण्याकरिता स्थापन केलेल्या सर्वपक्षीय समितीचे अध्यक्ष म्हणून पं. मोतीलाल नेहरूंची नेमणूक केली गेली. बापूजी या समितीचे सचिव बनले. स्वराज्यासाठी 'नेहरू अहवाल' म्हणून ओळखली जाणारी एक घटना तयार करण्यात आली. त्यात बापूजींचा वाटा काही कमी महत्त्वाचा नव्हता.

## 'स्वराज्यसेने'तील स्वयंसेवक

१९३० साली महात्मा गांधींनी कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचे आवाहन केले. महात्मा गांधींनी दाखविलेल्या मार्गाने पुढे जाणे हे आपले कर्तव्य आहे असे बापूजींचे ठाम मत होते. कारण लाखो लोकांना त्यात सामील करून घेण्याची शक्ती महात्माजीकडे आहे, तसेच स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशावर दडपण आणण्याची हीच सुवर्णसंधी आहे असे त्यांना वाटले. त्यामुळे बापूजींनी विधानसभेचा राजीनामा दिला व वीर वामनराव जोशी यांच्या 'स्वराज्य सेने' त स्वयंसेवक म्हणून ते दाखल झाले. परंतु कार्यकारिणीचे सभासद म्हणून त्यांची नेमणूक झाली व यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे त्यांनी जंगल-सत्याग्रह सुरू केला. त्यांच्या शेकडो अनुयायांनी सत्याग्रहात भाग घेतला.

बापूजींनी सहा महिने तुरुंगवास भोगला. नंतर काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक झाली. महात्मा गांधींनी काही काळानंतर वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. त्यात देखील बापूजींनी भाग घेतला. हळूहळू ती चळवळ थंडावली. ब्रिटिश सरकार मॅक्डोनल्ड अवॉर्ड स्वीकारून हिंदू व मुसलमान, तसेच हिंदू व हरिजन यांच्यात वैमनस्य निर्माण करण्यांचा प्रयत्न करत होते. हे अवॉर्ड बापूजींना अजिबात मान्य नव्हते म्हणून त्यांनी पंडित मदन मोहन मालवीयांच्या नेतृत्वाखाली 'नॅशनल पार्टी' ची स्थापना केली व विदर्भात काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराविरुद्ध निवडणूक जिंकून आपली बाजू बरोबर असल्याचे सिद्ध करून दाखविले. असे असूनदेखील त्यांच्या मनात महात्माजींविषयीचा आदरभाव कमी झाला नाही.

## अफलदायी बहिष्कार अमान्य

१९३९ साली जनमत न घेता भारतास दुसऱ्या महायुद्धात ओढल्याचा निषेध करण्यासाठी काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. बापूजींना हा अफलदायी बहिष्कार पसंत नव्हता, म्हणून त्यांनी केंद्रीय विधानसभेचा राजीनामा दिला नाही. त्यांनी युद्धप्रयत्नास पाठिंबा दिला. कारण त्यांना असे वाटत होते की, भारतीय सैनिकांनी या संधीचा फायदा घेऊन आधुनिक युद्धतंत्राची अधिकाधिक माहिती मिळवावी. प्रतिसादात्मक सहकार्याचे कट्टर समर्थक असल्याने १९४१ मध्ये व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेत बापूजी सामील झाले. मात्र उपोषण चालू असताना गांधीजींची सुटका करण्यास व्हाईसरॉयने नकार दिला त्यावेळी बापूजींनी सर होमी मोदी व श्री. नलिनी रंजन सरकार यांच्यासह सभासदत्वाचा राजीनामा दिला. अल्पकाळ सभासद असताना बापूजींनी ब्रह्मदेशातून आलेल्या भारतीय निर्वासितांना मदत केली. या भारतीयांना आज देखील त्यांचा विसर पडलेला नाही.

त्यानंतर काही दिवसांनी बापूजी सिलोनमध्ये भारतीय प्रतिनिधी म्हणून जाण्यास तयार झाले. तिथे वसलेल्या भारतीयांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

१९४७ मध्ये घटनासमितीचे सभासद म्हणून त्यांची निवड झाली परंतु नंतर लगेच बिहारच्या राज्यपालपदी त्यांची नेमणूक करण्यात आली. तिथे त्यांनी दुष्काळी परिस्थिती अत्यंत कौशल्यानं हाताळली. जमीनदारांचे हितसंबंध सांभाळण्यासाठी राज्यातील गरीब शेतकऱ्यांना धान्य दिले जात नसे. एका दुष्काळी भागाचा दौरा करीत असताना बापूजींनी गरीब जनतेस रेशन मिळेपर्यंत तेथून हलण्यास नकार दिला. असहाय महिला व मुलांना २४ तासात धान्य दिले नाही तर गंगेत उडी घेण्याची धमकी बापूजींनी दिली! धमकीचा योग्य तो परिणाम झाला, हे सांगायला नकोच.

## स्वतंत्र विदर्भ

देशाचे सामाजिक, आर्थिक व राजकीय हित लक्षात घेता छोटी राज्ये असावीत म्हणून विदर्भ राज्याच्या स्थापनेसाठी त्यांनी तयार केलेले निवेदन म्हणजे चिरस्मरणीय दस्तऐवज आहे. अनेक अडचणींस तोंड द्यावे लागूनही अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी यासाठी लढा दिला. या मुद्द्यावर ते दोन वेळा विदर्भातून लोकसभा-निवडणुकीत विजयी झाले.

त्यांच्या तरुणपणी भारतास स्वातंत्र्य मिळाले असते तर गुरु लोकमान्यांप्रमाणे त्यांनी आपला वेळ वेदात व धर्मविषयक अभ्यास व संशोधनात घालविला असता. राजकीय चळवळीप्रमाणेच विदर्भ साहित्य संघ, शारदाश्रम, महाराष्ट्र साहित्य परिषद, वैदिक संशोधन मंडळ, विदर्भ संशोधन मंडळासारख्या साहित्यक व सांस्कृतिक चळवळीत ते नेहमीच पुढे असत. परंतु लोकमान्यांचे खरे शिष्य असल्यामुळे लोकनायक बापूजींनी, देशहितासाठी या क्षेत्रातील आपली आवड बाजूला सारून सहकाराचा झेंडा घेऊन ते पुढे जात राहिले. लोकमान्यांशी त्यांचे इतके जवळचे संबंध होते की, अखेरची काही वर्षे ते लोकमान्यांचे चरित्र 'तिलक यशोर्णव' तीन खंडात संस्कृतमध्ये लिहीत होते.

अशा तऱ्हेने लोकमान्यांचे प्रमुख शिष्य सर्वश्री न. चिं. केळकर, काकासाहेब खाडिलकर, गंगाधरराव देशपांडे, डॉ. मुंजे, डॉ. बाबासाहेब परांजपे, वीर वामनराव जोशी व इतरांच्या तुलनेने बापूजी सर्वात पुढे होते. कारण लोकमान्यांची ध्येये सतत त्यांच्या नजरेसमोर असत व मन लावून तसेच निर्भयपणे त्यांचे ते पालन करीत असत. □

# अर्धा-अर्धा तास अहवाल-वाचन करून आपण काय मिळवतो ?

## ☐ विद्यापीठाचा वर्धापनदिन

मराठवाडा विद्यापीठाचं आवार पाहिल्यावर माझ्यासारख्या पुणेरी माणसाचा अहंकार सुद्धा नाही म्हटलं तरी पातळ झालाच. भव्य प्रवेशद्वार, गुळगुळीत सुंदर रस्ते, दाट झाडी, देखण्या इमारती — सगळं कसं पॉश — मी आपला इतके दिवस पुणे विद्यापीठाच्या रम्य परिसराबद्दल अतोनात अभिमान बाळगून होतो! (अजूनही तो आहेच म्हणा; पण त्याला काही इलाज नाही. पुणेरी रसायनाचा तो प्रभाव आहे. अगदी पॅरिसला गेलो तरी तो कायमच राहणार!) — तर मराठवाडा विद्यापीठात २३ तारखेला विद्यापीठाचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला तेव्हा गेलो होतो. वास्तविक विद्यापीठाचा वर्धापनदिन म्हणजे बऱ्यापैकी पब्लिक (म्हणजे गर्दी) जमायला पाहिजे; पण म्हणावी तितकी गर्दी नव्हती. हॉलच मुळात फारसा मोठा नव्हता. त्यातच एक लांब-रुंद बैठं स्टेज. सभोवती अनेक कुंड्या. लाल, निळा, पिवळा असे रंगीबेरंगी स्पॉटस टाकून उगीचच नाट्यमय वातावरणाचा आभास निर्माण केलेला. असं वाटावं की, एकदम तिसरी घंटा वाजायला लागेल! विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांची लगबग चाललेली. बाकी कार्यक्रम विद्यापीठाचा असो की, गणेशोत्सवातला, शेवटच्या क्षणापर्यंत धावपळ, गडबड ही झालीच पाहिजे. बरोबर पावणेअकरा वाजता प्रमुख पाहुणे सिकंदरअली अलावजद आणि कुलगुरु भोसले आले. सिकंदरअली म्हणजे अगदी टिपिकल उर्दू शायर. लांब शेरवानी, चुणीदार, डोक्याला मुसलमानी टोपी आणि ती आदबशीर 'आदाब-अर्ज.' मात्र त्यांच्या दर्शनानं पडलेला छाप भाषणानं पार पुसून टाकला. सुमारे पाऊण तासाच्या रटाळ भाषणात आपण *उस्मानिया विद्यापीठात कसे गेलो,* त्या वेळी आपले शिक्षक कोण होते, विद्यार्थ्यांना अभ्यासाची कशी गोडी होती हे त्यांना इतकं घोळून घोळून सांगितलं की, शेवटी इथल्या सोशिक विद्यार्थ्यांचीही सहनशक्ती संपली आणि पुणेरी पद्धतीनं त्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. (अर्थात बसता बसताही सिकंदरअलींनी आणखी १५ मिनिटं पिळलं हा भाग वेगळा.) सुरुवातीला कुलगुरु डॉ. भोसले यांना सिकंदरअलींचा परिचय करून दिला. डॉ. भोसले हे हिंदी प्रदेशात वाढलेले. त्यांना अस्खलित प्रवाही मराठी बोलता येत नाही हे विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना ठाऊक असूनही हे परिचयात्मक मराठी भाषण कुलगुरूंना वाचावं लागलं याचं आश्चर्य वाटलं. वास्तविक प्रमुख पाहुण्यांचा परिचय कुलगुरूंनीच करून दिला पाहिजे असं नाही. एखाद्या अधिकाऱ्यावर किंवा प्राध्यापकावर ही जबाबदारी सोपवता आली असती. तीच गोष्ट अहवालवाचनाची. एकदा या अहवालवाचनाच्या प्रकरणाचा सोक्षमोक्ष आपण लावलाच पाहिजे. अर्धाअर्धा तास अहवालवाचन करून आपण काय मिळवतो ? हा सगळा प्रकार इतका कंटाळवाणा आणि निरर्थक असतो की, प्रत्यक्ष अहवाल वाचून दाखवणारा सुद्धा अपराधी चेहऱ्यानं घाम पुसत खाली बसतो. या समारंभात सुद्धा अहवालवाचन हे रीतीला धरून पीळदार, रटाळ झालं. सोपा सुटसुटीत समारंभ कसा करावा याचे क्लासेस् पुलंनी घ्यावेत अशी जाहीर विनंती करावीशी वाटते. विद्यापीठाच्या वर्धापनदिनाचा समारंभ तब्बल दोन तास चालला आणि तरीही सर्व विद्यार्थीवर्ग शेवटपर्यंत थांबला होता याचं रहस्य नंतर कळलं — समारंभानंतर नाटकाचा आणि करमणुकीचा कार्यक्रम होता!

¤

## ☐ पथनाट्य

महाराष्ट्र टाइम्सकारांनी स्ट्रीट प्लेची कितीही थट्टा केलेली असली तरी लोकजागृतीचं एक प्रभावी साधन म्हणून स्ट्रीट प्लेचा उपयोग होऊ शकतो हे मान्य व्हायला हरकत नसावी. औरंगाबादेत २५ तारखेला वसंतराव नाईक महाविद्यालयात यंग डिबेटर्स असोसिएशन या संस्थेनं सादर केलेली दोन पथनाट्यं पाहण्याचा योग आला. प्रेक्षकवर्गात अस्मादिक आणि प्राचार्य राठोड वगैरे-सारख्या धुरंधर व्यक्तींबरोबरच तिथल्या वसतिगृहातले विद्यार्थीही होते. ही बहुतेक सर्व मुलं ग्रामीण भागातली. संध्याकाळच्या रसरशीत गार हवेत मोकळ्या पटांगणात पथनाट्यं करण्यात आली. एक ढोलकी सोडली तर बाकी एकही वस्तू न घेता यंग डिबेटर्संना भन्नाट पथनाट्यं केली. चाल आणि लवचिक हालचाली, साधेच पण खटकेबाज संवाद आणि भेदक उपहास यामुळे ही दोन्ही पथनाट्यं लक्षात राहिली. पहिलं पथनाट्य विधानसभा निवडणुकांच्या वेळी बसवण्यात आलं होतं. पुढाऱ्यांचा दांभिकपणा, स्वार्थ, व्यापारी आणि राजकारणी यांचं साटंलोटं आणि सामान्य माणसाची अगतिकता या नाट्यात फार छान मांडली. दुसरं नाटक हे स्वातंत्र्यदिनाविषयी होतं. १५ ऑगस्टला ते दोन ठिकाणी सादर करण्यात आलं. *स्वातंत्र्यदिन साजरा करण्यामागचा आपला* बंद गळ्याच्या जोधपुरी कोटातला उसना उत्साह, त्यातला तोचतोपणा, तीच परंपरागत भाषणं ह्या सर्वांचा अतिशय जळजळीत उपहास करण्यात मंडळी यशस्वी झाली. विशेषतः शेवटी शेवटी 'भारत माझा देश आहे' या क्रमिक प्रतिज्ञेच्या फार छान वापर केला होता. ही प्रतिज्ञा आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यातला फरक स्पष्ट करण्यासाठी राम दुतोंडे या तरुण कवीच्या एका बोचऱ्या कवितेचा वापर करायची कल्पना तर फारच मस्त होती! चंद्रकांत कुलकर्णी, नंदकिशोर देशमुख, श्रीधर गवळी, देवदत्त पवार, बळीराम पवार वगैरे यंग डिबेटर्सच्या मुलांनी ही पथनाट्यं बसवताना घेतलेले परिश्रम जाणवत होते. मात्र प्रत्यक्ष रस्त्यावर अचानकपणे प्रयोग करताना या पथनाट्याचं स्वागत कसं झालं ते माहीत नाही. मला स्वतःला काही गोष्टी

खटकल्या. एक म्हणजे ही पथनाटचं थोडी लांबलेली वाटली. पथनाटच हे बरेच आखूड आणि कॉन्सन्ट्रेटेड हवं. अर्धा–अर्धा तास चालणारं पथनाटच पाहायला अगदी औरंगाबादेतसुद्धा किती लोक थांबतील? दुसरं म्हणजे काही काही पात्राचे आवाज हे भलतेच कोमल वाटले. रस्त्यावर करायचं नाटक हे आसपासच्या धडधडाटावर आवाज काढूनच करावं लागणार आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पथनाटच हे नेहमी उपहासात्मकच असलं पाहिजे का? थट्टा आणि टिंगल याना सामान्यपणे चागला प्रतिसाद मिळतो हे खरं असलं तरी त्याशिवाय पथनाटच होऊच शकणार नाही का? मुंबईत 'जागर' नावाची एक संस्था पथनाटच करते. त्यांच्या एका प्रमुख कार्यकर्त्याशी बोललो. तेव्हा त्याची पथनाटचंसुद्धा अशीच विडंबनात्मक आणि टोप्या-उडवू असण्याचं लक्षात आलं. पथनाटचांनी देखील विविध स्वरूपाचे विषय हाताळायला हरकत नसावी. पथ-पथनाटचामध्येसुद्धा प्रयोगशीलतेचं वावडं नसावं.

¤

## 'अनुष्टुभ्' कथा-स्पर्धा

- या कथा–स्पर्धेसाठी पहिल्या तीन कथांना रु. ५००, रु. ३०० व रु. २०० अशी 'रेऊ' पारितोषिके. कथा या दिवाळी अंकात प्रसिद्ध होतील.
- स्पर्धेसाठी वयाची, प्रवेश–फीची अट नाही. कुणालाही भाग घेता येईल.
- कथा अनुवादित नसाव्यात. पूर्वी प्रसिद्ध झालेल्या नसाव्यात. विषयाचे, शब्दसंख्येचे बंधन नाही.
- जास्तीत जास्त दोन कथा पाठवता येतील.
- कथा अर्ध्या कागदाच्या (फूल स्कॅप साईझ) एकाच बाजूला, समास सोडून सुवाच्य अक्षरात/टंकलिखित असाव्यात— परीक्षकाच्या सोयीसाठी प्रत्येकी तीन प्रतीत. पातळ कागदावरच्या कार्बन प्रतीही चालतील.
- कथेवर लेखकाचे नाव नको. ते स्वतंत्र चतकोर कागदावर कथेच्या नावासह व संपूर्ण पत्त्यासह लिहून तो कागद सोबत जोडावा. वरती लिफाफ्यावर 'कथास्पर्धेसाठी' असा निर्देश असावा.
- परतीसाठी/निर्णयासाठी पुरेसे पोस्टेज असलेला व स्वत:चा पत्ता लिहिलेला दुसरा लिफाफा साहित्यासोबत पाठविणे आवश्यक आहे.
- कथा पाठविण्याची अंतिम मुदत २० सप्टेंबर ८० ही आहे.
- कथा पाठविण्याचा पत्ता: 'अनुष्टुभ्' द्वारा–प्रा. पुरुषोत्तम पाटील, वेडसे बिल्डिंग, वाडी भोकर नाका, देवपूर, धुळे. (४२४००२)

## नांदापूरकर व्याख्यानमाला

मराठवाडा साहित्यपरिषदेत नांदापूरकर व्याख्यानमालेत २२, २३, २४ ला डॉ. संभाजी भोसले याची व्याख्यानं होती. विषय होता 'महात्मा फुले–वाङ्मय आणि कार्य.' अध्यक्ष होते. प्रा. गंगाधर पानतावणे–प्राचार्य नरहर कुरुंदकर यानी प्रास्ताविक भाषणात आपल्या नेहमीच्या घणाघाती पद्धतीने फड मारला (बाकी आसपास आदरभावानं श्रोतृवर्ग बसलाय् आणि आपण बोलतोय् ही नशा काही औरच!) महाराष्ट्रात विविध नेत्याच्या जीवनाचा चिकित्सक, वस्तुनिष्ठ पद्धतीनं अभ्यास होण्याची गरज आहे, (म्हणजे आत्तापर्यंत डॉक्टरेटच्या निमित्तानं जे सशोधन, लेखन झालं ते सगळं भाबडंच म्हणायचं!) या उद्देशानं ही व्याख्यानं आयोजित केली आहेत असं कुरुंदकरानी सागितलं. आणखी एक उद्देश या व्याख्यानमालेमागं होता. हल्ली महात्मा फुल्याचं वाङ्मय बऱ्याच ठिकाणी अभ्यासक्रमात लावलं जात आहे; पण त्यावर आवश्यक तेवढा अभ्यास आणि लिखाणच झालेलं नाही. डॉ. भोसले यांनी पहिल्या दिवशी महात्मा फुल्याचं चरित्र थोडक्यात सागितलं. वास्तविक प्रौढ विद्यार्थ्यांकरता ही व्याख्यानं होती. फुल्यांनी आपला हौद अस्पृश्यांकरता खुला केला किंवा स्त्रियांकरता पहिली शाळा उघडली वगैरे गोष्टी भोसल्यानी गृहीत धरायला हव्या होत्या. दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी मात्र त्यानी फुल्यांचं विचारवैभव, त्याची वाङ्मयीन निर्मिती त्यातून जाणवणारा त्याचा सडेतोड विज्ञानवादी दृष्टिकोन वगैरे उत्तम विवेचन केलं. त्या वेळच्या काळाच्या सदर्भात फुल्यांच्या वाङ्मयाचं स्वागत कसं झालं हेही त्यांनी स्पष्ट केलं; पण सर्व भाषणात ब्राह्मणांना आपण दुखावत तर नाही ना, याची काळजी लागल्यागत भोसले बोलत होते. वास्तविक महात्मा फुल्यांनी त्या वेळच्या ब्राह्मणवर्गाला यथास्थित आणि यथार्थ झोडपलं, त्यात वावगं काहीच नव्हतं हे ठणकावून सागायला हरकत नव्हती. भोसल्यानी आता ब्राह्मणाची पुरोहितशाही संपून मराठ्यांची एक नवीन शाही सुरू झाल्याची खणखणीत घोषणा केली. (पुण्यात पश्चिमेकडे यामुळे सुखद झुळूक वाहायला हरकत नाही!) भाषणात त्यानी एकदा फुल्यांच्या आकलनशक्तीला मर्यादा होत्या आणि त्यांची भाषा ही राकट, रागडी, खडबडीत, अशुद्ध होती हे मुद्दे माडले होते. त्यावर मात्र अध्यक्ष पानतावणे अगदी पूर्ण आवेशात तुटून पडले. फुल्याची आकलनशक्ती किती जबरदस्त होती आणि राकट, अशुद्ध मराठी भाषा ही त्यानी सामान्य माणसाशी जवळीक साधण्यासाठी कशी हेतुत: वापरली होती हे अनेक समर्पक उदाहरणं देत पानतावण्यानी सिद्ध केलं. खरं म्हणजे त्यांना आणखी खूप बोलायची इच्छा होती; पण बराच उशीर झाला होता. १००-१२५ वर्षांपूर्वीच्या घराण्यातली ज्ञानाची कोणतीही परपरा नसलेल्या ज्योतिबा फुले नावाच्या एका चारचौघासारख्या दिसणाऱ्या माणसान इतका मूलभूत, विविधागी आणि १०० वर्षांपुढचा विचार कसा केला याच स्पष्टीकरण मात्र भोसले किंवा पानतावणे यापैकी कुणीही केलं नाही. या दिशेनेसुद्धा थोडं विवेचन करणं आवश्यक होतं अशी रुखरुख कायम राहिली.

—भालचंद्र जोशी

# श्वेतक्रांतीचा बारा कलमी कार्यक्रम वाचायला छान होता; पण नमाझींचे फार्म प्रोजेक्ट आणि श्वेतक्रांतीची बारा कलमे ह्यांचा ताळमेळ कसा घालायचा ?



लेखक : विजय परुळकर । लेखांक : पाचवा

आगा-ए-नमाझी ह्या तथाकथित गांधीवादी सामाजिक कार्यकर्त्यांची दोनशे हेक्टर बागायती शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं त्यांनी निर्माण केलेलं 'फार्म प्रोजेक्ट' नावाचं नंदनवन पाहून, मनात अनेक प्रश्नांचा गुंता घेऊन मी शहाअब्बास हॉटेलवर परतलो. हॉटेलच्या लॉबीमधील एका भपकेबाज दुकानातून इराणवरील दोनतीन महागडी पुस्तकं खरीदली आणि खोली गाठली. वॉश घेऊन कपडे बदलले आणि स्कॉचचा पेला घेऊन भिंतीवरील तैलचित्रातील 'मस्तानी' कडे पहात बसून राहिलो.

स्कॉचच्या घुटक्यानं शीण हलका होत राहिला; पण प्रश्नांचा गुंता सुटेना. विकास म्हणजे काय ? प्रगती म्हणजे काय ? आधुनिक म्हणजे काय ? श्रद्धा कशाला म्हणायचं ? अंधश्रद्धा म्हणजे काय ? सर्वच प्रश्न कठीण ! पंचतारांकित हॉटेलच्या 'रंडीबाज' खोलीत जॉनी वॉकरचे घुटके घेऊन ह्या प्रश्नांची उत्तरं सापडणार आहेत का ? हा प्रश्न तर सर्वात कठीण आणि नको असलेला. सरतेशेवटी हे जग मिथ्या आहे, हा सर्व मायेचा खेळ हेच खरं. प्राचीन-अर्वाचीन प्रगत-अप्रगत हे सर्व सापेक्ष आहे. आपण आपलं 'कर्म' करीत रहायचं; पण कर्म म्हणजे काय ? उगाचच मग एक वचन आठवलं 'यत् क्रियते तत् कर्म' आणि काही प्राचीन मराठी वाक्ये मनात घुमु लागली-

'कर्म म्हणितलिया व्यवसाय रूप. जयासी जो उद्यमु तिये जातीचा व्यवसावो. अन्य ते कला. चमत्कारु, वेदशास्त्र, ज्योतिष, वैद्यक मुख्य. जेतुलेहि पोट भरावयाचे उपाये त्याते कर्म शब्द बोलिजे-'

दोनशे हेक्टर बागायत करून त्याग आणि देशसेवा हे आगा-ए-नमाझींचे कर्म. आंतराष्ट्रीय संस्थेची नोकरी करून, पंचतारांकित हॉटेलात बसून, स्कॉचचे घुटके घेत नमाझींचे नंदनवन पाहून मनात निर्माण झालेल्या प्रश्नांचा गुंता सोडविणे हे आमचे कर्म ! कर्मण्येवाधिकारस्ते हेच खरं.

मनात आलं बायकोला पत्र लिहावं. टेबलावरील पॅडवर शहा अब्बासची भारी स्टेशनरी वाट पहातच होती. पॅडशेजारी कलमदान. मी उजव्या हाताच्या कोपऱ्यात तारीख घातली. 'इस्फहान १९७२' आणि मायना लिहिला 'प्रिय सरोजा'-

-व्हिस्कीचा ग्लास संपला होता. भरायला उठलो. पत्राचा कागद मायन्यानंतर तसाच खोळंबून राहिला. लिहिण्याची इच्छाच होईना ! नुकतंच विकत घेतलेलं इराणवरील एक पुस्तक मी चाळू लागलो.

प्राचीन पर्शियाचा महाबलाढ्य सम्राट शहेनशहा दारियुष (दरायस) ह्यानं इराणमधील एका भव्य पहाडाच्या कातळावर काही ओळी कोरल्या होत्या-

'सर्वत्र माजलेल्या स्वैराचाराला आळा घालून मी उचित, लाभदायक सुविधा निर्माण केल्या...एक महत्त्वाकांक्षी योजना आखली आणि ती अंमलात आणण्यात दैदीप्यमान यश संपादन केलं-'

ह्या पर्शियन सम्राट दारियुषच्या कारकीर्दीनंतर काही हजार वर्षांचा काळ लोटला आणि पहेलवी घराण्याचा दुसरा महत्त्वाकांक्षी सम्राट शहेनशहा मोहम्मद रेझा पहेलवी ह्यानं 'शिषोमे बहमान' म्हणजे बहमान महिन्यातील सहाव्या दिवशी २६ जानेवारी १९६२ रोजी अडीच तीन कोटी इराणी प्रजेला विश्वासात घेऊन, 'शहा आणि प्रजा' ह्यांनी एकत्र येऊन 'श्वेतक्रांती' करण्याची घोषणा केली. म्हणजेच तसं 'फर्मान' काढलं. फर्मान म्हणजे एक प्रकारचा 'आदेश'. एखाद्या राजानं स्वतःच्या प्रजेशी हातमिळवणी करून स्वतःच्याच राज्यात 'क्रांती' करण्याची घोषणा करणं हा प्रकार जगा-

वेगळाच म्हणावा लागेल. देशामध्ये तेव्हा कदाचित परिस्थितीच अशी काही विचित्र असण्याची शक्यता आहे की, ज्यामुळे खुद्द राजालाच प्रजेच्या सहाय्यानं 'क्रांती' करण्याची जरूर भासली असावी. २६ जानेवारी १९६२ रोजी शहेनशहा मोहम्मद रेझा पहेलवी देशाला उद्देशून म्हणाला—

'इराणमध्ये विसाव्या शतकाच्या सुरुवातीला संसदीय कायदेकानू, प्रजासत्ताक राज्य आणि प्रजाभिमुख सुधारणा ह्याबद्दल अनेक 'कानाला गोड आणि वाचायला छान' असे उच्च दर्जाचे सुविचार मांडण्यात आले; पण दुर्दैवानं हे सर्व सुविचार केवळ पुस्तकातच राहिले. उदात्त विचार आणि प्रत्यक्ष कार्य ह्यांच्यामधील तफावत वाढत गेली. माझा बाप रेझा शहा—बुजुर्ग, ज्यानं पहेलवी घराण्याची स्थापना केली, त्यानं इराणला प्रगतिपथावर आणण्यासाठी आधुनिक अर्थशास्त्र आणि तंत्रज्ञान ह्यांच्या सहाय्यानं, आमजनतेच्या कल्याणासाठी, अनेक महत्त्वाकांक्षी आणि धाडसी योजनांची आखणी केली—पण दुर्दैवानं ह्या योजनांची अंमलबजावणी सार्वलौकिक पद्धतीनं न होता ती पारंपारिक जागीरदारी प्रवृत्तीना पोषक अशा सरंजामशाही तत्त्वानुसार होत राहिली. मूठभर बडे जमीनदार, धनाढ्य व्यापारी आणि रक्तपिपासू दलाल ह्यांच्या मर्जीवर देशातील करोडो सामान्य लोकांचं दैनंदिन जीवन आणि भवितव्य अवलंबून राहिलं. इराणमधील बहुसंख्य गरीब जनतेला ह्या गुलामगिरीतून मुक्त केल्याशिवाय इराण एक राष्ट्र म्हणून कधीच प्रगत होणार नाही आणि त्यासाठी आज क्रांतीची आवश्यकता आहे. फरक इतकाच की, ही 'क्रांती' कुणाच्याही रक्ताचा एक थेंब देखील न सांडता केली जाईल! राजा आणि प्रजा ह्यांनी एकत्र येऊन देशासाठी केलेली ही 'श्वेत क्रांती' असेल. प्रत्येक इराणी ह्या क्रांतिपर्वानंतर एक स्वाभिमानी नागरिक बनेल. मूठभर बडे जमीनदार आणि धनाढ्य व्यापारी ह्यांनी निर्माण केलेली गुलामगिरी संपूर्णपणे आणि कायमची नष्ट केली जाईल...इराण खऱ्या अर्थानं स्वतंत्र होईल आणि प्रजासत्ताक पद्धतीनं 'राजा आणि प्रजा' एकत्रित येऊन देशाला महान संस्कृतीप्रत नेतील! ...'

## बारा कलमी क्रांती

जगामधील सर्व अविकसित(?!) आणि विकासक्षम(?!)देशातील नागरिकांच्या सुप्तभावना आपण प्रकटपणे उघड करीत आहोत असं इराणच्या ह्या शहेनशहाला श्वेतक्रांतीची घोषणा करत असताना मनोमन वाटत असावं ह्याबद्दल माझ्या मनात संशय नाही. हा शहेनशहा ज्या मूठभर बड्या जमीनदार व्यापारी आणि रक्तपिपासू दलालांचा उल्लेख करत होता ते केवळ इराणी नव्हते—ते आंतरराष्ट्रीय देखील होते. रशिया, युरोप आणि अमेरिका अशी त्यांची नावे अनुक्रमे सांगता येतील.

'विकसित आणि अविकसित' ह्याबद्दल मात्र ह्या शहेनशहाच्या विचारसरणीत काहीसा गोंधळ असावा. आम्हा हिंदवासियांमध्ये आहे तसा. एकीकडे औद्योगीकरण, दुसरीकडे महान संस्कृती, परंपरा आणि चालिरीती. श्रेष्ठ कुठले कनिष्ठ कुठले ह्याबद्दल प्रचंड गुंता. इराणमध्ये सामान्य माणसाचा प्रवास गाढवावरून, भारतीयाचा बैलगाडीतून, युरोपियन-अमेरिकी लोकांचा आठ सिलिंडरच्या 'स्पोर्टस् कार' मधून. गाढव श्रेष्ठ का मोटार श्रेष्ठ, गाढवावर बसलेला शहाणा की मोटारीतून सुसाट जाताना इंधन जाळणारा शहाणा? दुर्दैवानं, औद्योगिकदृष्ट्या प्रगत अशा अवर्ण जमातीच्या विचारसरणीचा (म्हणजेच युरोप—अमेरिका येथील अत्यंत महत्त्वाकांक्षी, विश्वसाम्राज्य स्थापन करण्याचं स्वप्न सदोदित उराशी बाळगणाऱ्या, राजकारणी—फौजी वृत्तीच्या नागरिकांच्या विचारसरणीचा) एक विचित्र प्रभाव सर्वत्र तथाकथित अविकसित राष्ट्रांच्या नेत्यांच्या आणि त्या राष्ट्रातील तथाकथित बुद्धिप्रामाण्यवादी नागरिकांच्या आचार—विचारात सदैव जाणवतो, त्यातून ह्या सर्व देशाच्या सार्वजनिक मनोवृत्तीत निर्माण होत असलेला एक भयानक आत्मघातकी न्यूनगंड वारंवार डोके वर काढू लागतो. स्वतःच्या देशानं पाश्चिमात्य औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांच्या खांद्याला खांदा लावून उभं रहावं, हे रेझाखान ह्या कोसॅक फलटणीतील एका मनस्वी हवालदाराचं स्वप्न त्याचा मुलगा इराणचा शहेनशहा मोहम्मद रेझाशहा पहलवी ह्यानी मूर्त स्वरूपात आणण्याचं ठरवलं आणि त्यातून 'श्वेत क्रांतीचा' जन्म झाला!

ह्या श्वेतक्रांतीचं वर्णन करताना एक इराणी 'भाट' म्हणत होता—'इराणमधील ही धवलक्रांती म्हणजे सर्वसामान्य जनतेच्या आर्त हाकेला विधात्यानं दिलेला प्रतिसाद! कुठल्याही प्रगतिशील (पण अविकसित) राष्ट्राच्या तळगाळाच्या समस्यांचा एकत्रित विचार करून त्या समस्या सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे 'श्वेतक्रांती!' इराणमधील 'राजा आणि प्रजा' ह्यानी घोषित केलेल्या क्रांतीमागील प्रेरणा पाश्चिमात्यांच्या अनुभवावर किंवा विचारसरणीवर आधारित नाहीत इराणची महान संस्कृती आणि पारंपारिक चालीरीती ध्यानात घेऊन ह्या क्रांतीची मूलभूत तत्त्वे आणि दिशा ठरविण्यात आली आहे. असे असून देखील ही मार्गदर्शक तत्त्वे केवळ इराणी प्रजाजनापुरतीच मर्यादित नाहीत—सर्व अविकसित राष्ट्रांना इराणकडून मार्गदर्शन होण्यासारखी ही सूत्रे आहेत. केवळ इराणी नागरिकांची प्रगती व्हावी अशा संकुचित हेतूनं श्वेतक्रांती जन्मास आलेली नाही, तर सर्व मानवजातीचं कल्याण व्हावं ह्या तळमळीनं शहेनशहानं ह्या क्रांतीची आखणी केली आहे...वगैरे वगैरे वगैरे.'

आपल्याला १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं. त्यानंतर आपण पंचवार्षिक योजना, पंचशील वगैरे धंदे सुरू केले तेव्हा नेहरू घराण्याचे 'भाट' वरीलप्रमाणेच लिहायचे, बोलायचे ह्याची एकाएकी आठवण झाली. आणि गंमत वाटली. इराणच्या शहेनशहाच्या श्वेतक्रांतीची १२ कलमे खालीलप्रमाणे होती—

: रयतदारीचा बीमोड. जमिनीच्या मालकी हक्काच्या कायद्यात सुधारणा, बड्या जमीनदाराकडील कुळांना जमिनीचे वाटप.

: जंगलांचे राष्ट्रीयीकरण, जंगलसुधारणा आणि वनस्पतीच्या दुरुपयोगावर कडक नियंत्रण.

: सरकारी कारखानदारी कमी करून खाजगी आणि सहकारी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन. बड्या जमीनदारांना उद्योगधंद्यात शिरण्यास प्रोत्साहन आणि सवलती.

: निवडणूककायद्यात बदल. स्त्रियांना मतदानाचा हक्क आणि नोकरीधंद्यात समान हक्क.

: शालांत परीक्षेनंतर सुशिक्षित तरुणांना दोन वर्षे सक्तीची देश: सेवा. शिक्षण सैनिक म्हणून अशा तरुणाद्वारा खेड्यामध्ये प्राथमिक शिक्षणाचा आणि प्रौढशिक्षणाचा प्रसार.

: तरुण डॉक्टरांद्वारा आरोग्यपथकांची स्थापना. आरोग्यसैनिकांद्वारा खेड्यापाड्यातून मोफत आरोग्यसेवा.

: शेतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी कृषि-सैनिकाचे पथक.

: खेड्यामधील बारीकसारीक खटले तावडतोब मिटवले जावेत आणि सर्वांना तत्परतेनं न्याय मिळावा म्हणून पंचायती कोर्टांची स्थापना.

: पाण्याचे राष्ट्रीयीकरण आणि सर्वांना समान तत्त्वावर वाटप.

: खेड्याचं आणि शहरांचं आधुनिकीकरण. शहर आणि खेडं ह्यातील रहाणीमानातील तफावत दूर करण्यासाठी सर्वत्र समान सोयी.

: देशातील सरकारी यंत्रणेत व शिक्षणपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल. स्थानिक पातळीवर स्वतंत्रपणे निर्णय घेऊन विकासयोजना राबविण्यासाठी खास सवलती.

श्वेतक्रांतीचा बारा कलमी कार्यक्रम वाचायला छान होता; पण 'उदात्त विचार आणि प्रत्यक्ष कृती ह्यामधील तफावत' ह्याबद्दल काय? आगा–ए–नमाझीचं फार्म प्रॉजेक्ट आणि श्वेतक्रांतीची बारा कलम ह्याचा ताळमेळ कसा घालायचा? मला वाटतं आपल्या पंचवार्षिक योजनांचा बारकाईनं अभ्यास केला तर तिथं देखील ह्याच प्रकार ध्यानात येईल. मनात पुन्हा प्रश्नांचा गुंता झाला!

## विकासातील लबाडी

विकासयोजना नेहमी अशा स्वरूपातच का पहावयास मिळतात? विकास कुणाचा घडतो? प्रगती कुणाची होती? जे चाललंय, ज्याच्या नावानं चाललंय ते कशासाठी? 'त्या' च्या भल्यासाठी का 'स्व' च्या फायद्यासाठी? सगळेच प्रश्न कठीण!

कुठलीही विकासयोजना असो–खासगी किंवा सरकारी; ग्राम–तालुका पातळीची किंवा राष्ट्रव्यापी अगर आंतरराष्ट्रीय त्या योजनेच्या 'प्रॉजक्ट डॉक्युमेंट' साठी एक खास भाषा वापरली जाते. ह्या योजनांचे कागदो नकाशे बनविण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. कुणी ही पद्धत सुरू केली कुणास ठाऊक; पण अगदी कृष्णशिष्टाईच्या काळापासून ती अस्तित्वात असावी असं वाटतं.

तर होतं काय काही तरी कारणानं काही व्यक्ती एकत्र येतात. सर्वसाधारपण ह्या व्यक्ती देशातील राजधानीच्या स्थळी वास्तव्य करणाऱ्या किंवा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात वावरणाऱ्या असतात. खेड्यातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील व्यक्तींनी एकत्र येऊन फारसा उपयोग होत नाही, तर एकत्र येणाऱ्या व्यक्ती सरकारी नोकरी, खाजगी व्यवसाय, व्यापार किंवा पितृकृपेमुळे निरुद्योग वगैरेत रमणाऱ्या असतात. त्यांना जेव्हा वाटू लागतं की 'सामान्य माणसासाठी' आता काही तरी केलं पाहिजे तेव्हा त्यांच्या विचारमंथनातून एखाद्या विकासयोजनेचा जन्म होतो. प्रत्येक व्यक्तीच्या जन्माची कथा जशी अद्भुत–उदाहरणार्थ द्रोणाचार्यांच्या जन्माची, भरताच्या जन्माची–तशीच ह्या सर्व विकास कल्पनांच्या जन्माची कहाणी अद्भुतरम्य असते.

एकदा कल्पना जन्मास आली की ती मूर्तस्वरूपात आणण्यासाठी अर्थातच 'अर्था'ची गरज निर्माण होते. आता हे द्रव्य आणायचं कुठून? कसं मिळवायचं? तर त्याच्या काही खास पद्धती आहेत. ज्यांना ह्या पद्धती माहीत असतात त्यांच्याकडे मग कल्पनेचं रूपांतर 'प्रॉजेक्ट डॉक्युमेंट'मध्ये करण्याचं काम सोपवलं जातं.

एकदा कागदपत्र तयार झाले की मग मूळ कल्पना काढणाऱ्यांनी एकत्र जमून स्वत:च्या 'स्व'शी आणि इतरांच्या 'स्व'शी करार करायचा. त्यातून 'विश्वस्त मंडळ', 'ट्रस्ट' किंवा 'फाउंडेशन' तयार होतं. म्हणजेच जन्मलेल्या बाळाचं बारसं होऊन ते बाळसं धरू लागतं. आता 'ट्रस्ट' म्हणजे विश्वास–पण विश्वास कुणाचा कुणावर? तर मंडळातील सभासदांचा एकमेकांवर हे सर्वप्रथम आणि सरकारी कायद्याचा मंडळावर. सर्वसामान्य लोकांचा, म्हणजे ज्यांच्यासाठी हे 'विश्वस्त' 'प्रतिष्ठान' फाउंडेशन' वगैरे उभं राहणार आहे त्यांचा, मंडळातील सभासदांवर आणि त्यांना मान्यता देणाऱ्या सरकारी कायद्यावर खरोखरचा विश्वास आहे का? त्याबद्दल विचार करण्याची आवश्यकता मात्र कुणालाच वाटत नाही. ज्यांच्या कल्याणासाठी 'ट्रस्ट' उभा करण्यात आला 'त्यांचा' विश्वास संपादन करण्याची तसदी कुठलाच 'ट्रस्ट' सहसा घेत नाही. एखाद-दुसरा अपवाद असेल, नाही असं नाही. त्यामुळं निदान नियम तरी सिद्ध करता येईल. आता ह्या 'ट्रस्ट' किंवा 'फाउंडेशन'करिता द्रव्य जमविण्यासाठी जी विकासयोजना लिहावी लागते तिची भाषा फार गमतीशीर असते. रुपेरी कागदावर सोनेरी अक्षरात लिहिलं जातं–

जगातील बहुसंख्य लोक अजून खऱ्या अर्थानं 'स्वतंत्र' झाले नाहीत. भारतामधील (किंवा इराणमधील, ब्राझीलमधील...इंग्लंड-अमेरिकेमधील?) बहुसंख्य नागरिक विसाव्या शतकातील आधुनिक शास्त्राचा पुरेपूर लाभ उठविण्यास असमर्थ आहेत. हे बहुसंख्य सामान्यजन विकास आणि प्रगतीपासून वंचित आहेत.

आम्ही स्थापन करीत असलेली विश्वस्त संस्था असे शपथवर जाहीर करू इच्छिते की, केवळ दीनदुबळ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, अर्धपोटी भुकेल्यांच्या भूकनिवारणासाठी, अशिक्षितांच्या शिक्षणासाठी, अंधाला दृष्टी देण्यासाठी, मुक्याला बोलता करण्यासाठी, स्त्रीच्या मुक्तीसाठी, दलितांच्या उध्दारासाठी......"

'मूकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरी' हे असं एकदा लिहून त्यावर सह्या करताना मग विश्वस्त मंडळी विलक्षण भारावून गेलेली असतात. काहींच्या डोळ्यात अश्रू आलेले मी पाहिलं आहे. एकदा आपण सही केली की सर्वसामान्यांचं जीवन 'आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहिकडे' असे होणार त्याबद्दल सर्वांना खात्री असते. 'ट्रस्ट'चा कारभार सुरू होतो.

काही काळ उलटतो. पुन्हा कधी तरी काही तरी निमित्तानं ही मंडळी एकत्र जमतात. कॉकटेलचे घुटके आणि तंदूर चिकन ह्यामध्ये ऐंशी टक्के सर्वसामान्य दीनदुबळ्यांसाठी काही तरी केलं पाहिजे अशी कल्पना निघते आणि नवा 'ट्रस्ट' जन्मास येतो!

माझ्या माहितीत अशी विश्वस्त मंडळी आहेत की स्व:तचं नाव कुठल्या कुठल्या 'ट्रस्ट' वर आहे हे देखील त्यांना माहीत नाही. म्हणजेच सही त्यांचीच आहे, पण शपथच त्यांना विस्मरण झालं आहे. 'ट्रस्ट'च्या कागदपत्रांवर सह्या करून जनतेचा उद्धार करणाऱ्या

'बाजारू विश्वस्तां 'नी सर्व विकासयोजनांमध्ये मनसोक्त धुमाकूळ घातला आहे !

हे सर्व विचारात घेतलं की वाटू लागतं विकास ही एक फार मोठी लबाडी आहे, बनवाबनवी आहे. हा एक खेळ आहे. अंपायर तुमच्या बाजूचा असला तर अगदी मधल्या दांडीवरचा चेंडू तुम्ही पायानं तटवलात तरी तो तुम्हाला पायचीत देत नाही, अंपायर आपल्या बाजूचा असणं अत्यंत महत्त्वाचं. मग विकासाचा 'गेम' मस्तपणे खेळता येतो. आकडेवारीनं विकास सिद्ध करून 'ट्रस्ट'ला आर्थिक स्थैर्य प्राप्त होतं. त्यातील एखादा विश्वस्त मान्यता पावतो. दादा-बाबा–किंवा नमाझी होतो. त्या सर्वांना 'विकासगुरू' म्हटलं जातं.

जिन खोजा तिन पाइयां गहरे पानी पैंठ ।
मैं वपुरी ढूंढ़न गई रहीं किनारे बैठ ।।

II

खोलीतील टेलिफोन वाजत होता. श्वेतक्रांतीची माहिती देणारं पुस्तक पलंगावर भिरकावून मी उठलो. सर्फराझ विचारत होता, 'काय करतो आहेस ?'

जांभई आवरत मी म्हणालो, 'दुसरं काय करणार, दारू पितोय आणि तुमच्या श्वेतक्रांतीचा अभ्यास करतोय !'

'अरे बाबा, असं एकटयानं दारू पिणं बरं नव्हे !' सर्फराज उपदेशाच्या थाटात बोलू लागला. 'दारूला कंपनीशिवाय मझा नाही आणि हे बघ, आमचा सफेद इन्किलाब पुस्तक वाचून समजणार नाही...ते पुस्तक ठेव बाजूला आणि माझ्या खोलीत ये...मी रूम-सर्व्हिसला फोन करून साकीला पाठवून द्यायला सांगितलं आहे. सर्व इंतजाम केला आहे. जल्दी आजाओ !'

साकी ! मी चटकन फोनचा रिसिव्हर ठेवला. झटपट कपडे केले आणि सर्फराझची खोली गाठली. श्वेतक्रांती, सफेद इन्किलाब, ट्रस्ट सगळे सगळे प्रश्नं क्षणार्धात नाहीसे झाले. मन गुणगुणत होतं. 'मझा तो साकी के कदमोसे लिपट जाने मे आता है ' साकी ! साकी ! ! – द्राक्षकन्या ! ! ! – ह्या साकीजवळील शराबच्या बूंदसाठी जान देणाऱ्या ओमर खय्यामचा हा देश ! इस्फहानमधील माझी पहिलीच रात्र रंगतदार होणार अशी लक्षणं दिसू लागली. प्रसन्न आणि काहीशा आतुरलेल्या मनानं मी साकीबद्दल विचार करू लागलो. हातामध्ये नक्षीदार तबकात सुरई आणि प्याले घेऊन झिरझिरीत वस्त्र परिधान केलेली, लांबसडक काळयाभोर केसांची. ३६–२१–३६ अशी मदिराक्षी साकी बाजूला बसली आहे. नाजूक हातानं शराबचा प्याला भरून माझ्या ओठाशी धरते आहे– 'साकी मैं ने तो नहीं तूनेही तो पिलाई ' – वा : भाई वा : – मजा येणार !

सर्फराझच्या खोलीच्या दाराची बेल वाजली. माझ्या काळजाचे ठोके वाढले, वेटरसारखा पोषाख केलेला एक तरुण ट्रेमध्ये व्होडकाची बाटली, बर्फ, कोकोकोला, वेफर्स, पिस्ते वगैरे घेऊन प्रवेश करता झाला. टेबलावर त्यानं सर्व व्यवस्थित मांडलं. सर्फराझनं दिलेली जेवणाची ऑर्डर लिहून घेऊन तो गेला.

सर्फराझन दोन छोटया पेल्यात व्होडका ओतली, मोठया दोन पेल्यात कोकोकोला. व्होडकाचे ग्लास उंचावून, 'सलाम ती' म्हणत आम्ही एक घोटात रिचवले. पुन्ह भरले अंगूरबालेचा अजून पत्ता नव्हता. व्होडकाचे दोन तीन राउंड्स झाले तरी जेव्हा साकी येईना तेव्हा मला सर्फराझचा थोडा राग आला. मनात म्हटलं पद्धतीनं आपली चेष्टा केली. तरीदेखील शेवटी रागावून मी सर्फराझला विचारलं 'अरे, तू साकीचा इंतजाम केला म्हणाला होतास त्याचं काय झालं ?' सर्फराझला माझा प्रश्न नीट कळला नसावा ( किंवा लेकाचा मुद्दाम तसं भासवत असावा. ) त्यानं मलाच उलट प्रश्न विचारला. 'तुला आणखी काही हवं आहे का ? व्होडका आवडली नाही का ? व्हिस्की मागवू का ?' मी वैतागून म्हणालो, 'व्हिस्की नको रे बाबा – व्होडका उत्कृष्ट आहे, मला साकी पाहिजे !'

सर्फराझ खादे उडवत प्रश्नार्थक चेहऱ्यानं उठला. रूमसर्व्हिसला फोन करून त्यानं साकीला पाठवून देण्यास सांगितलं. माझ्या कानाना पैंजणांची छुमछुम गुदगुल्या करू लागली.

दारावरची घंटा वाजली. सर्फराझ 'बेफर्माई' म्हणून ओरडला. दार उघडून मघाचाच तरुण वेटर प्रवेश करता झाला. सर्फराझ म्हणाला, 'साकी आलाय त्याला काय सागायचं ते साग–'

ह्या साकीला काय कराळ सागणार ! मी त्याला खुणेनच जायला सांगितलं. खादे उडवत तो निघून गेला. माझा चेहरा साफ पडला होता. सर्फराझ गोंधळून माझ्याकडे पहात होता. मी नाराजीन त्याला म्हणालो– 'लेका, चेष्टा करतोस काय माझी ? साकी नसेल तर नाही म्हणून साग...पण थट्टा कशाला करतोस ?' सर्फराझ आणखीनच गोंधळून जात म्हणाला, 'इथं थट्टा करण्याचा प्रश्न येतोच कुठं ? तुला साकी हवा होता, मी साकीला बोलावलं !' मला अजूनही नीट उलगडा होत नव्हता तेव्हा मी स्पष्ट कबुली-जवाब दिला. 'अरे बाबा, मला साकी हवा नव्हे हवी होती. मी नाजुक कमरेच्या अंगूर की बेटीच्या प्रतीक्षेत होतो!'

डोक्यात लख्ख प्रकाश पडल्याप्रमाणे सर्फराझचा चेहरा उजळला. खो खो हसत तो म्हणाला, 'आता माझ्या सर्व ध्यानात आलं... साकी म्हणजे एखादी तरुणी सुरई घेऊन येणार असं तुला वाटलं... अरे, साकी म्हणजे 'बारटेंडर' दारूचा गुत्ता चालवणारा...इराणमध्ये पूर्वी दारूच्या गुत्त्यामध्ये प्याले भरून देण्यासाठी नाजुक तरुण पोरगे ठेवलेले असत व दारू पिणारे 'बच्चेबाज' असत! ...आमच्या खेडयापाडयात अजूनही मोठया प्रमाणावर 'बच्चेबाजी' चालते. तुला वाटलं बँकॉक-हाँगकाँगप्रमाणे इथं खोलीवर 'बाई' बोलवता यणार. विसरा ते ! कुठल्याही मुलीला परपुरुषाच्या खोलीत प्रवेश करायला कायद्यान सक्त मनाई आहे... सीगे (तात्पुरता विवाह) झाले असल्यास मात्र अडचण नाही. तुला सीगे करायचं आहे का ?'

त्या रात्री व्होडका डोक्यात भिनली. बिछान्यावर अंग टाकताच गाढ झोप लागली. सुदैवानं स्वप्नात देखील साकीचं दर्शन घडलं नाही !

तीन दिवस इस्फहानमध्ये फीर फीर फिरलो. अनेक प्रॉजेक्टस् बघितली. बहुतेक सर्व नमाझीच्या टाइपची. सर्वत्र पैशाचा खेळ. कंटाळून शेवटी मी सर्फराझला सांगितलं की, असली प्रॉजेक्टस् बघून काहीच फायदा नाही. मंत्रीमहाशयाना सामान्य शेतकऱ्याच्या शेतमाल विकण्याबाबतच्या अडचणीवर रिपोर्ट हवा आहे. इराणमधील मोठमोठया जमीनदारांच्या 'ट्रस्ट' मार्फत चाललेल्या सुधारित शेतीची जाहिरात नको आहे. ही सर्व मोठाली प्रॉजेक्टस्

पहाण्यासारखी नाहीत असं मी म्हणत नाही; पण ती पाहून आपला उद्देश सफल होणार नाही. आपल्याला खेड्यापाड्यात फिरून सर्वसामान्य शेतकऱ्याच्या अडचणींचा अभ्यास करायचा आहे.

माझं म्हणणं सर्फराझला पटलं; पण त्याचबरोबर असा अभ्यास करण्याअगोदर इस्फहानच्या गव्हर्नरसाहेबाची परवानगी काढावी लागेल, ते ज्या खेड्यांची यादी देतील तिथंच फक्त जाता येईल वगैरे अडचणी त्यानं स्पष्ट केल्या. ह्या सर्व 'लालफिती' साठी एक दिवस खर्च पडणार होता. सर्फराझनं गव्हर्नरसाहेबाची गाठभेट घ्यायची आणि मी एक दिवस इस्फहान शहरात 'टुरिस्ट' प्रमाणे फिरायचं असं ठरलं. त्यानं इंग्रजी बोलणारा एक गाईड दिला आणि मी शहाअब्बासचं शहर पहाण्यासाठी बाहेर पडलो.

जगामध्ये इस्फहान नसते
तर विधात्याला
जग निर्मिताच आले नसते ;
विश्व हा केवळ शब्द आहे
इस्फहान त्याचा अर्थ आहे.

इस्फहानमधील कवी आपल्या ह्या शहराला किती मानत हे वरील ओळी वाचून चटकन ध्यानात येईल. इस्फहानमधील सर्वसामान्य नागरिक देखील इस्फहान-नेस्फ ए जहान्, इस्फहान म्हणजे अर्धे जग असं मोठ्या अभिमानानं म्हणतो. आजकाल औद्योगिक प्रगतीच्या तथाकथित आधुनिक युगात इस्फानियांचा हा अभिमान एखाद्या पोकळ दर्पोक्तीप्रमाणे काहीजणाना वाटेल; पण इस्फहानचा इतिहास पाहिला तर ह्या अभिमानात बरच तथ्य आहे हे ध्यानात येईल. सतराव्या शतकात इस्फहान हे जगातील सर्वात मोठं आणि अद्ययावत शहर अशी त्याची ख्याती होती. त्या काळच्या लंडनपेक्षा देखील इस्फहान मोठं होतं !

इस्फहानची स्तुती करणारे जसे होते तसेच निंदानालस्ती करणारे बिगर इस्फहानी देखील होतेच. अशाच एका कवीच्या मते इस्फहानमध्ये सर्व आबादी आबाद असलं तरी सज्जनाची त्रुटी आहे. तो म्हणतो–

इस्फहान नगरी श्रेष्ठ होईल
जर इस्फहानी तिथं नसतील.

## परदेश–पॅराडाईझ

पाच हजार दोनशे फूट उंचीवर झायंदे-रूद (जन्मदात्री नदी) हिच्या विस्तीर्ण आणि समृद्ध खोऱ्यात वसलेल्या ह्या शहराचं इस्फहान हे नाव, अस्पदान म्हणजे घोड्यांचा तळ किंवा सिफादाना-शिपायांची छावणी ह्यावरून पडलं असावं असं काही जण मानतात. कै. काबूस ह्या पौराणिक राजानं हे गाव वसवलं असंही काहीजण मानतात. त्या राजानं 'कयानी' साम्राज्याची स्थापना केली. सुमारे दोन-अडीच हजार वर्षांपूर्वी (किंबहुना त्याहूनही पूर्वी) इस्फहान ही 'पार्थ' सम्राटांची राजधानी होती. सहाशेबेचाळीस साली शेवटचा झोरास्ट्रियन राजा याझदगीर्द मुस्लिम अरबाच्या हल्ल्यात पराभूत झाला आणि इस्फहान इस्लामच्या ताब्यात आलं. दहाव्या शतकाच्या सुमारास ज्यू लोकांनी इस्फहानमध्ये वस्ती केली. त्यांची वस्ती 'याहुदिये' म्हणून ओळखली जायची.

इ. स. दहाशेपन्नासच्या सुमारास इराणी फिरस्ता, इतिहासकार आणि इस्माइली पंथाचा प्रचारक नासर-खुसरो (ज्याच्या विचारसरणीचा प्रभाव पडून हसन साबाह ह्यानं घातक हत्यारा लोकांचा 'असामिन' मार्ग स्थापला) इस्फहानबद्दल म्हणतो–

'हे शहर विस्तीर्ण अशा सपाट पठारी भूप्रदेशावर वसलं आहे. येथील हवामान अतिशय उत्तम आहे. इथं कुठंही आठदहा गज (सुमारे पस्तीस फूट) खणलं तर अतिशय थंड आणि स्वच्छ असं मुबलक पाणी मिळतं. शहराभोवती साडेतीन 'फरसांग' लांबीची (अंदाजे बारा मैल) मजबूत तटबंदी आहे. ह्या तटबंदीवर जागोजागी बुरूज आणि सशस्त्र सैनिकांचे भक्कम मोर्चे आहेत. शहराच्या आत वाहत्या पाण्याचे स्वच्छ झरे आहेत. उंच भव्य इमारती आहेत. शहराच्या मध्यभागी मशजीद-ए-जुम्मे आहे. शहरात सर्वत्र समृद्धी आणि आबादीआबाद नजरेस पडते. ढासळलेली, मोडकळीस आलेली अगर पडकी अशी एकही इमारत नजरेस पडत नाही. अनेक प्रकारच्या मालाच्या ठोक आणि किरकोळ खरेदी-विक्रीसाठी असंख्य बाझार ह्या शहरात आहेत. वेगवेगळ्या देशातील पैशाअडक्याची, चलनाची देवाण-घेवाण करण्यासाठी एक स्वतंत्र बाझार आहे. तिथं एकूण दोनशेपन्नास पतपेढ्या आहेत. आमचा कारवाँ शहरात आला पण आमच्याकडे विशेष लक्ष पुरविण्याइतका कुणालाच वेळ नव्हता. प्रत्येकजण आपआपल्या कामात व्यग्र होता. आम्ही ज्या कारवानसराईत उतरलो तिथं रहाण्याची आणि जेवणाची उत्तम सोय होती.'

*नासर-खुसरोनं नऊशे-साडेनऊशे वर्षांपूर्वी केलेलं वर्णन विसाव्या* शतकातील इस्फहानला तंतोतंत लागू पडत होतं.

मलिकशहा ह्या बादशहाच्या दरबारातील सुप्रसिद्ध वझीर निझाम–उल्–मुल्क हा इस्फहानचा. ओमर खय्याम ह्या प्रसिद्ध गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ आणि सूफी रुबायतकार कवीचा निझाम–उल्–मुल्क हा जिगरी दोस्त आणि आश्रयदाता. त्याच्याबद्दल एक मजेशीर दंतकथा आहे.

ह्या दोघानी संगनमत करून मलिकशहाच्या खजिन्यातील बरीच मोठी रक्कम हडप केली. त्या पैशातून त्यानी एक अप्रतिम महाल बांधला. ह्या महालात शृंगारिक चित्रानी सजवलेली अनेक दालनं होती. महालात अतिसुंदर असा बगीचा होता. वाहते झरे, कारंजे, गुलाबांचे ताटवे ह्यामधून मोर, हंस वगैरेसारखे पक्षी विरहत असायचे. हा महाल म्हणजे एक प्रकारचं अतिथिगृह होतं. अतिथींची सेवा करण्यासाठी निवडक सुंदर तरुणींचा ताफा असायचा. इराण, तुर्कीस्तान, हिंद, रोम येथून ह्या तरुण स्त्रिया आणल्या होत्या. प्रत्येक तरुणीचा पेहराव वेगळा, आकर्षक, झुळझुळीत कापडाचा शरीराच्या घाटदार अवयवाचं प्रदर्शन करणारा. प्रत्येक तरुणी दिसायला एखाद्या स्वर्गीय परीसारखी ! ह्या सर्व तरुणींना अतिथींशी वागायचं कसं, बोलायचं कसं ह्या गोष्टीच प्रशिक्षण ओमर खय्याम आणि निजाम–उल्–मुल्क ह्यानी जातीन दिलं होत. महालाच्या भटारखान्याची व्यवस्था जगातील उत्तमोत्तम स्वयंपाक्याच्या ताब्यात होती. अतिथिगृहातील सर्व सोयी पूर्ण झाल्या तेव्हा ओमर खय्याम आणि निझाम–उल्–मुल्क ह्यांनी आपली 'गुप्त' योजना अमलात आणण्याच्या दृष्टीनं हालचाली सुरू केल्या. मुख्य उद्देश इस्फहान-

मधील धनाढ्य लोकांना लुबाडणे असा होता त्याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे होती.

एखादं सावज हेरलं की हे दोघे त्याच्या घरी काही तरी निमित्त काढून जेवणास जायचे. जेवणाच्या वेळी शराब, गप्पा–टप्पा चालू असताना मधूनच ओमर खय्याम आपण जीवंतपणी पाहिलेल्या स्वर्गाचं रसभरित वर्णन ऐकवायचा. ऐकणारा जाळ्यात सापडायचा. आपल्यालादेखील स्वर्गाचं, तेथील स्वर्गीय अप्सरांचं दर्शन घडवून आण म्हणून विनवू लागायचा. त्यासाठी बराच खर्च येईल असं दोघं सांगत. लट्टू झालेलं गिऱ्हाईक दोघ मागतील ती किंमत अदा करीत असे. पैसे हातात पडले की ओमर खय्याम त्या धनाढ्य माणसाच्या दारूच्या पेल्यात चलाखीनं गुंगीचं औषध टाकत असे. मग दोघे त्याला उचलून आपल्या स्वर्गीय अतिथिगृहात आणून टाकीत. शुद्धीवर आल्यानंतर त्या माणसाला आजुबाजूला वावरणाऱ्या अप्सरा बघून आपण स्वर्गात आलो आहोत ह्याबद्दल खात्री पटे. त्या 'ट्रेन्ड' अप्सरा त्याच्याशी लाडीगोडीनं वागून त्याला चविष्ट पदार्थांचं भोजन नाजूक हातानं भरवीत. शराब पाजत. स्वतःच्या शरिराशी थोडीफार लगट देखील करू देत. एखादी अप्सरा मादक संगीताच्या तालावर पेटी व नृत्य करून त्याला चेतवीत असे आणि हे चालू असताना शराबच्या प्रत्येक प्याल्यातून त्याला हळूहळू पुन्हा गुंगीचं औषध पाजलं जाई. स्वर्गसुखाचा जिताजागता अनुभव घेऊन धुंद झालेलं गिऱ्हाईक गुंगी येऊन आडवं झालं की, त्याला उचलून परत त्याच्या निवासस्थानी नेलं जाई.

स्वर्गाचं दर्शन घतलेला धनाढ्य लंपट दुसरे दिवशी आपल्या इतर धनाढ्य मित्रांना रसभरित वर्णन करून अनुभव कथन करी. ते मग आपण होऊन ओमर खय्याम आणि निजाम–उल्–मुल्कच्या जाळ्यात ओढले जात. थोडक्यात काय तर 'प्लेबॉय' क्लबची कल्पना अमेरिकन नसून इराणमधील आहे असं म्हणावयास हरकत नाही !

: पॅराडाईज्' म्हणजे स्वर्ग हा शब्द फार्सी 'परदेस' वरून झाला. प्रत्येक महालाच्या आत अतिशय देखणा बगीचा असायचा. त्याला 'परदेस' म्हणत. राज, महाराज, सरदार आपल्या 'परदेस' मध्ये नेहमी मौजमजा करीत विश्रांती घ्यायचे. त्या परदेसचं पॅराडाईज झालं. आपल्याकड परसू आणि परसदार झालं.

तेराव्या शतकात मगोल टोळीवाल्यांनी इस्फहानवर हमला करून शहर काबीज कल; पण शहराचं सौंदर्य पाहून त्यांनी जाळपोळ किंवा नासधूस केली नाही. शहरवासीयांवर अत्याचार केले नाहीत. इस्फहानमधील प्रसन्न वातावरणानं हमलखोर भारावून गले आणि भटके मगोल तिथच स्थायिक झाले. इस्फहान्याच्या सहवासात सुसंस्कृत झाले आणि कलेचे आश्रयदाते झाले. तेराशेअठ्ठ्याऐंशी साली तैमूरलगन इस्फहानवर स्वारी केली. त्यानं देखील शहराचं किंवा शहरवासियांचं नुकसान केलं नाही. तेव्हा इस्फहानी लोकांना वाटलं की, तैमूरची ताकद बहुतेक संपली आहे. त्यांनी कट करून दगलबाजीनं तैमूरला मारण्याचा प्रयत्न केला. प्रयत्न फसला. तैमूर भयंकर संतापला. एका दिवसात त्यानं सत्तर हजार इस्फहानियांची कत्तल केली. रक्ताचे पाट वाहवले आणि मुंडक्यांचा मनोरा रचला. तैमूरचं नाव काढलं की इस्फहानी लोक आजही आकाशाकडे हात करून अल्लाचा धावा करतात.

इस्फहानचं सुवर्णयुग म्हणजे शहा अब्बास राजाचा काल. हा सफवी घराण्याचा राजा. १५९८ साली त्यानं गाझवीन येथील आपली राजधानी इस्फहानला हलविली आणि पुढील एकतीस वर्षांच्या कारकीर्दीत इस्फहानचं संपूर्ण रूप पालटून टाकलं !

सर्फराझनं दिलेल्या गाईडकडून इस्फहानचा इतिहास ऐकत ऐकत मैदून–ए–शहा ह्या विस्तीर्ण पटांगणात मी प्रवेश केला. जगभरच्या टूरिस्ट मंडळींनी मैदान भरून गेलं होतं. मैदानात प्रवेश करताना एकापेक्षा एक भव्य आणि देखणं वास्तुशिल्प नजरेस पडत होतं. काय पाहू आणि काय नको अशी मनाची अवस्था झाली.

एक हजार सातशे फूट लांब आणि साडेपाचशे फूट रुंद अशा मैदानाच्या चोहोबाजूला शहा अब्बासनं अनेक देखण्या इमारती उभ्या केल्या होत्या. मैदानाच्या दक्षिणेला मशजीद-ए–शाह-इस्फहानमधील सर्वात मोठी मशीद.

## शहाअब्बास-शाब्बास

सोळाशेअकरा साली ह्या मशिदीचा पाया खणून भरण्यास सुरुवात झाली. शहा अब्बासला मशीद झटपट बांधून हवी होती ; पण वास्तुशिल्पकार पाया पक्का झाल्याशिवाय वरील बांधकाम करण्यास राजी नव्हता. शहा अब्बास ऐकेना. गडबड करू लागला. तेव्हा वास्तुशिल्पकारानं पायाच्या बांधकामाचं बारकाईनं मोजमाप घेतलं आणि तो शहर सोडून अज्ञातवासात गेला. त्याच्याशिवाय दुसऱ्या कुणालाच मशिदीचं बांधकाम करणं शक्य नव्हतं. बांधकाम बंद पडलेलं पाहून शहाअब्बास खवळला. वास्तुशिल्पकाराला असेल तिथं पकडून त्याचा शिरच्छेद करण्याचा त्यानं हुकूम काढला. दोन वर्षांनंतर वास्तुशिल्पकार परतला. त्यानं पायाच्या बांधकामाचं पुन्हा मोजमाप घेतलं. पाया बराच खचला होता. वास्तुशिल्पकार मग आपण होऊन शहा अब्बासला सामोरा गेला. हात जोडून उभा राहिला आणि दोन्ही मोजमापातील फरक त्यानं शहा अब्बासच्या नजरेस आणून दिला. शहानं खूष होऊन त्याला मोठी बिदागी दिली. त्याचबरोबर 'आता मशीद झटपट पूर्ण झाली नाही तर मुंडक छाटीन !' अशी तंबी देखील दिली. दुर्दैवानं शहा अब्बासच्या कारकीर्दीत ही मशीद पुरी होऊ शकली नाही. ह्या मशिदीच्या बांधकामाला एकूण एक कोटी एंशी लाख विटा आणि पाच लाख निळ्या रंगाच्या चिनीमातीच्या 'टाइल्स्' वापरण्यात आल्या !

मैदानाच्या पूर्वेला इराणमधील सर्वात अप्रतिम मशीद, मसजिद-ए–लुत्फउल्ला आहे. ह्या रेखीव मशिदीचा अन्यून घुमट म्हणजे वास्तुशिल्पकलेचा उच्चांक मानला जातो. धार्मिक प्रवृत्तीच्या आपल्या सासऱ्यासाठी शहाअब्बासनं ही मशीद बांधली. ह्या मशिदीच्या बरोबर समोर, मैदानाच्या पश्चिमेच्या बाजूला 'अली कापू' ह्या महाद्वारावर एक भव्य महाल उभारला आहे. ह्या महालाच्या बाल्कनीत बसून शहाअब्बास दरबारी पाहुण्यांच्या समवेत मैदानातील घोडयाच्या शर्यती किंवा खेळ पहात असे.

गाईडबरोबर धापा टाकत 'अलीकापू'च्या छतावर चढून मी संपूर्ण इस्फहान शहराचं दर्शन घेतलं. पूर्वी वातावरणात घोड्यांच्या टापांनी उडालेली धूळ असणार. आता मात्र संपूर्ण शहरावर आधुनिक

तंत्रज्ञानाबरोबर आलेलं प्रदूषण स्पष्ट दिसत होतं. गाईड म्हणत होता ' गेल्या पाचदहा वर्षात इस्फहान शहरातील मोटारीची संख्या वीस-तीस पटीनी वाढली.. सर्वत्र एक्झॉस्टचा धूर भरून राहिला आहे– श्वास घेणं कठीण ! टुरिझम प्रमाणाबाहेर वाढलं त्याचा हा परिणाम ! '

मैदानाच्या उत्तरेला 'कैसरिये' कमान आणि 'शाही बाझार' दिसत होता. कमानीच्या दोन्ही बाजूना मोठे नगारखाने होते. मैदानाच्या चहूबाजूनी, प्रमुख इमारतीना जोडणारी दुमजली इमारतीची रांग होती. तळमजल्यावर हस्तकलेच्या वस्तू बनविणाऱ्यांची दुकाने होती. 'अलीकापू'च्या बाल्कनीत उभं राहून छाती भरून श्वास घेतला.. जरा विश्रांती घेतली आणि मग शाही बाझारात फेरफटका मारून 'चाहार बॉग' रस्त्यावर आलो. हा हमरस्ता बांधण्यासाठी शहाअब्बास राजाला वाटेतील चार द्राक्षांच्या बागा खरेदी कराव्या लागल्या होत्या म्हणून त्याचे नाव चारबाग-रस्ता. रस्त्याच्या मध्यभागातून पाण्याचा पाट वाहात होता. जागोजाग कारंजी आणि गर्द झाडी. इराणी लोकांना पाण्याचं आणि झाडांचं जबरदस्त वेड ! शहाअब्बासच्या काळी हा रस्ता आठवड्यातून एक दिवस केवळ स्त्रियाना फिरण्यासाठी राखून ठेवला जायचा !

इस्फहानमधील आणखी एक भव्य वास्तू म्हणजे 'चेहेल सटून', ह्या प्रचंड महालाला दर्शनी भागात वीस खांबाचे मोठे व्हरांडावजा दालन आहे. महालाच्या समोर पाण्याचा तलाव आहे. त्या तलावाच्या पाण्यात वीस खांबांचं प्रतिबिंब पडतं म्हणून चेहेल (चाळीस) सटून (खांब) महाल. हा महाल केवळ परदेशी पाव्हण्यांच्या आगतस्वागतासाठी वापरला जायचा. शहाअब्बासच्या शराबी महफिली इथंच रंगायच्या !

शहाअब्बासची कारकीर्द आणि त्यानं सजवलेलं इस्फहान ह्याविषयी संपूर्ण माहिती द्यावयाची झाल्यास एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल आणि तो ग्रंथ सचित्र असावा लागेल. ह्या शहराचं वर्णन, येथील वास्तुशिल्पाचा देखणेपणा शब्दानं वर्णन करणं केवळ अशक्य !

शहाअब्बास एक कुशाग्रबुद्धीचा 'टाउन प्लॅनर' होता हे इस्फहान पहाताना वारवार जाणवतं. तो उत्तम रचनाकार होता; पण त्याच्यात एक मोठा दोष होता. उतावळेपणा ! प्रचंड घाई आणि गडबड ! पायाचं बांधकाम, भिंतीचं बांधकाम पक्कं होण्याआधीच घुमट चढवण्याची त्याला सदैव घाई ! परिणामांती त्यानं उभारलेल्या प्रत्येक वास्तूची आजही वारंवार डागडुजी करावी लागते. त्याउलट ह्याच इस्फहानमधील सेल्जूककालीन– म्हणजे शहाअब्बासच्या अगोदरच्या– वास्तू मात्र अजूनही मजबूतपणे उभ्या आहेत.

कुणीही एखादी कठीण गोष्ट झटपट पार पाडून दाखविली की त्याची पाठ थोपटून त्याला 'शहाअब्बास–शहाअब्बास' असं म्हणण्याची इराणमध्ये प्रथा पडली. त्यावरूनच 'शाब्बास' हा शब्द आला असावा.

इस्फहान इथं राजधानी वसवल्यानंतर शहाअब्बासनं रशियन सीमेनजीकच्या अझरबैजान प्रदेशावर स्वारी केली. तेथील अरस नदीच्या काठावरील जुल्फा गावच्या ख्रिस्तधर्मीय अरमानी (अरमेनियन) लोकांची उद्योजकता, व्यापारकौशल्य, सचोटी, मेहनतीवृत्ती ह्या सर्व गोष्टी शहाअब्बासच्या मनात ठसल्या हजारो अरमानी कुटुंबाना, त्याने इस्फहानमध्ये स्थायिक होण्याचं आमंत्रण दिलं. झायदे-रुद नदीच्या काठी 'जुल्फा' नावाची वसाहत खास त्यांच्यासाठी उभी केली.

वास्तविक अझरबैजानमधील अरमानी लोक आपलं जल्फा सोडून इस्फहानमध्ये जाण्यास नाराज होते. ते आपण होऊन येईनात तेव्हा शहाअब्बासनं त्यांच्या शेतीला पाणीपुरवठा करणारे सर्व पाट तोडले. शेती उजाड केली. अरमानी लोकाना मग नाइलाजान गाव सोडावंच लागलं. इस्फहानमध्ये स्थायिक झाल्यावर अल्पावधीतच हे लोक 'फुलदार'-पैसेवाले झाले. शहाअब्बासनं त्यांना मोठ्या प्रमाणावर बिनव्याजी कर्जपुरवठा केला. ह्या लोकांनी इस्फहानच्या व्यापाराची भरभराट केली.

केवळ अरमानी लोकांना आणूनच हा शहा थांबला नाही. त्यानं इंग्रज आणि डच व्यापाऱ्यांना देखील आमंत्रित केलं. ईस्ट इंडिया कंपनीला व्यापारी पेढी खोलण्याची सवलत दिली. इतर युरोपियन व्यापाऱ्यांना देखील त्यानं सन्मानानं बोलावलं. जिनिव्हामधील घड्याळजी इस्फहानमध्ये आणले. शहाअब्बासच्या राज्यात संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य होतं.

इस्फहानची लोकसंख्या जसजशी वाढत गेली तसतसा पाण्याचा तुटवडा भासू लागला. झायंदे-रुद नदीचा उगम कुहेरंग ह्या पहाडात त्याच्या लगतच्या कारकुनानं पहाडात करुण नदीचा उगम. शहाअब्बासच्या पुष्कळ वर्षे अगोदर एका राजानं हे दोन पहाड बोगद्यानं जोडून करुण नदीचं पाणी झायदे रुदमध्ये मिळविण्याची योजना आखली होती; पण ती पूर्ण होऊ शकली नाही. शहाअब्बासनं काही इंग्रज इंजिनिअरसच्या सहाय्यानं ही योजना पुरी करण्याचा असफल प्रयत्न केला. त्यानंतर तब्बल तीनशेवीस वर्षांनंतर, १९४८ साली शहा मोहम्मद रेझा पहेलवी (म्हणजे नुकताच कैरोमध्ये पैगंबरवासी झालेला इराणचा पदच्युत शहेनशहा आर्यमिहर) ह्यानं ही योजना पुरी केली. झायंदे-रुदचं पाणी वाढलं आणि करुण नदी सुकत चालली !

ही महत्त्वाकांक्षी योजना पूर्ण झाली तेव्हा तिच्या उद्घाटनासाठी शहेनशहा मोहम्मद रेझा पहेलवी तेहरानहून स्वतःच्या खाजगी विमानानं समारंभासाठी गेला होता. तेव्हा एक अघटित गोष्ट घडली. त्याबद्दल आपल्या पुस्तकात शहेनशहानं लिहिलं होतं–

'मला विमानउड्डाणाचा अतिशय शोक ! मी परवानाधारक विमानचालक आहे. नवनवीन विमानं चालविण्याची मला हौस आहे कुहेरंग प्रकल्पाचं उद्घाटन आणि पाहणी करून मी परत निघालो. विमानानं धावपट्टी सोडली आणि दहाएक मिनिटांत विमान बारा हजार फूट उंचीवरून उडू लागलं. कुहेरंगचा इलाखा पहाडी. धावपट्टी कमी लांबीची म्हणून मुद्दामच मी हलक्या वजनाचं एक इंजिन असलेलं; पण वेगवान विमान घेऊन आलो होतो.

'अचानक काही तरी बिघाड झाला आणि इंजिन बंद पडलं. खप प्रयत्न करूनही इंजिन सुरू होईना. विमान उडतं ठेवण्यासाठी एक किमान वेग असणं आवश्यक आहे हे कुठल्याही अनुभवी वैमानिकाला माहीत असतं. इंजिन बंद पडल्यामुळं माझ्या विमानाचा वेग हळूहळू कमी होऊ लागला. वेग आणखी कमी झाला असता तर विमानानं पलटी खाल्ली असती आणि मी सरळ खाली कोसळलो असतो. म्हणून वेग कायम ठेवण्याच्या उद्देशानं मी विमान जमिनीच्या दिशेनं उतरविण्यास सुरुवात केली. सर्व प्रदेश पहाडी. दरीतून कड्याकपारीना चुकवत मी विमान उतरविण्यासाठी सपाट प्रदेश शोधत होतो. दरी पार करत असताना अचानक एक उंच पहाड आडवा आला. मी 'स्टिक' ओढून विमान उंचावण्याचा प्रयत्न केला; पण तो अंशतःच सफल झाला. विमान पहाडाच्या माथ्यावरील एका खडकाला आदळलं आणि उसळी घेऊन पहाडावरून

घसपटत दरीत कोसळू लागले. विमानाचा खालचा भाग संपूर्ण तुटला, एक पंख खडकावर आपटून तुटला आणि कोलांटया उडचा ... विमान पहाडाच्या पायथ्याशी विसावलं!'

'मी शुद्धीवर आलो तेव्हा प्रथम मी कुठं आहे तेच मला उमजेना, बहुबाजूला विमानाचे भग्न अवशेष दिसत होते; पण आश्चर्य म्हणजे माझ्या शरीराला कसलीही इजा झाली नव्हती! बारकासा ओरखडा देखील पडला नव्हता, त्याक्षणी माझी खात्री पटली की. माझ्या हातून इराणची सेवा घडणार असावी म्हणूनच परमेश्वरानं मला जिवंत ठेवलं... माझं वय तेव्हा एकोणतीस वर्षांचं होतं–'

[क्रमशः]

---

# पुस्तके

## मज शब्दांची नागिण डसली 'निळाभोर मी सगळा'

खरं तर श्री. रमेश गोविंद वैद्य हे स्वतः वकील आहेत, पत्रकार आहेत; पण बांधिलकी न मानण्याच्या त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते ह्या क्षेत्रात आहेत किंवा नाहीतही या सर्वांहून महत्त्वाचं म्हणजे ते एक कवी आहेत. नुसते लिहिणारे कवी नसून एक चांगले कवी आहेत. श्री. वैद्य यांनी गेल्या दहा–बारा वर्षांत लिहिलेल्या सुमारे साठेक कविता नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'निळाभोर मी सगळा' ह्या कवितासंग्रहात समाविष्ट केल्या आहेत. वैद्य ह्यांचा हा पहिलाच कवितासंग्रह. कवितालेखनाच्या दृष्टीनं दहा–बारा वर्षांचा हा कालखंड चांगला मोठाच टप्पा म्हणायला हवा! कवीच्या एकूण भाववृत्तीतील, वैचारिक भूमिकेतील बदल तर त्यातून निश्चितच प्रतीत व्हायला हवेत. वैद्यांची कविताही याला अपवाद असत नाही.

वैद्यांची कविता ही नुसतीच शब्दबंबाळ नाही. ती जशी आशयाच्या दृष्टीनं समृद्ध असते तशीच कुठं कुठं तिची अभिव्यक्ती लयदार असते. कधी श्री. वैद्य यांचे शब्द

'मोरपिसांचा पाउस यावा
निळसर हिरव्या हळव्या रात्री
स्पर्शलिपीतच लिहिले जावे
हस्तिदंती रेखीव गात्री'

यासारखे लयदार गीत लिहून जातात तर कधी ते गझल होतात तर कधी अभंग होऊन आळवू लागतात. शब्दांच्या बोजड, क्लिष्ट यांत्रिक अभिव्यक्तीच्या ह्या काळात वैद्य यांची कविता एका सहजसुंदर लयीतून वाचकाला आकृष्ट करते.

पण मुळातच ही सारी कविता अगदी गंभीर प्रकृतीची आहे. प्रस्तावनेत शिरीष पै यांनी म्हटल्याप्रमाणेच ती कुठे तरी हलवून सोडणारी, मनाला एक हुरहुर लावणारी आहे. तिच्या आस्वादातून जाणवतं ते कवीचं एक अनुभवसंपन्न व्यक्तित्व, त्याच्या मनाची तरलता. त्याच्यात प्रेमाची ओढ आहे, भावनांचा हळवेपणा आहे आणि त्याबरोबरच विरहाची विषण्णताही आहे. अशाच एका विषण्ण क्षणी कवी म्हणून जातो,

'काजळाचे लांब पंजे
म्लान चंद्राभोवती
एकटयाचे दुःख माझे
एकटयाला माहिती'

पण स्वतःच्याच दुःखाचा क्रूस स्वतःच वाहून नेणारा हा कवी ह्या प्रवासात दुःखानं आक्रोशताना दिसत नाही. त्याच्या भावना आक्रस्ताळ्या होत नाहीत. त्याचं दुःख देखील एका संयमित मर्यादेतच व्यक्त होत रहातं आणि मग तो म्हणतो,

'अज्ञात तीर्थयात्रा
आभाळ गूढ वरती
मागे वळून बघता
डोळे तुडुंब भरती

आपल्याच आठवणींकडे वरचेवर वळून पहाणारं कवीचं मन आपली तळमळ, हुरहुर, अस्वस्थता जागोजागी समर्थ शब्दांतून व्यक्त करताना दिसतं; पण ह्या साऱ्याहून महत्त्वाचं म्हणजे वेदनांनी पोळलेलं मन मग ह्या काव्यप्रवासात सतत कशाचा तरी शोध घेताना दिसतं. ते अज्ञाताचा शोध घेतं. लौकिकापलीकडे घेऊन जाणाऱ्या कशाच्या तरी शोधात असतं आणि मग ते मन म्हणतं

'मी मृत्युला भ्यालो नाही मी जगण्याला भ्यालो!' जीवनातल्याच सुखदुःखाला, संघर्षाला अनुभवून पुढे चालणारा हा कवी मग स्वतःला कधी मातीच्या फांदीवरला एक अनाम पक्षी म्हणवतो, कधी 'गूढ आभाळाखाली अज्ञात तीर्थयात्रा करणारा यात्रिक' म्हणवून घेतो आणि आपण मुळात कुठले अशा चौकशा करणारांनाही तो केशवसुतांइतक्याच समर्थ शब्दात बजावतो–

आम्ही मुळात कुठले
ही चौकशी कशाला?
घेऊ क्षणात एका
आभाळ हे उशाला

आभाळ उशाला घेऊ म्हणणारा हा कवी आपल्या प्रतिभेची ही समृद्धी आपल्या शब्दांतून वारंवार अशी उधळताना दिसतो. ह्या शब्दांनीच त्याचं अवघं व्यक्तिमत्त्व झपाटलंय. बेहोश झालंय. ह्या बेहोशीनंच तो उद्गारतो–

'मज शब्दांची नागिण डसली
निळाभोर मी सगळा
कुणी म्हणाले भणंग आणि
कुणी म्हणाले पगला!

शब्दातून बेहोश झालेली, आशयातून संपन्न होत गेलेली श्री. रमेश गोविंद वैद्य यांची ही कविता शब्दांवर प्रेम करणाऱ्या, अर्थगर्भ आशयाच्या शोधात असणाऱ्या प्रत्येकानेच आवर्जून वाचली पाहिजे.

–अशोक प्रभाकर डांगे

'निळाभोर मी सगळा'
कवी: रमेश गोविंद वैद्य.
प्रकाशन: गायत्री साहित्य
मूल्य: चार रुपये

यापूर्वी 'माणूस'मधून आलेल्या ९ कथांवर हिचकॉकने चित्रपट काढलेले नव्हते. चित्रपटासाठी त्याने त्या कथा फक्त निवडलेल्या होत्या. या दहाव्या कथेवर मात्र 'दि बर्ड्स्' हा चित्रपट १९६३ साली निघाला.

## हिचकॉकच्या कथा । कथा दहावी

स्वैर अनुवाद : रवींद्र गुर्जर

# पक्षी



तीन डिसेंबरला रातोरात वारे बदलले आणि हिवाळा सुरू झाला. त्याआधीचा शरदऋतू सुखसमृद्धीत गेला होता. ज्या ज्या जमिनीत नांगर फिरला तिथं सोनं उगवलं होतं.

नॅट हॉकन हा युद्धात जायबंदी झाल्यामुळं, त्याला निवृत्तिवेतन मिळत होतं. तो शेतावर पूर्णवेळ काम करत नसे. आठवड्यात तीन दिवस तो कामावर जायचा. तिथले लोक त्याला शक्यतो हलकीफुलकी कामं देत. तो विवाहित होता, दोन मुलंही होती; पण तो अंतर्मुख बनलेला होता. त्याला एकट्यानंच काम करायला आवडे.

एका द्वीपकल्पावर त्याचं गाव उभं होतं. गावाच्या टोकाला असलेल्या शेताभोवती दोन बाजूंनी समुद्र पसरला होता. त्या ठिकाणी शेताला बांध घालणं किंवा लाकडी दार बनवणं, ही कामं नॅटला खास पसंत होती. मग दुपारच्या वेळी काम थांबवून तो दगडी सुळक्यावर बसायचा. बायकोनं बनवलेलं जेवण चवीनं खाता खाता पक्ष्यांचं निरीक्षण करायचा.

गेल्या ऋतूत पक्ष्यांचे थवेच्या थवे आकाशात घिरट्या घालताना दिसले होते. अस्वस्थ, बेचैन, उगीचच इकडून तिकडे भरकटणारे पक्षी. आत्ता त्यांचे थवे हवेत गोलगोल फिरतील तर लगेच भरभरून आलेल्या पिकांवर उतरतील. खाताना सुद्धा भूक नसल्याप्रमाणे आणि अनिच्छेनं खातायत हे जाणवायचं.

त्याच अवस्थेत ते पुन्हा आकाशात उडायचे. कलकलाट, गोंगाट करत, शिट्या वाजवत पक्षी जमिनीवरून जायचे ते थेट उसळत्या समुद्राच्या डोक्यावर.

तो तडफडाट, धडपडाट, घाई आणि वेगानं निघून जाणं; पण कुठं? आणि त्यामागं प्रयोजन काय? शरदात हे असंच व्हायचं. अस्वस्थ, अतृप्त आणि दुःखी झालेले हजारो पक्षी, पोटात पडेल ते साठवून, दिशा भारल्यासारखे तुफान गतीनं तिथून निघून जायचे. हिवाळ्यापूर्वी नवं सुरक्षित ठिकाण त्यांना गाठायचं असतं.

नॅटला वाटलं की पक्ष्यांना हिवाळा येत असल्याचा इशारा आधीच मिळत असावा. कडाक्याच्या थंडीत बहुसंख्य पक्षी मरून जातात. आपला मृत्यू जवळ आल्याची जाणीव काही लोकांना होते. नंतर ते निरवानिरव करतात किंवा आततायी कृत्यं करून बसतात. पक्ष्यांचंही तसंच आहे. आपण उद्या नष्ट होणार, हे त्यांना कळतं.

पण या वर्षी ते जास्तच अस्वस्थ वाटत होते. वातावरण शांत असल्यामुळं ते विशेष करून लक्षात येत होतं.

श्री. ट्रिग यांचा ट्रॅक्टर पश्चिमेकडील चढउतारांवरून येताना दिसला. मधूनच तो खाली उतरलेल्या पक्ष्यांच्या थव्यांमध्ये नाहीसा होत होता. गिरक्या मारणारे, ओरडणारे पक्षी. आकाशात तर मेघच जणू चालले होते.

दिवसभराचं काम आटोपल्यावर नॅटनं ट्रिगजवळ हा विषय काढला.

'होय, यंदा नेहमीपेक्षा ते अधिक दिसतात,' तो शेतकरी म्हणाला, 'माझा अंदाज आहे की हवामानात बदल होणार आणि थंडी कडाक्याची पडणार, म्हणूनच पक्षी अस्वस्थ आहेत!'

त्याचं म्हणणं खरं झालं. त्याच रात्री हवा पालटली.

नॅटचं घर झोपडीवजा होतं. त्याची निजायची खोली पूर्वेला होती. पहाटे दोननंतर नॅटला जाग आली, तेव्हा पूर्वेकडून वाऱ्याचा आवाज ऐकू येत होता. कोरडे पण थंड वारे. ते छताला घासून जात होते आणि धुराड्याच्या पोकळीत घुमत होते. नॅटनं कान दिले समुद्रलाटांच्या गर्जना ऐकू येऊ

लागल्या. त्यानं गरम चादर अंगाभोवती लपेटली आणि तो बायकोच्या जवळ सरकला. ती एका कुशीवर शांत झोपली होती.

घोड्या वेळानं त्याला खिडकीच्या काचेवर टकटक आवाज येऊ लागला. तो बदच होईना म्हणून नॅट वैतागून उठला. खिडकीजवळ गेला. त्यानं खिडकी उघडली. त्याबरोबर त्याच्या हाताला मनगटाजवळ काही तरी जोरात घासल्यासारखं वाटलं. नंतर पंखांची फडफड होऊन ती आकृती छताच्या दिशेला उडाली !

तो एक पक्षीच होता. कुठला ते मात्र कळलं नाही. वाऱ्याबरोबर भरकटत तो निवाऱ्यासाठी जागा शोधत असावा.

त्यानं खिडकी बंद केली आणि बिछान्यावर पुन्हा आडवा झाला; पण मनगट ओलसर वाटल्यामुळं त्या जागी त्यानं तोंडानं चोखलं. पक्ष्यानं तिथे रक्त काढलं होतं.

आडोसा शोधताना, गोंधळलेल्या पक्ष्यानं अंधारात आपल्याला भिऊन ही जखम केली असावी. तो पुन्हा झोपेची आराधना करू लागला.

थोड्याच वेळात खिडकीवर पुन्हा आवाज येऊ लागला. या वेळी अधिक जोरात आणि मोठ्या निकडीनं. नॅटची बायको त्या आवाजानं जागी झाली. त्याच्याकडे वळून म्हणाली, 'बघा तरी खिडकीशी काय चाललंय. त्या आवाजामुळं डोकं उठायची पाळी आलीय् !'

'मी एकदा बघून आलेलो आहे,' तो म्हणाला. 'एक पक्षी आत शिरायचा प्रयत्न करतोय्.'

'त्याला हाकलून द्या ! मला त्या किटकिटीमुळे झोप येणार नाही !'

तो दुसऱ्या खपेला खिडकीशी गेला. या वेळी तिथं एकच पक्षी नव्हता; चांगले सहा पक्षी खिडकीच्या तळाशी असलेल्या लाकडी फळीवर बसले होते. त्यांनी सरळ त्याच्या चेहऱ्यावर झडप घातली.

तो ओरडला. दोन्ही हातांनी त्यांना झटकून टाकू लागला. त्याबरोबर पहिल्याप्रमाणे ते छतावर उडून गेले.

त्यानं खिडकी ओढून कडी लावून टाकली.

अचानक मुलांच्या खोलीतून किंचाळी ऐकू आली.

'जिल् ओरडली वाटतं.' असं म्हणून त्याची बायको अंथरुणात उठून बसली.

पुन्हा ओरडल्याचे आवाज आले. दोन्ही मुलं धावपळ करत भीतीनं किंचाळत होती. नॅट एव्हाना त्या खोलीत पोहोचला होता. अंधारात पंखांची फडफड ऐकू येत होती. खिडकी सताड उघडी होती. तिथून पक्षी आत शिरत होते. आधी छताला आणि भिंतींना धडका मारून ते खोलीच्या मधोमध फिरू लागले. नंतर त्यांनी मुलाकडे मोर्चा वळवला.

'घाबरू नका; मी आलोय !' नॅट ओरडला. मुलं धावली आणि त्याला एकदम बिलगली. त्यांचं रडणं चालूच होतं. आता पक्ष्यांनी आपलं लक्ष्य बदललं. नॅटवर त्यांनी रोख धरला.

'काय झालं नॅट ? तिकडे काय चाललंय ?' बायकोचा आवाज आला. त्यानं दोन मुलांना त्वरेनं खोलीबाहेर ढकललं आणि दरवाजा आतून बंद करून घेतला. मुलाच्या खोलीत पक्ष्यांबरोबर तोच एकटा राहिला.

जवळच्या बिछान्यावरून त्यानं एक रग उचलला आणि बचावासाठी एक शस्त्र म्हणून तो आपल्या भोवती जोरात गोल फिरवायला सुरुवात केली.

पक्षी तरीही त्याला चिकटून जात होते. पंखांचे आवाज कानात घुमत होते. अद्याप पक्षी पराभूत झाले नव्हते. ते पुन्हा पुन्हा नॅटवर चालून येत होते. त्याचा चेहरा, हात, पक्ष्यांच्या अणकुचीदार चोचीमुळं जखमी होत होते.

त्यानं आता बचावाची भूमिका घेतली. रग डोक्याभोवती गुंडाळून तो उघड्या हातांनी सामना देऊ लागला. दार उघडून बाहेर पडायचं धाडस त्याला झालं नाही. कारण पक्ष्यांनी लगेच त्याचा पाठलाग केला असता.

तो अंधारात किती वेळ त्यांच्याशी झगडत होता याची त्याला शुद्धच नव्हती; पण पंखांची फडफड हळूहळू कमी झाली आणि अखेर बंद पडली. जाड रगामधून त्याला उजेडाची जाणीव झाली.

तरीही तो थांबला. त्यानं कान दिले. त्याच्या एका मुलाच्या रडण्याचा आवाज सोडला तर बाकी शांत होतं.

त्यानं रग बाजूला केला. खोलीत पहाटेचा प्रकाश पसरला होता.

तो उजेड आणि उघडी खिडकी यामुळं पक्षी बाहेर निघून गेले होते. मेलेले जमिनीवर पसरले होते.

नॅटच्या अंगावर शहारे आले. खिडकीशी जाऊन तो बाहेरच्या बागेकडे आणि दूरवर दिसणाऱ्या जमिनीच्या हिरव्या पट्ट्याकडे बघू लागला.

थंडी बसुमार होती. समोरचा परिसर उदासवाणा वाटत होता. समुद्र उसळ्या मारून परतत होता. पक्ष्याचं कुठेच चिन्ह दिसत नव्हतं.

खिडकी आणि मुलांच्या झोपण्याच्या खोलीचं दार बंद करून तो स्वत:च्या खोलीत परतला.

त्याची बायको बिछान्यात बसून होती. बाजूला एक मूल झोपलं होतं. छोटं तिच्या खांद्यावर होतं. त्याला चेहऱ्यावर मलमपट्टी केलेली होती.

'तो आता झोपलाय्,' ती कुजबुजली. 'त्याला काही चावलं असलं पाहिजे; त्याच्या डोळ्यांजवळ थोडंसं रक्त साकळलं होतं. जिल् म्हणाली की पक्ष्यांनी हल्ला केला. तिला जाग आली तेव्हा खोलीत पक्षी शिरलेले होते.'

ती नॅटच्या चेहऱ्याकडे काळजीनं बघत होती. मुलांच्या खोलीत काय दिसलं, हे तिला हवं होतं. तोही भयचकित झाला होता; गेल्या काही तासातील घटनांमुळं हादरला होता; पण त्याला ते बायकोला दिसू द्यायचं नव्हतं.

'तिथं पक्षी आहेत,' तो म्हणाला, 'जवळ जवळ पन्नासएक. पण मेलेले !'

तो बिछान्यावर तिच्या शेजारी बसला.

'हवामान फार बिघडलेलं आहे, त्यामुळंच असं घडलं असावं. ते पक्षी आपल्या भागातले दिसत नाहीत. बहुधा वरच्या भागातून इथपर्यंत त्यांचे थवे उडत आले असावेत.'

'पण नॅट,' त्याची बायको हळूच म्हणाली, 'आज रात्रीच तर हवा बदलली. अजून ते पक्षी भुकेलेले नसणार. शेतामध्ये त्यांना खाद्य मिळण्यासारखं आहे.'

'हवा फार बाईट आहे.' नॅट म्हणाला, 'मी नक्की सांगतो, हवेमुळंच ते बिथरलेले आहेत.'

तिच्याप्रमाणे तोही थकून गेला होता.

दोघांनी काही क्षण नुसतंच एकमेकांकडे पाहिलं.

नंतर नॅट खिडकीशी जाऊन बाहेर पाहू लागला. आकाश निस्तेज झालं होतं. आदल्या दिवशी उन्हात चमकणाऱ्या टेकडया आता गडद आणि उघडघावोडक्या दिसत होत्या. एका रात्रीत कृष्ण हिवाळा अवतरला होता. थोडया वेळानं मुलं उठली. जिल् काही तरी बडबडत होती. छोटया जॉनीनं पुन्हा गळा काढला. नॅटची बायको त्यांची समजूत काढत होती. तो जिना उतरून खाली गेला. त्यानं सर्वांसाठी नाश्ता तयार केला.

सगळे एकत्र आल्यावर जिल्नं विचारलं, 'तुम्ही पक्ष्यांना हाकलून लावलंत बाबा ?'

'हो ! ते सगळे निघून गेले. पूर्वेकडच्या जोरदार वाऱ्यामुळं ते इकडे आले.'

'ते पुन्हा परत आले नाहीत म्हणजे झालं !' जिल् म्हणाली.

'चल, मी तुला बसपर्यंत सोडतो.' नॅट तिला म्हणाला.

जिल् गेल्या रात्रीचा प्रसंग बहुतेक विसरून गेली होती. नॅटच्या पुढे ती धावत होती. वाटेतल्या झाडांच्या फांद्या ओढत होती. तिचा लालसर चेहरा प्रसन्न दिसत होता.

नॅट दूरवर पक्षी कुठे दिसतात का, याचा शोध घेत होता; पण त्यांचा पत्ताच नव्हता. तेवढयात बस टेकडी चढून वर आली. जिल् बसमध्ये चढल्यावर नॅट शेताकडे निघाला. आज त्याचा कामाचा दिवस नव्हता, पण सगळं ठाकठीक असल्याची त्याला खात्री करून घ्यायची होती.

शेतातल्या घराच्या मागल्या दारी तो गेला. आतून सौ. ट्रिग गाण्याची लकेर काढत होत्या. शिवाय जोडीला रेडिओचा आवाज येत होता.

'बाई, आहात का घरात ?' नॅटनं हाक मारली.

प्रेमळ आणि सदा हसतमुख बाई दारात आल्या.

'हल्लो, मि. हॉकन,' त्या म्हणाल्या. 'ही एवढी थंडी आली तरी कुठून ? रशियाहून? असला बदल कधीच पाहिला नव्हता.थंडीची लाट अशीच कायम राहणार आहे, असं रेडिओवर सांगितलं. आर्क्टिक सर्कलशी त्याचा काही तरी संबंध आहे.'

'सकाळी आम्ही रेडिओ लावलाच नाही' नॅट म्हणाला.

'रात्री आम्हाला फारच त्रास झाला.'

'मुलांनी सतावलं का ?'

'नाही.' ते सगळं कसं स्पष्ट करून सांगावं, हे त्याला कळेना. पक्ष्यांशी दिलेला मुकाबला या वेळी दिवसाउजेडी खोटा वाटण्याची शक्यता होती.

त्यानं रात्रीची हकिगत सांगायचा प्रयत्न केला; पण बाईंच्या चेहऱ्यावर अविश्वास स्पष्ट दिसत होता. भरपेट जेवल्यामुळं त्याला तसलं विचित्र स्वप्न पडलं असावं, असा त्यांचा भाव होता.

'म्हणजे खरे पक्षी आले होते का ?' तिनं हसून विचारलं.

'बाईसाहेब, मुलांच्या खोलीत पन्नासएक पक्षी मरून पडलेले आहेत. रॉबिन, रेन्स आणि तसलेच इतर त्यांनी माझ्यावर हल्ला केला. जॉनीच्या डोळयांजवळ जखमा केल्या.'

सौ. ट्रिगना अजूनही खात्री वाटत नव्हती. 'म्हणजे, ते पक्षी थंड वाऱ्याबरोबर इकडे आले असले पाहिजेत!' त्या म्हणाल्या, 'एकदा खोलीत शिरल्यावर त्यांना कुठे आहोत हे कळेनासं झालं असेल. आर्क्टिक सर्कलकडचे नवखे पक्षी दिसतात !'

'छे ! आपल्याकडे दिसणारेच ते पक्षी होते.'

'कमाल आहे !' बाई म्हणाल्या. 'काही समजत नाही. तुम्ही गार्डियनला लिहून विचारा. ते बरोब्बर सांगतील. बरं, आता मला गेलं पाहिजे !'

नॅट सावकाश चालत घरी परतला. त्याची बायको स्वयंपाकघरात छोटया जॉनीसह बसली होती.

'कुणी भेटलं ?' तिनं विचारलं.

'ट्रिगबाई भेटल्या. त्यांचा माझ्यावर विश्वास बसला नाही. असो. तिकडे काही बिघडलेलं नाही !'

'तुम्ही पक्षी बाहेर फेकून द्या !' ती म्हणाली. 'मला अंथरुणं सारखी करायची आहेत; पण फार भीती वाटते.'

'भीतीचं काहीच कारण नाही. ते मेलेले आहेत ना ?'

नॅट एक पोतं घेऊन वर गेला. टणक बनलेले मृत पक्षी तो एकेक करून पोत्यात भरू लागला. ते पन्नास तरी होतेच. अगदी नेहमीचे लहानसर पक्षी. सारिकेएवढेसुद्धा मोठे नाहीत ! त्यांनी भीतीपोटीच केवळ कालचा हल्ला केला असणार !

पोतं बागेत नेल्यावर नवीनच प्रश्न त्याच्यापुढं उभा राहिला. जमीन गोठल्यासारखी टणक झाली होती. तरी अद्याप बर्फ पडलं नव्हतं. पूर्वेकडच्या वाऱ्याखेरीज गेल्या काही तासांत कुठलाच बदल झाला नव्हता. ही घटना अनैसर्गिक आणि दुर्मिळ होती. त्या जागेवरून नॅटला समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर आदळताना दिसत होत्या. लाटांवर पांढऱ्या टोप्या विराजमान झाल्या असाव्यात, असं दृश्य दिसत होतं. समुद्रकाठच्या वाळूत पक्ष्यांना पुरून टाकावं, असं त्यानं ठरवलं.

तो जेव्हा किनाऱ्याजवळ पोचला तेव्हा वाऱ्याचा जोर एवढा होता की त्याला नीट उभं देखील राहता येईना. ओहोटीचा जोर मध्यम होता. एका लाकडी फळीवरून चालत जाऊन तो मऊ मऊ वाळूपर्यंत गेला. नंतर वाऱ्याकडे पाठ वळवून त्यानं पोतं उघडलं.

वाळूत खड्डा खणून नॅटनं पोतं त्यावर उपडं केलं; पण वाऱ्याच्या तुफान वेगामुळं सगळे पक्षी जणू पुन्हा भरारी मारल्याप्रमाणे इतस्तः उडून गेले आणि वाळूत पसरले. पिसं हवेत फिरावीत त्याचप्रमाणे अगदी !

भरतीच्या वेळी पाणी त्यांना आत ओढून नेईल, असं तो स्वत शी म्हणाला.

त्यानं काही काळ लाटाचं निरीक्षण केलं. ओहोटी असल्यामुळं त्यांच्या गर्जना दूरवरून ऐकू येत होत्या.

आणि त्याला ते दिसले. समुद्रपक्षी. लाटांवर ते आरूढ झालेले होते.

त्याला आधी ज्या पांढऱ्या टोप्या वाटत होत्या, ते समुद्रपक्षीच होते. शेकडो, हजारो, लाखो...

लाटांबरोबर ते वरखाली होत होते. त्याची तोंडं वाऱ्याच्या दिशेनं होती. लढाऊ गलबतानी जणु तिथे नांगर टाकलेले होते.

पक्षी कसली तरी वाट बघत होते.

किनारा सोडून नॅट परत निघाला. चढाच्या रस्त्यावरून त्यानं घराची दिशा घेतली.

कोणाला तरी हे सागितलं पाहिजे सर्वांना हे समजलं पाहिजे. पूर्वेच्या वाऱ्यांमुळं आणि हवेतील बदलामुळं काही तरी विलक्षण घडत

होतं; पण त्याला काय घडतंय ते समजत नव्हतं.

त्याची बायको दारातच वाट बघत उभी होती. तिनं जोरात हाक मारली. 'नॅट, रेडिओवर माहिती सांगतायत. नुकतंच त्यांनी खास बातमीपत्र वाचलं. आपल्या इथंच फक्त हे घडलेलं नाही, अगदी सगळीकडे! लंडनमधेही. साऱ्या देशात. पक्ष्यांना काही तरी झालेलं आहे. लवकर या, ते पुन्हा बातम्या देणार आहेत!'

दोघंजण लगबगीनं स्वयंपाकघरात गेले आणि रेडिओवरचं खास प्रकटन ऐकू लागले.

'गृहखात्याकडून खास प्रकटन. देशाच्या निरनिराळ्या भागांतून बातम्या येत आहेत की खेड्यांवर आणि शहरांवर फार मोठ्या प्रमाणात पक्षी जमा झालेले असून ते घराघरांचं, मालमत्तेचं नुकसान करत आहेत; एकट्या दुकट्या व्यक्तींवर हल्ला चढवत आहेत. आर्क्टिककडून थंड वारे सध्या ब्रिटिश बेटांकडे वाहात असून त्याबरोबरच पक्ष्यांच्या धाडी इकडे आल्या असाव्यात. आत्यंतिक भुकेमुळे माणसांवर हे पक्षी तुटून पडण्याचा धोका आहे. तरी सर्वांनी आपापल्या घराच्या दारं, खिडक्या आणि धुराडी यांचा पक्का बंदोबस्त करून मुलाबाळांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घ्यावी. यापुढील प्रकटन लवकरच दिले जाईल.'

नॅटच्या सर्वांगातून एक चमक निघून गेली. त्यानं बायकोकडं विजयी कटाक्ष टाकला. 'बघ, सकाळपासून मी स्वत:शी म्हणत होतो की, काही तरी बिघडलेलं आहे आणि आताच किनाऱ्यावर मी गेलो होतो तेव्हा समुद्रावर हजारो पक्षी वाट बघत थांबलेले मी बघितले.'

'ते कसली वाट बघतायत, नॅट?' तिनं विचारलं.

तिच्याकडे टक लावून बघत तो म्हणाला, 'कुणास ठाऊक!'

तो एका कपाटाच्या ड्रॉवरशी गेला आणि त्यानं हातोडी तशीच इतर हत्यारं बाहेर काढली.

'तुम्ही काय करणार आहात?'

'खिडक्या आणि धुराडी बघितली पाहिजेत. त्यांनी सांगितलं नाही का?'

'रॉबिनसारखे पक्षी खिडक्या फोडून आत येतील, असं तुम्हाला वाटतं? कसं शक्य आहे ते?'

त्यानं काहीच उत्तर दिलं नाही. रॉबिन किंवा रेन्सची त्याला काळजी नव्हती. तो समुद्रपक्ष्याचा विचार करीत होता.

तो वर गेला आणि राहिलेली सकाळ त्यानं बेडरूमच्या खिडक्या भक्कम करण्यात घालवली. धुराड्याचा तळ त्यानं बोळ्यानी वगैरे भरून टाकला.

'जेवण तयार आहे!' त्याच्या बायकोनं खालून हाक मारली.

'ठीक आहे, आलोच.'

जेवण उरकलं. एक वाजता नॅटन बातम्या लावल्या. आधीचं प्रकटन वाचून झाल्यावर थोडी नवीन माहिती देण्यात आली.

'पक्ष्यांच्या प्रचंड थव्यामुळे निरनिराळ्या भागाचा संपर्क तुटलेला आहे. आज सकाळी दहा वाजता लंडनवर इतके दाट थवे होते की, एक प्रचंड काळा ढगच आकाशात असल्याचा भास होत होता. हे पक्षी घराच्या छतावर, खिडक्या दारांच्या शटर्सवर उतरले आहेत. त्यात घरगुती चिमण्या, कोकिळा, सारिका, काळ्या डोक्याचे समुद्रपक्षी, कबुतरं, साळुंकी इत्यादी विविध प्रकारचे पक्षी आहेत. हे दृश्य अगदीच दुर्मिळ असल्यामुळे कित्येक रस्त्यावर वाहतूक खोळंबून राहिली होती. दुकाने आणि कार्यालयात कामकाज बंद पडले होते. रस्ते लोकांनी भरून गेले होते.' निवेदिकेचा आवाज अतिशय संथ आणि मधुर होता. तिला ही सगळी घटना म्हणजे जणू एक विनोदच वाटत होता, असं नॅटला वाटलं. तिलाच काय पण इतर शेकडो जणांना प्रसंगाचं गांभीर्य समजलं नसणार, अशी त्याची खात्री होती. रात्रीच्या वेळी अंधारात पक्ष्यांबरोबर झुंज देणं किती अवघड आहे याची त्यांना काय कल्पना!

नॅटनं रेडिओ बंद केला. त्यानं स्वयंपाकघरातील खिडक्यांचं काम सुरू केलं. त्याची बायको जॉनीला पायांशी धरून ते बघत राहिली.

थोड्या वेळानं ती म्हणाली, 'त्यांनी काय करायला पाहिजे तर लष्कराला बोलावून पक्ष्यांना गोळ्या घातल्या पाहिजेत!'

'करून बघायला हरकत नाही; पण ते अवघड काम आहे.'

'काही तरी केलं पाहिजे हे तर नक्कीच. त्यांचंच हे काम आहे!' ती म्हणाली.

या वेळी 'ते लोक' या प्रश्नावर विचार करत असणार यात शंकाच नव्हती; पण ते लंडन किंवा इतर मोठ्या शहरासाठी जो तोडगा काढतील, त्याचा या तीनशे मैल दूर असलेल्या खेड्याला काहीच उपयोग नव्हता. नॅट त्यावरच विचार करत होता.

'आपल्याकडं अन्नधान्याची परिस्थिती काय आहे?' त्यानं विचारलं.

'उद्या खरेदीचा दिवस आहे. हे तुम्हाला ठाऊकच आहे. मी घरात फार साठा कधीच ठेवत नाही; पण परवापर्यंत तसं काही अडणार नाही आणि उद्या तर मी जाईनच!'

तिला उगीच घाबरवण्याची त्याची इच्छा नव्हती. त्यानं स्वत:च कपाटातले डबे तपासले

आणखी दोन दिवस त्यांच्या जेवणाची सोय होती.

खिडकीवर बोर्ड ठोकायचं काम त्यानं पुढं चालू ठेवलं. मेणबत्त्या! घरातल्या मेणबत्त्या जवळजवळ संपल्या होत्या. आज रात्री लवकर झोपलं पाहिजे. अर्थात जर त्यांनी–

तो मागच्या दारातून बाहेर गेला आणि बागेत उभं राहून समुद्राकडे बघू लागला.

दिवसभर सूर्याचं दर्शन नव्हतं. आता दुपारी तीन वाजताच एक प्रकारे अंधार पडला होता आकाश रंगविहीन, उदासवाणं दिसत होतं. खडकांवर आदळणाऱ्या लाटांचा आवाज त्याला ऐकू येत होता.

तो किनाऱ्याकडे निम्म्या अंतरापर्यंत चालत गेला आणि नंतर एकदम थांबला. भरती सुरू झाल्याचं त्याच्या लक्षात आलं. समुद्रपक्षी उठले होते. वाऱ्याशी झगडा देत, पंख हालवून ते शेकडो, हजारो पक्षी हवेत घिरट्या घालू लागले होते.

त्या पक्ष्यांमुळेच आकाश अंधारून आलं होतं.

आणि ते शांत होते, गोल गोल फिरत होते, वरखाली करत होते. वाऱ्याशी आपली शक्ती अजमावत होते. नॅट वळला. तो धावतच घरी परतला.

'मी जिलला आणायला जातो!' तो बायकोला म्हणाला.

'काय झालं?' तिनं विचारलं, 'तुमचा चेहरा पांढरा पडलाय!'

'जॉनीला कायम आतच ठेव. दार बंद राहू दे पडदे सोड आणि दिवे पेटव !'

'पण आता फक्त तीनच वाजतायत.' ती म्हणाली.

'असू दे. मी सांगतो तसं कर !'

त्यानं हत्यारांच्या जागेतून एक कुदळ उचलली.

तो बसस्टॉपच्या दिशेनं जाऊ लागला. एकसारखा तो वर बघत होता. पक्षी अधिक उंचीवर गेलेले होते. त्यांची वर्तुळं विस्तारली होती. दृष्टी जाईल तिथपर्यंत आकाशात पक्षीच पक्षी दिसत होते.

त्यानं वेग वाढवला. चारशिवाय बस येणार नव्हती. तरीही त्याला घाई करणं आवश्यक होतं.

डोंगरमाथ्यावर तो वाट पाहू लागला. अजून अर्धा तास जायचा होता.

पूर्वेकडून येणारे वारे शेताना झोडपत होते. दूरवर अनेक टेकड्या उभ्या होत्या. त्यांच्यामागून एक काळा ढग वर सरकत असलेला दिसला. प्रथम लहानसर, पण नंतर बघता बघता त्यानं क्षितिज व्यापून टाकलं. लवकरच त्याचं पाच ढगात विभाजन झालं आणि ते उत्तर, पूर्व, दक्षिण आणि पश्चिमेला पसरले. ते ढग नसून पक्षी होते हे नॅटच्या केव्हाच लक्षात आलं होतं !

पक्ष्यांचा प्रवास पाहून ते जमिनीकडे आतवर घुसणार हे स्पष्ट झालं होतं. द्वीपकल्पावरच्या इथल्या लोकांशी त्यांना काहीच कर्तव्य नव्हतं. आतापर्यंत न दिसलेले अनेक लहानमोठे पक्षी त्यात सामील झालेले होते. नेहमी हे पक्षी लहानश्या कृमिकीटकांवर उदरनिर्वाह करतात—पण त्यांची आजची मोहीम वेगळीच असणार होती.

तो जवळच्या टेलिफोनबूथमध्ये शिरला. त्यानं रीसिव्हर उचलला. 'मी हायवेवरून बोलत आहे. बसस्टॉपच्या जवळून. जमिनीकडे फार मोठ्या प्रमाणात पक्षी चालले आहेत, म्हणून मी रिपोर्ट करत आहे. उपसागरातून समुद्रपक्षीही आकाशात उठलेले आहेत !' हा संदेश ऑपरेटरनं योग्य ठिकाणी पोहोचता करावा, ही त्याची अपेक्षा होती.

'ठीक आहे !' एक कंटाळलेला आवाज आला.

'तुम्ही ताबडतोब अधिकाऱ्यांच्या कानावर ही गोष्ट घालालच !'

'हो, हो !' असं पलीकडची बाई त्रासून म्हणाली, आणि फोन बंद पडला.

ही आणखी एक बाई, नॅट मनाशी म्हणाला. तिलाही चिंता नाही.

बस थडथडत टेकडीवर आली. जिल् त्यातून खाली उतरली.

'कुदळ कशाला आणलीत, डॅड ?' तिनं लगेच प्रश्न केला.

'अगदी सहज !' तो म्हणाला, 'आता घरी चला. खूप थंडी आहे, तेव्हा उगीच इकडे तिकडे करायचं नाही. तू किती जोरात पळतेस ते पाहू !'

त्यानं पाहिलं, समुद्रपक्षी अजूनही शांतपणे घिरट्या घालत होते; पण त्यांचा रोख जमिनीकडे वळला होता.

'ते बघा, डॅड. केवढे पक्षी आहेत !'

'होय. चल लवकर !'

'ते कुठं जात असतील ?'

'बहुतेक शहरांच्या दिशेला. तिकडे थोडं ऊबदार वातावरण असतं.'

त्यानं तिचा हात पकडला आणि तो तिला जवळजवळ ओढतच नेऊ लागला.

'सावकाश चला नं, मला त्रास होतो !'

टेकड्यांमागून आलेल्या पक्ष्यांप्रमाणे समुद्रपक्ष्यांचेही विभाग झाले आणि ते आकाशात पसरू लागले. हजारोंच्या थव्यांनी ते अचूक चार दिशांना प्रवास करू लागले.

'डॅड, हे काय ? पक्षी काय करतायत ?'

ते पक्षी नक्की जमिनीच्या दिशेला जातील अशी चिन्हं नव्हती. अजूनही ते डोक्यावरून घिरट्या घालत होते; शिवाय फार उंचीवरही नव्हते. जणु सगळे पक्षी एखाद्या इशाऱ्याची वाट बघत असावेत; जणु एखादा निर्णय अद्याप घ्यायचा बाकी असावा.

'पक्षी निघून जाऊ देत. ते बघा ना किती खाली आलेत ते ! मला त्यांची फार भीती वाटते !' जिल् रडू लागली.

तो धावू लागला जिल् त्याच्यामागे अडखळत, धडपडत जाऊ लागली. शेताच्या वळणावर त्याला मि. ट्रिग जीप मागे वळवताना दिसले. नॅटनं त्यांना हाक मारली.

'आम्हाला लिफ्ट देता का ?' त्यानं विचारलं.

ट्रिग मागे वळून पाहू लागले. त्यांच्या प्रसन्न चेहऱ्यावर हसू उमटलं. ते नॅटला म्हणाले, 'मोठी गंमत आहे ! तुम्ही समुद्रपक्षी पाहिले का ? जिम आणि मी त्यांची शिकार करणार आहोत. इतके पक्षी पाहून सगळेजण वेडेच झाले आहेत. गावात दुसरा विषयच नाही. रात्री तुम्हाला त्रास झाला असं ऐकलं. बंदूक हवी आहे का ?'

नॅटनं मान हलवली.

गाडी पूर्ण भरली होती, पण मागच्या सीटवर जिल्पुरती जागा होती.

'मला बंदूक नको,' नॅट म्हणाला, 'पण तुम्ही हिला घरापर्यंत नेऊन सोडाल, तर फार बरं होईल ती फारच घाबरून गेली आहे!'

'ओके, मी तिला घरी पोचतं करतो' शेतकरीबाबा म्हणाले, 'तुम्ही शिकारीसाठी मागे का थांबत नाही ? आपल्याला खूप पंख मिळतील.'

तोपर्यंत जिल् गाडीत चढली होती ट्रिग यांनी गाडीचा वेग वाढवला. मागोमाग नॅट झपाझप जाऊ लागला. 'ट्रिगना वेड तर लागलं नाही !' नॅट मनाशी म्हणाला, 'आभाळ भरून पक्ष्यांपुढे बंदुकीचा काय पाड लागणार ?'

पक्षी आता थोडे खाली येऊन शेतावर घिरट्या घालत होते. म्हणजे शेतावरच त्यांची नजर होती तर ! त्याला आपलं घर दुरून दिसू लागलं. नि. ट्रिग परत निघाले होते. त्यांची जीप नॅटजवळ थांबली.

'पोरगी घरात पळाली, बरं का !' तिची आई वाट बघत दारातच उभी होती. 'काय हो, तुम्हाला काय वाटतं ? गावात असं बोललं जातं की रशियन लोकांचंच हे काम आहे. त्यांनी पक्ष्यांना विष घातलेलं आहे !'

'पण त्यांना हे कसं काय शक्य आहे ?' नॅटनं विचारलं.

'ते मला विचारू नका ! अफवा कशा पसरतात, तुम्हाला ठाऊकच आहे !'

'तुम्ही खिडक्यांना बोर्ड लावले का ?' नॅट.

'छे ! काही तरी भंकस. खिडक्यांकडे बघण्यापेक्षा मला आज खूप कामं होती !'

'तुमच्या जागी जर मी असतो तर वेळ न गमवता लगेच घरी जाऊन खिडक्या बंदिस्त केल्या असत्या!'

'तुम्ही नसता बाऊ करताय् सगळेजण

आमच्या घरी झोपायला येता का ?'

'नको. बोलवल्याबद्दल धन्यवाद!'

'ठीक आहे, सकाळी भेटू. पक्ष्यांचा नाश्ता देतो बघा!'

तो शेतकरी हसला आणि शेताकडे निघून गेला. नॅट त्वरेनं जाऊ लागला. थोडं अंतर बाकी होतंच. त्याला अचानक पंखाची फडफड ऐकू आली. एक काळसर समुद्रपक्षी आकाशातून त्याच्यावर झेपावला. त्याचा रोख थोडक्यात चुकला आणि तो पुन्हा वळून येण्यासाठी वर गेला. क्षणार्धात त्याच्या जोडीला आणखी पक्षी आले– सहा, सात, जवळजवळ दहा–बारा!

नॅटनं कुदळ टाकून दिली तिचा काहीच उपयोग नव्हता. तोंडावर दोन्ही हात धरून तो घराकडे धावू लागला.

पक्षी त्याच्यामागेच लागले होते. आवाज करता, मूकपणे. पंखांचा मात्र चांगलाच फडफडाट होत होता. त्याच्या मनगटांना, दंडाला आणि मानेला रक्त येत असल्याचं त्याला जाणवलं. फक्त डोळ्यांचा बचाव केला पाहिजे, बाकी कसली चिंता नाही; तो हीच प्रार्थना करत होता.

दर झेपेत, दर हल्ल्यानंतर ते अधिकाधिक धीट होत गेले आणि त्यांना स्वतःचा विचारच नव्हता. त्यांची झेप चुकली आणि वेग आवरता आला नाही म्हणजे काही पक्षी जमिनीवर आदळत होते, जखमी होत होते.

नॅटच्या पायाखाली असे कित्येक पक्षी येत होते. तो तोल सावरत कसाबसा पळत होता.

घर आल्यावर त्यानं जखमी हातांनी दार जोरजोरात ठोकलं. 'दार उघड!' तो ओरडला. 'मी नॅट. मला आत येऊ दे!'

नंतर त्याला डोक्यावर एक मोठा समुद्रपक्षी झडप घेण्याच्या तयारीत असलेला दिसला. बाकीचे पक्षी वर उडून गेले. वाऱ्याच्या झोतामुळे ते एकमेकांवर आदळत होते. फक्त एकच तेवढा खाली थाबला होता.

एकदम त्यानं पंख मिटले आणि एखाद्या दगडासारखा तो खाली कोसळला! नॅट जोरात किंचाळला आणि दार उघडलं गेलं.

तो उंबऱ्याशी अडखळला. तो आत शिरताच बायकोनं दार ढकलून ते पाठीनं दाबून धरलं.

बाहेर पक्षी जमिनीवर आदळल्याचा आवाज झाला.

बायकोनं जखमांना मलमपट्टी केली. त्या फारशा खोल नव्हत्या. मनगटं आणि त्याच्यावर हातांना सगळ्यात जास्त त्रास झाला होता. त्यानं टोपी घातली नसती तर डोक्याचाही निभाव लागला नसता. मगाच्या मोठ्या समुद्रपक्ष्यानं त्याची कवटीच बाहेर काढली असती!

मुलं रडतच होती. त्यांनी आपल्या वडलांच्या हातांना रक्त आलेलं बघितलं होतं. त्यानं मुलांची समजूत काढली.

'मला काहीही झालेलं नाही. आता सगळं ठीक आहे!'

त्याची बायको पांढरीफटक पडली होती. ती हळूच म्हणाली, 'मी आकाशात ते बघितले होते. जिल् गाडीतून आली तेव्हा बरेचसे खाली जमले होते. ती घरात आल्यावर मी दार जोरात बंद केलं म्हणून ते घट्ट बसलं होतं. त्यामुळं तुम्ही आल्यावर आता ते लगेच उघडलं नाही!'

'मी येईपर्यंत पक्षी थांबले हे नशीबच!' तो म्हणाला. 'जिल् लगेच कोसळली असती. सगळे मोठेमोठे पक्षी देशाच्या आतल्या भागात चालले आहेत. हजारो, लाखो पक्षी. बसस्टॉपवरूनच मला ते दिसले!'

'पण ते काय करू शकतील?'

'लोकावर हल्ला. रस्त्यावर दिसणाऱ्या प्रत्येकाला ते जखमी करतील. नंतर खिडक्या आणि घराड्यामधून घुसायचा प्रयत्न करतील.'

'मग अधिकारीमंडळी उपाय का करत नाहीत? लष्कराला बोलावून मशीनगन्सचा वापर करायला पाहिजे!'

'तेवढा वेळच मिळालेला नाही. कोणीच तयारीत नव्हतं. सहाच्या बातम्यात आपल्याला काय ते कळेलच!'

'डॅड, मला पक्ष्यांचा आवाज येतोय्. तो बघा!' जिल् म्हणाली.

खिडक्यांबाहेर आणि दाराजवळ खरोखर आवाज येत होते. पृष्ठभागाला पंख घासत होते; आतमध्ये शिरायची त्यांची धडपड चालू होती. शटर्सवर अनेक पक्षी उड्या मारत होते आणि खाली कोसळल्याचे अस्पष्ट आवाज येत होते.

या धडपडीत कित्येकजण मरतील, असं नॅटला वाटलं; पण अगदीच अल्प प्रमाणात. त्यांची जागा अखंड भरून काढायला कमतरताच नव्हती.

'भ्यायचं काही कारण नाही.' तो मोठ्यानं म्हणाला. 'खिडक्यांना बोर्ड लावलेले आहेत. पक्षी त्यातून आत शिरू शकणार नाहीत!'

(उत्तरार्ध पुढील अंकी)

(मूळ लेखक : डॅफ्ने ड्यू मॉरिये)


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....

नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# रंगभूमी

## अरे चोरा !

### अत्यंत माफक करमणूक

या नाटकाच्या जाहिरातीत शक्यतो ५ वर्षाखालील मुलांना आणू नये असे लिहिले होते. 'शक्यतो' या शब्दाचा फायदा घेऊन पदराआड, शर्टाआड एखादे पिल्लू आपण आणलेच असेल आणि ते पिल्लू जर मध्ये रडलेच तर आम्ही म्हणू, 'अरे चोरा ......' !

असे आकर्षक आणि मंद फवारा उडविणारे निवेदन घेऊन येणारे 'मोनिका थिएटर्स'चे 'अरे चोरा' हे नाटक तितकेसे रंगत नाही.

या नाटकाचे कथानक घडते, मुंबईतल्या सुखवस्तूंची वस्ती असलेल्या बिल्डिंगमधील एका ब्लॉकमध्ये. श्रीकांत वाघमारे हा 'नवकवी' (आणि कथेचा नायक) या ब्लॉकमध्ये रहात असतो. त्याच्या घरी 'ती' चोर शिरते, चोरी करायला; पण तशी नवखी असल्याने सापडते आणि इथेच गडबड–घोटाळ्याच्या कथेला सुरुवात होते (आणि शेवटही आपण इथेच ओळखतो. अशी देखणी चोर नायकाच्या घरात घुसल्यावर शेवट ओळखणे कठीण नाही. ) हा गडबड-घोटाळा संपूर्ण तीन अंक ताणला आहे आणि हा प्रकार रंजक करण्यात लेखक, दिग्दर्शक अयशस्वी ठरले आहेत.

संपूर्ण नाटक बघत असताना 'कच्चा माल' आयात केला असल्याची जोरदार शंका येते. (मूळ साहित्यकृती कुठली याचा जिज्ञासूंनी शोध घ्यावा.) नाट्यकथेचे 'बीज' (इंटलेक्चुअल्स 'जर्म' असे म्हणतात.) नक्कीच धमाल आहे; पण त्यावर तीन अंकी नाटक बनवताना तो जर्मच कुठे तरी हरवल्यासारखा वाटतो. मूळ विनोद पातळ झाल्यामुळे प्रेक्षकाला तीन तास खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य त्यात उरत नाही. (तरी आपण बसतो; खिशातले पैसे गेलेले असतात ना ?)

तरी बरं तर बरं, या नाटकाची जाहिरात 'कमाल विनोदी फार्स' अशी नाही आणि नाटकसुद्धा 'फार्स' नाही ! (वास्तविक फार्स या फ्रेंच शब्दाचा अर्थच मुळी विनोद असा आहे आणि फार्स हा एक स्वतंत्र नाटचप्रकार फ्रेंच रंगभूमीवर गेली कित्येक वर्षं आहे, तरी आपल्याकडे इतके सगळे 'धमाल विनोदी फार्स' कसे ? ते तसेच ! हसो हसो ! !)

तेव्हा या नाटकाची जातकुळी (स्लॅपस्टिक कॉमेडी'ला जवळची आहे असे आपण म्हणू शकतो. (म्हणजे तेच हो, लॉरेल–हार्डी किंवा चॅप्लिनच्या सिनेमांना आपण बाळपणी पोट दुखेपर्यन्त हसत असू ना, त्यालाच स्लॅपस्टिक कॉमेडी असे म्हणतात.)

असे वाटण्याचे कारण म्हणजे पात्रे व त्यांचा अभिनय, संवाद व संवाद बोलायची धाटणी, शिवाय गडबडगुंडा प्रसंग !

पात्रांचा विचार करताना 'परके'पणा जाणवतो. उदाहरणार्थ डिटेक्टिव्ह गुरव (प्रदीप पाटील) हे पात्र सरळसरळ 'पिंक पँथर' या गाजलेल्या चित्रमालिकेतील वाटते. विशेषतः या चित्रपटांच्या टायटलच्या वेळच्याच कार्टून्समधला जो डिटेक्टिव दाखवला आहे, त्याची अगदी हटकून आठवण होते. ढगळ तांबडी पँट, (मळकट) पांढरा ढगळ कोट, काळ्या दोऱ्यानं बांधलेले व 'खालीपर्यंत' लोंबणारे मोठे भिंग, त्यातून प्रत्येक व्यक्ती व वस्तूकडे बघणं, चालताना पाय फाकवून, गुडघ्यात वाकवून चालणं वगैरे. हा डिटेक्टिव मूर्ख असणं ओघानंच आलं; पण श्री. पाटील यांनी भूमिकेला न्याय दिला आहे हेही खरे.

एक महत्त्वाचं पात्र म्हणजे कथानायक श्रीकांत वाघमारे. काकाच्या फ्लॅटमध्ये राहून त्याच्याच पैशावर चैन करणारा, (काकाच्या पैशानं कागद आणून कविता करणारा), पैशासाठीच काकाच्या मरणाची वाट पहाणारा (आणि काकाची तब्येत ठणठणीत पाहून दुःखी होणारा) हा एक खुशालचेंडू तरुण. तसा तो मनानं वगैरे चांगलाच असतो बरं का ! तर, याचं काम बघताना आपण हे सगळं पूर्वी कुठं तरी पाहिलंय असं वाटत राहतं. उदाहरणार्थ, प्रत्येक गोष्ट याला उशीरा कळते. बॉबशी खेळताना तो बॉंब आहे हे कळल्यावर धावपळ करणं इ. इ. ही स्टाइल अनेक इंग्रजी नटांच्या बरोबरीनं हिंदी रजतपटावर आगा या विनोदी नटानं बरीच लोकप्रिय केली आहे. तसेच आपण बोललेल्या गोष्टींचा वेगळाच अर्थ घेतला गेल्यावर वैतागलेला वेटावाकडा चेहरा करणं ही पण स्टाइल जुनीच आहे नाही का ? ते असो. हे काम राजा गावडे सुरेख करतात. सगळी गडबड त्यांनी नीट सांभाळली.

काटकरशेठच्या भूमिकेत स्वतः सतीश दुभाषी आहेत. घराण्याची चौर्यकर्माची परंपरा मोठ्या निष्ठेने चालवणारा हा माणूस. आपल्या मुलीला–अरुणाला मुलगा मानून 'अरुण' म्हणणारा, तिनेही ही विद्या आत्मसात करावी म्हणून तळमळणारा बाप. माजी कॉर्पोरेटर, आपल्या मुलीला एका रात्रीत सुधारण्याचं 'वंगाळ काम' का केलं असं विचारायला हा (सद्) गृहस्थ नायकाकडे जातो. वास्तविक हा रोल खूप धमाल करता आला असता (पिग्मॅलियनमधील डूलिटलसारखा); पण ही जी भूमिका लिहिली आहे त्यातच फारसा दम वाटत नाही. टिपिकल पुढारी 'युनिफॉर्म' आता जुना आणि कंटाळवाणा वाटू लागला आहे. टोपीच्या कोनापासून ते खाकरणं, उभं राहणं, बसणं, चालणं, नमस्कार करण्याचा व बोलण्याचा ढंग सगळं पूर्वी पाहिलेलं आहे. त्यामुळं त्याच्यात काही नाविन्यच उरलेलं

नाही; पण त्या रोलमध्ये दुभाषी छान शोभून दिसतात. (आणि जरा बारीक झाले आहेत असंही वाटतं.)

आणखीन एक पात्र म्हणजे नायकाच्या आईच्या घरून आलेला व नायकाबरोबर राहणारा नोकर रामजी. इतर विनोदी नाटकांप्रमाणेच आगाऊ, आकडा खेळणारा, प्रसंगी मालकालाच पैसे उसने देणारा, पगार नाही म्हणून तक्रार करणारा, मालकाला लफडयातून सुटण्यासाठी मदत करणारा (आणि जास्त गोंधळ निर्माण करणारा) आणि मालकालाच शहाणपण शिकवणारा हा नोकर! (हा दुरून कुठून तरी 'जिव्हज्'शी नाते जोडण्याचा प्रयत्न करीत आहे का हो?) कोकणी उच्चारासह भूमिकेचा बाज श्रीकांत कांबळी यांनी चांगलाच सांभाळला हे नमूद करावयास हवे.

नायकाच्या आईचे पात्र (आशा गोगटे) नायक मूर्ख आहे हे आणखी एस्टॅब्लिश करण्याकरता घुसडले आहे असेच वाटते. त्याच्या नसण्याने काही फरक पडला नसता.

श्रीमंत व रंगेल काकाच्या भूमिकेत शशिकांत राजाध्यक्ष 'शोभून दिसले' या परते त्यात काहीच नाही.

बदामी ही कथानायकाची वाग्दत्त वधू, (पुढे ते लग्न 'या' चोराच्या सततच्या व रात्रीच्या उपस्थितीने मोडणे अपरिहार्यच) या भूमिकेत राधिका राव या विशेष रंगत आणू शकत नाहीत. यात अर्थात लेखक व दिग्दर्शक (दोन्ही सतीश दुभाषी) कमी पडले.

आपण एकदम खूष होतो ते भक्ती बर्वेवर! ती 'ब्रॅज अँड इन्'...अरे चोरा! आहे. जाहिरातीत म्हटल्याप्रमाणे तिची भूमिका खरोखरीच भन्नाट आहे!

घराण्याच्या चोरीच्या धंद्यात (चांगले शिक्षण घेऊन) नुकतेच पदार्पण केलेली व काही चोऱ्या यशस्वीपणे करून नंतर आपण पकडले गेल्याची खंत बोलून दाखवणारी ही अभिनव चोर तिने सुरेखच उभी केली आहे. बावळट श्रीकांत वाघमारेवर प्रथम दर्शनीच तिचे प्रेम बसते व त्याच्या 'उपदेशा'नुसार वागण्याचे ती ठरवते आणि आपली 'रिटायरमेंट' ती जाहीर करते. असल्या जगावेगळ्या वागण्याला होणारा घरचा विरोधही ती सहन करते आणि अखेरीस आपल्याला हवे ते (अर्थात नायक) ती मिळवते.

चोरी करताना पकडले गेल्याची खंत, आपण सुंदर नसल्याने लोक आपल्याकडे वळून वळून बघत नाहीत हे दुःख, त्याचबरोबर बेरकेपणा, श्रीकांत व बदामी बोलत असताना मुद्दाम शिरून आपले अस्तित्व जाहीर करण्याचे चातुर्य, असे त्या व्यक्तिरेखेतील खूप रोडस दाखवून अनेक प्रसंग, त्यात विशेष दम नसतानाही तिने दिलखेचक बनवले आहेत.

आपल्या आवाजाच्या मर्यादा लक्षात घेऊन केलेली तिची संवादाची फेक किंवा उच्चारणही सुंदर आहे. डिटेक्टिव गुरवच्या बोलण्याची नक्कल करण्याचा प्रसंग असो किंवा 'तुमचे बोलणं एवढं स्पष्ट कसे?' या श्रीकांतच्या प्रश्नाला 'माझं शिक्षण पुणे येथे झाले आहे' असे उत्तर देताना किंवा श्रीकांतने तिला प्रथमच 'अरुणा' अशी हाक मारल्यावर बरं वाटण्याचा अभिनय असो, भूमिका समजून घेऊन मेहनत घेतल्याचे जाणवते. (भूमिका जगणे हा शब्दप्रयोग मी करणार नाही.) केश-वेशभूषेसहित ही वेगळी भूमिका भक्ती बर्वेंनी सुरेखच केलीय यात वाद नाही.

या नाटकातले संवाद कथा पुढे सरकवायला मुळीच मदत करत नाहीत, याचे प्रमुख कारण नाटकामध्ये विनोदनिर्मिती करणाऱ्या सिच्युएशन्स फारच कमी आहेत.

संपूर्ण कथा किंवा नाटक घडते एका ब्लॉकमध्येच. विविध माणसे येणे-जाणे व त्यांच्यामुळे उद्भवणारा गडबड गोंधळ यावरच जास्त भर दिला आहे. त्यामुळे संवाद तिथल्या तिथेच फिरत राहतात. बरे, संवादही चमकदार, चटकदार नाहीत किंवा इंग्रजीत ज्याला witty म्हणतात तसेच तुरपणाचेही नाहीत.

या संवादांमुळे निर्माण होणारे विनोद बेतासबात आहेत. जे. पी. आतले कपडे व डिटेक्टिव गुरव याचा 'ललकार' हे विनोद उबग येईपर्यंत रांबवले आहेत. बहुतेक सर्व विनोद क्षणिक हसे मिळवतात. नंतर ते विनोद आठवणे जड जातं.

राजकारणावर विनोद करण्याची सध्या फॅशनच आहे. त्यामुळे चोर व पुढारी, बेशरम पुढारी, दिल्ली कार्पोरेशन, राजघाटावरील (मोडण्यायोग्य शपथ) हे तथाकथित टीकात्मक विनोद मनाला मुळीच आल्हाद देत नाहीत.

नाटकात द्व्यर्थी व अश्लील वाक्ये बरीच आहेत पण ते सर्व विनोद अक्षरशः फुटकळ आहेत. 'तुम्ही आमच्या पोरीला येका रात्रीत पार बिघडवली!' अशी वाक्ये व तदनंतर दहा एक मिनिटे 'बिघडवणे' या शब्दावर 'विनोदनिर्मितीची धडपड; स्वत:च्या आईला पुढच्या वाढदिवसाचे प्रेझेंट ९ महिने अगोदर देऊन 'काही ओझी अशी सांभाळावी लागतात, हे वाक्य; संडासाचे उल्लेख, अशा विनोदांच्या वेळी आपण काय करावे? (या विनोदांना हसणारांना हसावे!)

नेपथ्य व प्रकाशयोजना या धावपळीच्या व गडबडीच्या कथेला पोषक आहेत एवढेच पार्श्वसंगीताबाबतही तेच (व तेवढेच) म्हणता येईल.

तेव्हा लोकहो, लेखक-दिग्दर्शक निर्माता व प्रकाश-नेपथ्य...ह सर्व सांभाळणाऱ्या सतीश दुभाषी यांच्या 'मोनिका थिएटर्स' चे हे नाटक बघायला जाताना डोके घरी ठेवून, तीन तास 'अत्यंत माफक' करमणुकीच्या उद्देशानेच जा! काही चांगले बघायला मिळेल अशी उच्च अपेक्षा ठेवून गेलात तर अपेक्षाभंगच होईल आणि मग (पैसे गेल्यामुळे) म्हणाल...

अरे चोरा!

*

# अमृताचा दिन

अखिल भारतीय नाट्य परिषद, पुणे शाखेने आपल्या अमृतमहोत्सवाबरोबरच, गानहिरा हिराबाई बडोदेकर यांच्या पंचाहत्तरीनिमित्त त्यांचा सत्कार करून दि. २८ ऑगस्ट हा दिवस एका अर्थी 'अमृत-दिन' केला.

हिराबाईंचा सत्कार आणि आपल्या संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त उत्सव एवढेच या संपूर्ण कार्यक्रमाचे स्वरूप न ठेवता 'मराठी संगीताची वाटचाल, सामवेद ते ते नाट्यसंगीत थोडक्यात दाखवण्याची कल्पना खूपच स्तुत्य होती.

रंगमंचावर अगदी मागे फुलांच्या माळा, संस्थेचे व हिराबाईंचे नाव यांच्या सोबतच विविध 'भाव' दर्शविणारे चेहरे लावले होते ही 'नाट्य' मय कल्पनाही आपल्याला खूपच आवडून गेली. या पडद्यावर पिवळसर लाइट सतत होता.

निवेदक स्टेजवर असताना त्याच्यावर मंद निळा स्पॉट व प्रत्यक्ष कार्यक्रमाचे वेळी रंगमंच झगझगीत प्रकाशाने उजळून निघालेला हे प्रकार प्रकाशयोजनेतच मोडणारे होते. उगीच आपली दिनदिन दिवाऽऽळी नव्हती.

पुणेकर रसिकांच्या स्वागतानंतर व समारंभाचा हेतू वगैरे स्पष्ट करून झाल्यावर श्री. धुंडीराजशास्त्री लेले यानी परंपरागत पद्धतीने सामवेदगायन केले. संगीतविषयक माहिती ऋग्वेदातील ज्या भागात आहे त्यालाच सामवेद म्हणतात. विविध यज्ञामध्ये विविध निमित्तांनी सामवेदपठण कसे होत असे त्याचे एक चागलेसे प्रात्यक्षिक श्री. लेले यानी दाखवले.

सामवेदपठणानंतर ज्ञानदेवांच्या 'पसायदान' या अत्यंत सुरेख अशा काव्याचे गायन श्री. मनोहर केतकर यांनी श्री दिगंबर दामले याच्यासह केले आणि (सुधीर फडके उर्फ 'बाबूजी' याची किती जबरदस्त छाप सर्व पुरुष गायकांवर आहे याची प्रचीती दिली.)

नंतर श्रीअक्कलकोट स्वामी समर्थ भजनी मंडळाने ज्ञानदेव, तुकाराम व रामदास याचे अभंग सादर केले.

(यातले मुख्य बुवा सारखे मागेच उभे रहात होते. परिषदेचे कार्यकर्ते त्यांना विनवून 'पुढे या' च्या खुणा करून थकले आणि शेवटी त्यांनी माईकच पुढे केला.) असो. या मडळातले सर्व लोक वृद्ध होते; पण त्यांनी मोठ्या उत्साहाने हा कार्यक्रम सादर केला. (वयपरत्वे, त्याचे उच्चार कळणे जरा जड़च जात होते.)

यानंतरचं भारूड मात्र अक्षरशः भन्नाट झाले. टाळ, मृदुंगाच्या जोरकस निनादानं कडकलक्ष्मी चाबूक फडकावीत आली. अगदी 'अस्सल' कडक लक्ष्मी! या ग्रुपने 'बया दार उघड' हे एकनाथांचं प्रसिद्ध भारूड सादर केलं. अत्यंत 'सफाईदार' अशुद्ध उच्चार, तेवढेच सुरेख संस्कृत श्लोकांचे उच्चारण, कबीराचे दोहेही तितक्याच सहजपणे म्हणणारा हा कलाकार श्री. विठ्ठल मोकसे उर्फ मा. विठ्ठल याने अक्षरशः कमाल केली. नाचणं, चाबूक मारून घेणं, हातातून रक्त काढणं, अंगात आल्यानंतरचे आळोखेपिळोखे देणं, घुमताना जागच्या जागी थरथरणं, याच्या जोडीला म्हातान्या बाईचा आवाज वगैरे प्रकार इतके विलक्षण सुरेख व सहजपणे केले की वर्णन करणे मुश्कील व्हावे. (सामहिक नाचणे, रंगमंचावर 'ते' पात्र आणणे अशा गोष्टीमुळे जरा नवनाट्याचा 'टच्' ही दिल्यासारखं वाटलं.

यानंतर झाला 'गोंधळ!' गोंधळी किंवा भुत्या होते प्रसिद्ध तबलावादक श्री केशव बडगे, सर्व साहित्यानिशी हा गोंधळ छान झाला. गोंधळाच्या शेवटी नाचत नाचत जाऊन बडगे यानी श्रीमती हिराबाईंना श्रीफळ अर्पण करून सर्वांचीच वाहवा मिळवली.

संगीत नाटकांचा जन्म ज्या कीर्तनपरंपरेतून झाला त्याची झलक पेश करताना श्री. लक्ष्मणबुवा फाटक यांनी केवळ बहार उडवून दिली. भरपूर वय झाले असले तरी स्वच्छ शब्दोच्चार, खणखणीत आवाज, स्मरणशक्ती व गोष्टीवेल्हाळपणा अजूनही शाबूत आहे. उत्तम कीर्तनकाराला व कीर्तनात आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींची झलक, विनोदबुद्धी व संभाषणचातुर्य, बहुश्रुतपणा सुरेल गायकी यासह त्यांनी लहानसं कीर्तन फर्मास करून सोडलं आणि 'सं. शाकुंतल' ते 'एक मम्मी दोन पप्पा' ह्या नाटकाच्या 'वाटचाली'चा उल्लेख त्यांनी केल्यावर संपूर्ण प्रेक्षागृह हास्याने दणाणून गेले!

मध्यंतरानंतर हिराबाई बडोदेकरांचा सत्कार करण्यात आला. नाट्यतपस्वी श्री. बाबुराव विजापुरे यांनी गानहिरा हिराबाईंना 'जीवेत शरदः शतम्' असा आशीर्वाद दिला. प्रास्ताविक परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष प्रा. भालबा केळकर यांनी केले. त्यानंतर श्री. चित्तरंजन कोल्हाटकर यांनी हिराबाईंना देण्यात येणाऱ्या मानपत्राचे वाचन केले. त्या प्रसंगी रंगमंचावर पुष्पवृष्टी करण्यात आली. या मानपत्राचे शब्दांकन प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी केलेले असून त्याला कलापूर्ण मूर्तरूप दिले आहे श्री. पानः घंटी यांनी. मानपत्र, परिषद व पुणेकर रसिक यांच्या वतीने देण्यात आले आहे.

'स्वर आणि लय याची सिद्धी ज्याच्या गळयात आहे, तोच खरा कलावंत होऊ शकतो आणि याचे उत्तम उदाहरण म्हणजे हिराबाई होय' असे गौरवोद्गार पं. भीमसेन जोशी यानी समारंभाच्या अध्यक्षपदावरून काढले. त्याचे लहानसे भाषण त्यांनी वाचून दाखवले; पण स्वरांइतकाच भावनांचा सच्चेपणा आणि उच्चाराचा कानडी/कर्नाटकी ढंग यामुळे भाषण रंगतदार झाले.

जुन्या जमान्याच्या प्रसिद्ध अभिनेत्री व परिषदेच्या पुणे शाखेच्या उपाध्यक्ष बेबी शकुंतला यांनी हिराबाईंना शाल व श्रीफळ दिले. त्यांनीच आभारप्रदर्शन केले.

सत्काराला उत्तर देताना, सकस अशी नवीन संगीत नाटके रंगभूमीवर येत नसल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली आणि परीषदेने त्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न करावेत अशी सूचनाही केली.

या कार्यक्रमानंतरच्या छोटयाशा मध्यतरानतर पडदा बाजूला झाला तो 'पंचतुंड नररुंडमालधर' या नांदीच्या सुराच्या साथीने. गायक होते वसंतराव देशपांडे, भार्गवराम आचरेकर, जयमाला व कीर्ति शिलेदार. ही झक्क नांदी संपल्यावर पं. वसंतराव देशपांडे यानी 'या कार्यक्रमाची सागता पं. भीमसेन जोशी करतील,' असे जाहीर केले. (प्रचंड टाळ्या.)

कार्यक्रमाची सुरुवात सौ. मालती बर्वे (पांडे) यांनी गो. ब. देवलांच्या 'शापसंभ्रम' या नाटकातील 'मधुर किती हा कुसुमगंध सुटला' या पदाने केली. त्यानी दुसरे पद खाडिलकराचे 'कवी बाला...' हे म्हणून श्रोत्यांची वाहवा घेतली.

यानंतर स्वरराज उदयराज गोडबोले हे टाळ्या घेतच रंगमंचावर आले. त्यांचे नक्की वय किती? खूपच तरुण दिसतात. 'कोण तुजसम गुरुराया' (सौभद्र) व 'लोळत कच' (केस या अर्थी) हे विद्याहरणमधले पद गाऊन, मैफलीत अधिकच गहिरारंग भरून श्री. उदयराज गोडबोले उठले.

गायक नटांच्या नव्या पिढीतील प्रसिद्ध व लोकप्रिय गायिका कीर्ती शिलेदार रंगमचावर प्रवेशताच प्रेक्षकात खुशीची लाट पसरली. 'वद जाऊ कुणाला शरण' व 'अरे वेड्या मना तळमळसी' ही दोन पदे सुरेख गाऊन प्रेक्षकांची दाद मिळवून व छाप

पाडून ही तरुण गायिका रसिकांचा निरोप घेती झाली.

नंतर गायक अभिनेत्री सौ जयमाला शिलेदार यांच्या सुरेल गळ्यातून 'आज मज सहज आला उल्हास' (शाकुंतल) व 'असताना यति संनिध' (सौभद्र) अशी रोमँटिक व खेळकर गाणी ऐकताना मजा वाटली.

नाट्यसंगीताचे 'वसंतबहार' डॉ. वसंतराव देशपांडे यांनी अक्षरश: बहार आणली! विद्याहरण नाटकातले 'अहंकार माझा' व शाकुंतलामधील 'आवडती वस्तु लोभाने, ही त्यांची विशेष माहिती नसलेली गाणी ऐकवून त्यांनी रसिक श्रोत्यांचे कान तृप्त करून सोडले!

या कार्यक्रमाचा आणखीन एक विशेष म्हणजे श्री. चित्तरंजन कोल्हटकर यांचे निवेदन. पक्व व कसदार आवाज, स्वच्छ शब्दोच्चार, हजरजबाबीपणा व 'टोनिंग' मधले सहजनाट्य, यामुळं त्यांनी हा संपूर्ण कार्यक्रम रसरशीत व जिवंत ठेवला.

तसेच विष्णुपंत वष्ट (ऑर्गन) विनायक थोरात व केशव नावेलकर, (तबला) मधुकर खाडीलकर (सारंगी—आकाशवाणीच्या सौजन्याने) व अनंत फाटक (व्हायोलिन) यांची साथ-संगत अतिशय यथायोग्य व गायकास पूरक अशी होती.

अगोदर जाहीर झाल्याप्रमाणे (किंवा वसंतरावांनी केल्याप्रमाणे) सरतेशेवटी पं. भीमसेन जोशी गाण्यास आले आवाजाचा प्रचंड पल्ला, विलक्षण दमसास व निखळ स्वच्छ सूर यांच्या साहाय्याने वाटेल तो गायनप्रकार भीमसेन नितांत सुंदर बनवतात त्यांनी निवडले होते दोन अभंग आणि साथीला होते तबल्यावर श्री. केशव वडगे व हार्मोनियमवर श्री. बाळ माटे तुकारामाच्या 'अणुहुनिया थोकडा तुका आकाशाएवढा' या अभंगानं त्यांनी या कार्यक्रमाच्या कळसाध्यायाला सुरुवात केली. अभंग अर्थातच विलक्षण रंगला आणि नंतर 'अगा वैकुंठीच्या राया' या भैरवीच्या सुराच्या सोबतीने पडदा मिटत गेला या 'अध्यक्षीय गाण्याच्या' स्वराच्या आधीन होऊन हा आनंददायी सोहळा संपला.

—निखिल गजेंद्रगडकर

---

## पोलंड : पृष्ठ ४ वरून

घेणार नाही असा इशारा दिला. सरकारला त्यांची मागणी मान्य करावी लागली.

कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या गुप्त मतदानाने निवडणुका होतील असे कम्युनिस्ट पक्षनेते गिटेक यांनी जाहीर केले; पण तेवढ्याने संपनेत्यांचे समाधान झाले नाही. स्वनियंत्रित कामगारसंघटना उभारण्याचा आमचा हक्क मान्य झाला पाहिजे अशी त्यांची मागणी होती ती अखेर सरकारला मान्य करावी लागली.

पोलंडमध्ये ज्या ज्या वेळी कामगारांच्या असंतोषाचा मोठ्या प्रमाणावर उद्रेक झाला तेव्हा सरकारच्या व कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात कोठे बदल झालेले आहेत. १९५६ मधील उद्रेकानंतर गोमुल्का यांच्याकडे सूत्रे सोपविण्यात आली. १९७० मधील संपाच्या लाटेत गोमुल्का यांना राजिनामा द्यावा लागला व त्याच्या जागी गिटेक आले. या वेळच्या संपाच्या लाटेत गिटेक यांना राजिनामा द्यावा लागेल असा अंदाज काही निरीक्षकांनी केला होता. त्यांनी राजिनाम्याची तयारी दर्शविली आहे अशा बातम्याही प्रसिद्ध झाल्या होत्या; पण सरकार व कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात काही बदल झाले असले तरी त्यांचे पद कायम राहिले आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या पोलिटब्यूरोचे १४ सभासदांपैकी ६ सभासदांना काढून टाकण्यात आले. एडवर्ड बब्च यांना पंतप्रधानपदावरून दूर करून त्या जागी पिंकोव्हस्की यांना पंतप्रधान नेमले. तीन उपपंतप्रधान नवीन नेमले व अकरा मंत्री बदलण्यात आले. प्रचारप्रमुख जर्सी तुकोझेव्हिक यानाही त्यांच्या पदावरून दूर करण्यात आले. अर्थ, परराष्ट्र आणि यंत्रोद्योग मंत्र्यांना आपली मंत्रिपदे गमवावी लागली.

पोलंडमधील संपआंदोलनाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कामगारवर्ग व बुद्धिजीवी यांची एकजूट. पोलंडमधील यापूर्वीच्या सरकारविरोधी आंदोलनात तसेच पूर्वयुरोपमधील इतर देशातल्या आंदोलनात अशी एकजूट दिसलेली नाही.

पोलंडमधील घटनांचा आणखी एक विशेष म्हणजे १९५६ व १९७० प्रमाणेच या वेळीही रशियाचा हस्तक्षेप होऊ न देता सरकार आणि संपनेते यांनी तेथील प्रश्न समझोत्याने सोडविले आहेत. हंगेरी किंवा चेकोस्लोव्हाकियाप्रमाणे तेथे रशियाचा किंवा वॉर्सा करार राष्ट्रांचा लष्करी हस्तक्षेप तेथे झालेला नाही. अफगाणिस्तानच्या संघर्षात गुंतून पडलेले असताना आणखी नव्या संघर्षात गुंतण्याची रशिया व अमेरिका दोघांचीही तयारी नव्हती. रशियाबरोबरच्या पोलंडच्या संबंधांना आणि तेथील कम्युनिस्ट पद्धतीला धोका येणार नाही एवढी दक्षता घेऊन कोणत्याही सवलती द्या असा सल्ला रशियासह पोलंडच्या कम्युनिस्ट नेत्यांना मिळाला होता असे म्हटले जाते. फार ताणून धरले तर रशियाचा हस्तक्षेप होईल हे कामगारनेत्यांनीही ओळखले.

साम्यवादाच्या प्रयोगाला काही नवी दिशा पोलंडमध्ये मिळणार आहे काय? हा कम्युनिस्ट चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. कामगारसमित्यांच्या रूपाने कामगारांच्या हाती खऱ्या अर्थाने सत्ता येणे हीच या कामगारआंदोलनाची अंतिम परिणति असायला हवी. कामगारसमित्या म्हणजेच रशियातील 'सोव्हिएटस्' 'सर्व सत्ता सोव्हिएतच्या हाती' अशी लेनिनची घोषणा होती; पण पुढे ही घोषणा सोडून कम्युनिस्ट पक्षाच्या हाती त्याने सत्ता केंद्रित केली. त्याच्या या धोरणाला पोलिश कम्युनिस्टनेत्या रोझाल्लेक्झेंबर्ग यांनी विरोध केला होता. सोव्हिएटस्च्या हातीच सत्ता असली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. आता त्यांचे उद्दिष्ट गाठण्याचे उद्देशाने पोलंडमधील कामगारांनी पुढची पावले टाकली तर साम्यवादाच्या प्रयोगाची ती नवी दिशा होईल. यासाठी आणखी काही वर्षे जावी लागतील. एवढेच नव्हे तर नव्या संघर्षालाही तोंड द्यावे लागेल. □